# श्री साईलीला

आगष्ट १

★

गुरुपौर्णिमा



स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

" माझ्या गुरूनें प्रथम माझें मुंडण केलें व गुरुदक्षिणेदाखल अवघे दोन पैसे मागितले. आणि मी ते दिले व नंतर मी त्यांच्याकडे गुरुमंत्र मागितला. माझ्या गुरुजींना काय बरें कमी होतें ? ते पूर्णकाम होते. त्यांना व्यावहारिक पैशाअडक्यांची मुळींच जरुरी नव्हती. त्या दोन पैशांच्या रूपानें त्यांनी माझ्याकडून दोन महत्त्वाच्या गोष्टींची अपेक्षा केली व तोच त्यांनीं मला दिलेला गुरुमंत्र. कोणत्या त्या दोन गोष्टी ? निष्ठा आणि सबुरी याच त्या दोन गोष्टी होत. निष्ठा तुम्हीं समजूं शकतां. सबुरी म्हणजे धैर्य—धीर माणसाच्या ठायीं निस्सीम निष्ठा व अप्रतिम धीर पाहिजे. धैर्य तीच गे बाई सबुरी। सांडूं नका तिजला दूरी। कारण 'सबुरी सद्‌गुणाची खाणी। सद्‌विचार रायाची ही राणी। निष्ठा आणि ही सख्या बहिणी। जीव प्राण दोघींसी ।। सबुरीवीण प्राणी। स्थिति तयाची दैन्यवाणी। पंडित असो कां मोठा सद्‌गुणी। व्यर्थ जिणें हिजवीण ।। गुरु जरी महा प्रबळ। अपेक्षी शिष्यप्रज्ञाच केवळ। गुरुपदीं निष्ठा प्रबळ। धैर्यबळ सबूरी ।।

—श्रीसाईसच्चरित


गुरुपौर्णिमा ] श्रीसाईलीला [ विशेषांक

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४० वें ] ऑगस्ट १९६१ [ अंक ५ वा

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४

# प्रिय वाचक—

हा गुरुपौर्णिमेचा खास अंक वाचकांस सादर करण्यास आम्हांला अत्यानंद होत आहे.

गुरुपौर्णिमा ही गुरुगृहीं शिक्षण संपविल्यानंतर गुरूनें दिलेल्या ज्ञानाचें परिमार्जन म्हणून गुरुगृहीं जाऊन गुरूचा सत्कार करणें हें वैदिक कालापासून चालत आलेलें आहे. गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुपूजेचा--व्यासपूजेचा पुण्यकारक दिवस. व्यास-मुनींना वेदव्यासही म्हणतात. त्यांच्यामुळें आपणांस वेदांचा व महाभारतासारख्या ग्रंथरत्नांचा लाभ झाला. त्या गुरूच्या गुरूचें व त्यांच्यापासून गेल्या हजारों वर्षांपासून सुरू झालेल्या गुरुपरंपरेचें आज पुण्यस्मरण करून गुरूंच्या चरणीं पुष्पांजलि वहावयाची आहे. वैदिक कालांत आश्रम व्यवस्थेंत विद्या हस्तगत करून ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या सर्व वर्णव्यवस्थेंतील विद्यार्थ्यांना गुरुगृहीं शिक्षण मिळत होतें. उदा. : द्रोणाचार्यांकडून पांडव व कौरव यांना क्षात्रधर्मपालनाचें शिक्षण व गुरु सांदिपनी यांच्या आश्रमांत श्रीकृष्णास क्षात्रधर्म व सुदाम्यास ब्राह्मणधर्म, वाल्मिकीच्या आश्रमांत प्रभु रामचंद्रास क्षात्रधर्म याचें शिक्षण देऊन पुरातन कालांतील आश्रम-शिक्षणपद्धत पूर्णांशानें देशहितरक्षक ठरली. हें सर्व माननीय व राजकीय पुढारी आज एक-मुखानें मान्य करीत आहेत. सनातनधर्म व्यवस्थेंतील ही शिक्षणपद्धत चालू युगांत गुरुकुल या नांवानें अस्तित्वांत आहे. फरक एवढाच कीं, चालू जमान्यांतील शिक्षण पद्धत ही तत्कालीन समाज धारणेच्या व्यवस्थेशी निगडीत होऊं शकत नाहीं. जशा गरजा वाढल्या तसा शिक्षणक्रम बदलत गेला. आधुनिक शिक्षणक्रम हा बुद्धिवादाच्या निकषावर व बालमनाच्या विचारशक्तीच्या चौकटींत ( Psycological frame of mind ) कसा बसवतां येईल याचा साचा शिक्षण क्षेत्रांतील अधिकारवाणीनें बोलणाऱ्या विद्वानाकडून बसविला गेला.

हा लेख लिहिण्याचा आमचा उद्देश आधुनिक शिक्षण पद्धतीचे गुणदोष दाखविणें हा नसून ( व तसा आमचा अधिकारही नाहीं ) फक्त गुरुपौर्णिमेच्या उत्सवाची पार्श्वभूमी काय आहे हे आमच्या वाचकांस समजावें म्हणून लिहीला आहे. श्रीसद्गुरु साईबाबा यांच्या भक्तांची संख्या व त्यांनीं दिलेल्या अनुग्रहाची जोपासना करणारा भक्तगण हा फार मोठा आहे. उत्सवाचे मुळाशीं सांप्रदायिकत्व तर आहेच, परंतु त्या बरोबरच गुरुगृहीं जाऊन आपल्या गुरूची सेवा करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य ठरतें. कोणत्याही क्षेत्रांत गुरुशिवाय मोक्ष वा उन्नति नाहीं. हें आज सर्वमान्य झालेलें आहे.

तेव्हां श्री बाबांचे भक्तगणांस, तसेंच श्रीबाबांच्या शिकवणीप्रमाणें वागून आपला उत्कर्ष करून घेणाऱ्यांस आमची हीच विनंति आहे कीं, त्यांनीं दरसाल गुरुपौर्णिमेस श्रीक्षेत्र शिरडी येथें येऊन आपल्या गुरूचें नामस्मरण करून गुरुगृहीं प्रसाद ग्रहण करावा.

श्री बाबांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे :—

"जो माझ्या समाधीची पायरी चढेल ।
दुःख हें हरेल सर्व त्याचें" ॥

श्रीसाईलीलेच्या या विशेषांकाच्या निमित्तानें, गुरुपौर्णिमा, सद्गुरुमहिमा व अध्यात्ममार्गांत सद्गुरुच्या मार्गदर्शनाचें महत्त्व परोपरीनें पटवून देणाऱ्या कांहीं लेखांचा या अंकांत समावेश करण्यांत आला आहे. सद्गुरुचा महिमा शब्दातीत आहे. म्हटलेंच आहे कीं, 'गुरु तेथें ज्ञान । ज्ञानीं आत्मप्राप्ति । आत्मलाभीं शांति । असे जैशी ॥

या निमित्तानें आमच्या प्रिय वाचकांची अल्पशी सेवा करण्याची सुसंधि ज्या आमच्या कांहीं अधिकारी लेखक मित्रांच्या सहकार्यामुळें मिळाली, त्या सन्मित्रांचे आम्हीं आभारी आहोंत. श्रीसाईलीलेवर त्यांनीं अशीच कृपादृष्टि ठेवावी अशी विनंति आहे.

—**संपादक**




दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :— DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन्स** (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

**छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८**




## ( १ ) बाबांनीं संकटमुक्त केलें—

श्री. नरसिंहराव आर. देशपांडे यल्लार्डी, मु. पो. तालुका—यल्लार्डी जिल्हा—निजामाबाद हे आपला अनुभव पुढील प्रमाणें कळवितात:—

सन १९५१ सालीं मी हैदराबाद येथें श्री बाबांची तसबीर पाहिली आणि माझ्या मनांत आदर उत्पन्न झाला. नंतर एक तसबीर आणून मीं घरीं ठेवली; पण शिरडीस जाणें झालें नाहीं.

माझा मेव्हणा भिलवली, तालुका बेळकोणी बुद्रूकचा जि. नांदेड. याचें नांव हरीहर-राव बाबुराव भवानराव कुलकर्णी. वेळकोणी फारच आजारीं आहेत. जगण्याचा संभव नाहीं, असें माझ्या सासऱ्याचें पत्र आलें आणि मी व माझी पत्नी दोघें मिळून तेथें गेलों. पहातों तर खरेंच. तशी परिस्थिती होती. वैद्य व डॉक्टरांनी हात टेकले होते. आम्हीं वैद्य—डॉक्टरांकरितां इकडे तिकडे धांदल केली पण कांहींच उपयोग झाला नाहीं. अखेर आम्हीं श्रीसाईनाथ महाराजांच्या तसबिरी-समोर मनःपूर्वक प्रार्थना करून नऊ दिवस त्यांच्या नांवानें नंदादीप जाळत होतों. १० व्या दिवसापासून रोग्यास आराम वाटूं लागला आणि तो तीन चार महिन्यांनीं उठून फिरूं लागला. त्याचवेळेस तेथूनच मी व माझी पत्नी शिरडीस जाऊन प्रथम समाधीचें दर्शन घेतलें. त्यानंतरहि श्रीसमर्थ साईबाबा आमचीं मोठमोठीं संकटें निवारीत गेले.

## ( २ ) पुत्ररत्नाचा लाभ—

श्री समर्थ साईबाबांच्या कृपेनें आम्हांला १२ वर्षां नंतर मुलगा झाला. माझी पत्नी सौ. नानीबाई देशपांडे वय ३७ वर्षे व माझें वय ४० वर्षांचें आहे. आम्हीं उभय-तांनीं दोन दोन वर्षांने बाबांकडे येऊन दर्शन घेत असूं. मला १९४७ सालीं १५ ऑग-स्टला एक मुलगी झाली व दुर्दैवानें दोन वर्षांची होऊन स्वर्गवासी झाली. त्यानंतर आम्हीं दोघे फारच उदास होऊन गेलों, पत्नीस विटाळशूळ असे; त्यामुळें तिला फारच त्रास होत असे. पुष्कळ डॉक्टर वैद्य वगैरे यांना दाखविलें, पुष्कळ पैसे खर्च केले पण कांहींच उपयोग झाला नाहीं, आणि मूलही झालें नाहीं. धार्मिक कृत्येंही पुष्कळ करण्यांत आलीं; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीस आम्हीं १९५९ सालीं बाबांच्या दर्शनास शिरडीस येऊन आमच्या मनांतील दुःख त्यांना कळवून त्यांची मनःपूर्वक प्रार्थना केली. दुसऱ्याच वर्षी पुन्हां

आम्हीं शिरडीस जाण्याच्या विचारांत होतों. माझ्या पत्नीस माझ्याबरोबर येण्याचा मी आग्रह केला. पण त्या माझ्याबरोबर येण्यास तयार होईनात. त्या म्हणाल्या कीं, बाबांनीं माझ्यावर कांहींच कृपा केली नाहीं. तर मी कशाकरतां येऊं? मलाहो तिचें म्हणणें पटलें. मी बाबांच्या फोटोपुढें मनापासून प्रार्थना केली कीं माझ्या पत्नीचें म्हणणें मला बरोबर वाटतें. आम्हीं दोघें तुमच्यावर श्रद्धा ठेऊन आशेनें बसलों होतों.

त्याच महिन्यांत श्री समर्थ साईबाबांनी कृपा करून महिना चुकविला. तो गुरुवारचा दिवस होता. त्यानंतर दर गुरुवारी आम्हीं दर गुरुवारप्रमाणें बाबांची आरती व पूजा करून त्यांच्या नांवानें एक रुपया काढून ठेवीत असूं. आणि माझ्या पत्नीस गर्भाचे पांच महिने होतांच आम्हीं दोघें शिरडीस येऊन बाबांचें दर्शन घेतलें.

डॉक्टर व नर्सच्या मदतीशिवाय बाबांनीं बाळंतपण सुखरूप पार पाडलें. माझी पत्नी फार दिवसांनीं गर्भवती झाली म्हणून आम्हीं लोकांचें म्हणण्यावरून दर दोन महिन्यांनी हैदराबाद येथें जाऊन मोठ्या स्पेशॉलिस्ट डॉक्टरांना दाखवीत होतों. पण आमचा विश्वास बाबांवरच होता. त्याचं प्रमाणें लोकांच्या म्हणण्यावरून आम्ही बाळंतपणाकरतां ९ व्या महिन्यांत हैद्राबाद येथें गेलों. आणि डॉक्टर्सना दाखविलें पण डॉक्टरनीं बाळंतपणास बरेच दिवस लागतील असें सांगून आपल्या दवाखान्यांत जागा नाहीं म्हणून सांगितलें, त्यामुळें आम्हीं फारच घाबरलो. आणि डॉक्टरांनीं असेंही सांगितलें कीं जर रु. ३०० द्याल तर मी दुसऱ्या दवाखान्यांत नेऊन बाळंतपण करीन. तो १ फेब्रुवारी १९६१ चा दिवस होता. माझ्या पत्नीस वेदना सुरू झाल्या, आम्हीं हैद्राबादेंत आमच्या मावस भावाच्या घरीं रहात होतों. त्या घरीं, दुसरें कोणीच रहात नव्हतें. फक्त मी, माझी पत्नी व दोन मुली, त्याच दिवशीं त्याच रात्रीं १२ वाजल्यापासून फारच वेदना सुरू झाल्या. आणि मी घाबरून दुसऱ्या दवाखान्यांत गेलों पण त्या रात्रीच्या प्रसंगीं कोणीच आलें नाहींत. घरांत पत्नी व मी बाबांची आठवण व प्रार्थना करीत मधून मधून बाबांची उदी जी आमच्यापाशीं नेहमी असते ती–पाण्यांत कालवून देऊं लागलों. आणि त्याच्यावरच भार टाकून रात्रीं ३ वाजेपर्यंत राहिलों. अखेर बाळाची नाळ कापण्यासही आमच्या जवळ कोणी नव्हते. त्यामुळें माझ्या पत्नीस घाबरायला झालें. आणि 'वेळेस कसें होईल बाबा?' असें त्या म्हणाल्या; रात्रींचे ४ वाजतां एक ६० वर्षांची म्हातारीबाई अनोळखी आमच्या घरापुढून जातांना दिसली! तें बाबांचेच स्वरूप होतें! तिला आम्हीं हांक मारली आणि ती खोलींत येतांच अवघ्या १०–१५ मिनिटांनीं सौभाग्यवती बाळंतीण होऊन पुत्ररत्न जन्मलें. तो गुरुवारचा दिवस २ फेब्रुवारी १९६१ होता. आम्हांला बाबांची आठवण हमेशा रहावी या दृष्टीनें आम्हीं बाळाचें नांव 'साईप्रकाश' ठेवलें. आणि आज पांच महिन्यांच्या मुलांस घेऊन आम्हीं शिरडीस येऊन जो कांहीं आमचा यथाशक्ति नवस होता तो फेडून, श्री साईबाबाना आम्हांवर व सर्वत्रावर अशीच कृपा ठेऊन सर्वांचे संकट निवारण करून सुखरूप ठेवण्यास प्रार्थना केली.

२०

---

# अवधूतानें केलेली गुरूंची निवड

—वि. पा. सातपुते, मुंबई

**अवधूत महाराजानीं निरनिराळ्या प्रसंगी चौवीस गुरू केले. त्यांच्यापासून त्यांनीं विविध गुण संपादन केले. त्या चौवीस गुरुंपैकीं कबूतर, कन्या व बाण तयार करणारा लोहार या तिघांना त्यानीं गुरु कां केलें व त्यांच्यापासून त्यांना कोणत्या सद्‌गुणांचा लाभ झाला, याचे श्री. सातपुते यानीं एकनाथी भागवताच्या आधारे विवेचन केलें आहे.**

—संपादक

श्रीमद्‌भागवत एकादश स्कंदांत अध्याय ७, ८, व ९ यांत "यदू–अवधूत" संवादाचें वर्णन आहे. त्यांतील सातवा अध्याय उत्तरार्ध व आठवा व नववा अध्याय यांत अवधूतानें केलेले चोवीस गुरु हा कथा भाग आहे. श्रीएकनाथी भागवत या ओवीबद्ध टीकाग्रंथांतील एतद्विषयक कांहीं भागाचा यथामति अनुवाद करीत आहे.

## जो जो जयाचा घेतला गुण

साधारणतः सर्व जगच गुरुस्थानीं आहे. तरी त्यांतून ज्याचा जो गुण घेतला त्याला मी गुरु केलें. केवळ घेण्यासारख्या गुणामुळें गुरु केला इतकेंच नव्हे, तर ज्याचें जें लक्षण त्याज्य वाटलें त्यालाही त्यागरूपानें गुरुस्थानीं मानलें, असा अवधूतांच्या म्हणण्याचा सारांश आहे. ' जो जो जयाचा घेतला गुण । तो तो म्यां गुरु केला जाण । गुरूसि आलें अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे ।। ज्याचा गुण घेतला । तो सहजें गुरुत्वा आला । ज्याचा गुण त्यागरूपें घेतला । तोही गुरु झाला अहितत्यागें ।। एवं त्यागात्याग समतुकें । दोहींसी गुरुत्व आलें निकें । राया पाहें पां विवेकें । जगचि अवघें गुरु दिसे ।। '—श्री एकनाथी भागवत, ७/३४१–४३ )

वरील चोविसांपैकीं ( १ ) कपोता ( कबूतर ), ( २ ) विवाहनिश्चित झालेली मुलगी, व ( ३ ) शरकार ( बाण तयार करणारा लोहार ), या तिघांच्या एकनाथी भागवतांतील वर्णनाचा स्थलबंधनाचें पालन करून अनुवाद केला आहे.

हे तीनही गुरु ग्रहणरूपानें केलेले आहेत. पहिल्यापासून गृहमेध्याचा ( संसारांतच गुरफटून राहाणाऱ्याचा ) सर्व नाश होतो. दुसऱ्यापासून साधकानें एकांताचें सेवन करावें व तिसऱ्यापासून एकाग्रतेनें थोर लाभाची प्राप्ति होते असें तात्पर्य आहे.

## ( १ ) कपोताची कथा

अवधूत यदूस म्हमतात, एका कपोत्यानें एका विस्तीर्ण वृक्षावर घरटें ( नीड ) केलें व त्यांत तो कपोतीसह पुष्कळ दिवस कालक्रमण करीत होता. दोघेंही एकविचारानें व एकरूपतेनें रहात होती, व दोघांनाही एकमेकांच्या सहवासाशिवाय सुखाचा काळ जात नव्हता.

यथाकाल कपोतीस गर्भ राहिला; कपोत्यानें तिचे सर्व डोहाळे पुरविले व दिनपूर्ती-नंतर कपोती दोन अंडीं प्रसवली. हरीच्या मायेनें अंड्यांतलि पिलांस अवयव फुटले व दोन गुटगुटीत पिलें अंड्यांतून बाहेर आलीं. उभयतांस गृहस्थाश्रमाच्या साफल्याबद्दल धन्यता वाटली. पिलें दिवसगतीनें मोठीं होत चाललीं, त्यांची वाढती क्षुधा भागविण्यासाठीं सर्वांस पुरेलसें अन्नोपार्जन करण्यांत त्या जोडप्याचा दिवसांतील बराचसा वेळ बाहेर जात असे. पिलेंही मातापित्यांची उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करीत व आपल्या बाललीलांनीं त्यांस संतोष देत.

## काळानें केलेली शिकार

अशा प्रकारें त्या कपोत कुटुंबाचा काळ सुखानें चालला असतां, एकदां माता-पिता बाहेर गेलीं असतां, व तीं पिलें घरट्याबाहेर येऊन स्वच्छंदपणें बागडत असतां एका पारध्याची दृष्टि त्या घरट्यावर गेली. त्यानें काळजाळें टाकून त्या दोन पिलांस त्यांत गुंतविलें व तो कपोत–कपोतीची मार्गप्रतीक्षा करीत जरा बाजूस बसला. थोड्याच वेळांत दोघेही मुलांच्या ओढीनें चारा घेऊन आलीं आणि आपल्या दोन्ही पिलांस जाळ्यांत अडकलेलीं पाहून कपोत्यानें अत्यंत आक्रोश केला. कपोतीला पिलांची तडफड पाहवेना. ती वारंवार जाळ्याजवळ जाऊन मागें फिरे. शेवटीं तिला दुःखावेग सहन न होऊन तिनें पिलांजवळ त्या जाळ्यांत उडी घेतली. स्त्री व बाळें मृत्यूच्या जबड्यांत पाहून कपोत्याचाही धीर सुटला. आजपर्यंत स्त्रीपुत्रांसमवेत सुखानें केलेली कालक्रमणा, त्यांचे गुण इत्यादि आठवून तर त्याची जास्तच कालवाकालव झाली, व माझ्यासमोर माझीं मुलें व पत्नी मृत्युमुखीं पडत आहेत आतां मला तरी एकट्यास जगून काय करावयाचें आहे असा विचार करून त्यानेंही त्या काळपाशानें स्वतःस बांधून घेतलें.

नाथांनी एतद्विषयक टीकेंत कपोता कुटुंबाच्या रूपकाद्वारें मानवी संसारांतील पतिपत्नींची परस्परांबद्दल अनुरक्तता व आसक्ति आणि बाललीला यांचें सुंदर शब्दचित्र रंगाविलें आहे. नाथ म्हणतातः दुर्लभ देह प्राप्त होऊनही त्याचें सार्थक न करतां तो कपोता अविचारानें आपला नाश करून घेता झाला.

अवधूत यदूला म्हणतातः राजा, जो कोणी गृहमेधी ( प्रपंचांतून चित्त न काढणारा ) असेल, त्याची काळ त्या कपोत्या प्रमाणेंच शिकार करतो. ( ऐसा जो कोणी गृहमेधी । त्यासी सर्वथा काळ साधी । जैसी कपोत्याची बुद्धि । तैसी सिद्धी गृहमेध्या ॥ ( ए. भा. ७/६२९ ).

## ( २ ) कन्येनें काय शिकविलें ?

एका कुमारीचा विवाह निश्चित झाला होता. एकदां मुलीस एकटी घरीं ठेवून तिचे मातापिता व इतर नातेवाईक कुलदेवतेच्या यात्रेस गेले. मुलगी घरांत कांडण करीत होती. अशा वेळीं लग्नाचा मुहूर्त ठरविण्यासाठीं वरपक्षाकडून व्युत्पन्न ब्राह्मण आले. त्यांनीं कन्या एकटीच घरीं आहे हें जाणलें. मुलगीहि संकोचली. तिनें एका झरोक्याद्वारां त्या ब्राह्मणांना 'गंधाक्षता, सुमनें, पानें' आदि उपचार मौनानेंच समर्पण केलें व आपलें कांडण्याचें काम चालू ठेविलें. परंतु शंखवलयाचें

लग्नचुडे भरले होते, त्यांचा आवाज आगतांच्या कानीं जाणें तिला प्रशस्त वाटलें नाहीं, ती अधिकच लाजली व मनांत विचार करूं लागली कीं, माझ्या वलयांचा ध्वनि जर पाहुण्यांच्या कानीं जाईल तर नवऱ्यामुलीस कामास लावलें असें ते समजतील. तेव्हां आवाज तर न व्हावा व काम तर पुढें चालावें यासाठीं ती अबला असूनहि तिनें पोक्त विचार असा केला कीं, जर हे चुडे फोडले तर लग्नाआधींच तो एक अपशकुन होईल. ज्याच्या नांवानें हे चुडे भरले आहेत तो माझा भर्ता शतायु होवो असें म्हणून चुडे फोडण्याचा विचार तिनें मनांतून झटकून टाकला. नंतर तिनें एका हातांत दोन दोन कांकणें ठेवून बाकीचीं उतरून ठेविलीं व कांडण चालू केलें. तरीहि, थोडासा कां होईना, आवाज होतच राहिला. मग त्या मुलीनें आणखी एक एक कंकण उतरून ठेऊन हातांत एकेक ठेविलें तेव्हां मात्र आवाज येईनासा होऊन तिचें काम निर्विघ्न चालू राहिलें.

अवधूत यदूस म्हणतात : 'जेथें दोघेजण एकेठिकाणीं येतात तेथें शांतता (ध्वनि) राहात नाहीं. म्हणून साधकानें एकांताचें सेवन करावें' हा बोध मी या कुमारीच्या दृष्टांतावरून घेतला व म्हणून तिला गुरु केलें. (,,...दोघांचा संगु एके स्थानीं । तेथें सर्वथा न राहे ध्वनी । दोंतील एक वेगळें काढोनी । बैसे कांडणी कुमारी ॥ एकपणीं कांडितां । ध्वनि नुरेचि तत्त्वतां । तो उपदेश नृपनाथा । जाहलों शिकता मी तेथ ॥' ए. भा. ९।१०१–०२ ) भिक्षाटनार्थ स्वैरवृत्तीनें हिंडत असतां मला हें दृश्य पाहावयास मिळालें असेंही अवधूतानें यदूस म्हटलें.

## (२) शरकारानें एकाग्रता शिकविली

एका नगरांत राजरस्त्यावर एका बाण बनविणाऱ्या लोहाराचें दुकान होतें. एके दिवशीं बाणाचें अग्र ( टोंक ) करण्यांत लोहार पूर्णपणें गढून गेला असतांना त्या रस्त्यानें राजाची स्वारी लव्याजम्यासह वाजत गाजत गेली, पण लोहार आपल्या कामांत एकाग्र झाला असल्यानें त्याला राजाच्या त्या स्वारीचें अस्तित्वही जाणवलें नाहीं. राजा बराचसा दूर गेल्यावर, त्याच्या स्वारीशीं चुकामूक झालेला, राजास विडा करून देणारा हडपी आला व त्यानें 'या रस्त्यानें राजा गेला काय ?' असें लोहारास विचारिलें. यावर लोहारानें उत्तर दिलें. 'कोण जाणे, राजा गेला किंवा नाहीं, मला माहीत नाहीं. माझ्या तरी दृष्टीस पडला नाहीं.'

अवधूत यदुराजास म्हणतात : 'त्या लोहारास पाहून व त्याची ही हकीकत ऐकून, परमार्थाविषयींची आत्यंतिक एकाग्रता दृष्टीसमोर प्रपंच येऊं देत नाहीं हें त्याजपासून मी शिकलों व यास्तव त्यास गुरु केलें.

'एकाकी एकाग्रता । साधिल्या थोर लाभू ये हाता । येचिविषयीं शरकर्ता । गुरू तत्त्वतां म्यां केला ॥ ११५ ॥ तावूनि उजू करितां बाण । दृढ लागलें अनुसंधान । इतुकेनि प्रपंचाचें भान । खुंटलें जाण तयाचें ॥ निशाण भेरी वाजंतरें । रथ गज सैन्य-संभारें । राजा गेला अतिगजरें । नेणिजे शरकारें शरदृष्टी ॥ मागून रायाचा हडपी आला । तो पुसे ये मार्गी राया गेला । येरू म्हणे नाही देखिला । गेला कीं न गेला कोण जाणे ॥ तो शरकारू देखिला दृष्टी । हे ऐकोनि तयाची गोष्टी । जगीं एकाग्रता मोठी । प्रपंच दृष्टी देवों नेदी ॥ १५५–१५८ ( ए. भा. अ. )

# ब्रह्मज्ञानी कसा असतो ?

**—रामकृष्ण परमहंस**

**परब्रह्माची प्राप्ति प्रत्येकाला शक्य आहे. जो मारील त्याची तरवार ! मात्र साधना, तपस्या केल्याशिवाय तुम्हांला कोणतीही गोष्ट साध्य होणार नाहीं. आणि ती साधना सद्‌गुरूच्या संपूर्ण सहकारानें घडली पाहिजे. भगवान रामकृष्ण परमहंस हे ब्रह्मपदाला पोहोंचले होते. ते काय सांगतात पहा.**

'ओम्' या शब्दाचें महात्म्य अपरंपार आहे. ओम् म्हणजेच परब्रह्म. पूर्वकालीन ऋषी-मुनी तो आवाज कानांत घुमत राहावा म्हणून तपस्या करीत असत. ओंकाराचा लाभ सहजासहजी सर्वांना होत नाहीं. त्यासाठीं खडतर तपस्याचरण करावें लागतें व गुरुचरणीं लीन व्हावें लागतें. ती तपस्या पूर्ण होते तेव्हां ओंकार साऱ्या देहांतून घुमूं लागतो. मग तो उच्चारण्यासाठीं प्रयत्न करावा लागत नाहीं. तो आपोआप ऐकूं येऊं लागतो.

## त्या आवाजाचें काय महत्त्व ?

'परंतु काय हो ? त्या आवाजाचें एवढें काय महत्त्व ? तो आवाज घुमत असलेला ऐकण्यांत काय आहे ऐवढें ?' असा प्रश्न कांहीं सज्जनाकडून केला जातो.

त्याचें असें आहे. दूर अंतरावरूनही समुद्राच्या लाटांची गर्जना तुमच्या कानीं पडते नाहीं का ? समुद्र तुमच्या दृष्टीस दिसत नसतो. आवाज तेवढा ऐकूं येतो. मग तुम्हीं काय करतां ? त्या आवाजाच्या रोखानें पावलें टाकीत तुम्हीं मार्ग चोखाळू लागतां आणि मग समुद्राची किंवा वाटल्यास महासागराची म्हणा आणि तुमची भेटगांठ होते.

त्याचप्रमाणें 'ओम्' या आवाजाचें आहे. तो आवाज ऐकूं येऊं लागला. म्हणजे त्या आवाजाच्या धोरणानें तुम्हीं आपली पावलें टाकूं लागतां आणि शेवटीं मग तुमची व ब्रह्माची भेटगांठ होते. 'ओम्' ही त्या परब्रह्माची निशाणी आहे. तें परब्रह्म प्राप्त करून घेणें, त्या पदापर्यंत पोहोंचणें हेंच मानवजन्माचें अंतिम ध्येय आहे. त्यासाठींच तर सारी धडपड करावयाची.

## मीपणाची तातातूट

परंतु नाहीं; जोंपर्यंत तुमच्या ठायीं वास करणाऱ्या अहंकाराची, मीपणाची व तुमची तातातूट झाली नाहीं तोंपर्यंत तो आवाज तुमच्या कानापर्यंत पोहोंचूं शकणार नाहीं. जेव्हां तुमच्या ठायीं असलेल्या मीपणाचा व तूंपणाचा साफ नायनाट होईल, ती जाणीवच जेव्हां सर्वस्वीं नष्ट होईल तेव्हांच ब्रम्हाच्या परिसरांत तुम्हीं वावरूं लागाल. एरवीं नाहीं.

हें पहा कीं आकाशांत सूर्य प्रखर तेजानें तळपत आहे. आपण दहा उघड्या बरण्या पाण्यानें भरून ठेविल्या आहेत. त्या प्रत्येक बरणींत तुम्हांला तेजस्वी सूर्याचें प्रतिबिंब पहायला मिळेल. तेव्हां तुम्हांला काय बरें दिसलें ? आकाशांत तळपणारा खरा सूर्य व खाली दहा बरण्यांतून पडलेलें त्याचें प्रतिबिंब, होय कीं नाहीं ? नंतर त्या दहां-पैकीं नऊ बरण्या एखाद्या सोट्यानें तुम्हीं तडातड फोडून टाकल्या. आतां काय शिल्लक राहिलें ? एक खरा सूर्य व दुसरें त्याचें एक प्रतिबिंब.

203

ती प्रत्येक बरणी म्हणजे आपला जीवच होय. तें प्रतिबिंब पहातां पाहातां तुम्हांला खऱ्या सूर्याचा शोध लागेल.

## जिवाशिवाची गांठ पडेल.

प्रत्येक जीवात्म्याला परमात्म्याचा शोध लावणें, तेथपर्यंत पोहोंचणें अगदीं शक्य आहे.

परंतु त्यासाठीं सद्गुरुच्या नेतृत्वाखालीं आपण साधना ही केलीच पाहिजे. अध्यात्म साधने शिवाय तेथपर्यंत तुम्हीं पोहोंचूं शकणार नाहीं. ती साधना परिपूर्ण झाली म्हणजेच तुम्हीं परमात्म्याच्या परिसीमेंत जाऊन पोहोंचाल; एवढेच नव्हे तर तो परमात्मा तुमच्या आटोक्यांत येईल.

एक बरणी शिल्लक राहिली होती नाहीं का ? तीही शेवटीं फोडून टाकिली म्हणजे मग मागें शिल्लक काय राहिलें. याचें वर्णन करतां येण्यासारखें नाहीं. तें अचिंत्य व अवर्णनीय आहे.

आपला हा जीव अज्ञानांत वावरत असतो. सदासर्वकाळ नाहीं. परंतु कांहीं कालपर्यंत. त्याला ब्रह्माची जाणीवच नसते. अनेक भिन्न, भिन्न स्वरूपें तो आपल्या सभोंवार पहात असतो. त्यांतच तो गुरफटून गेलेला असतो.

## जाणीवेची दशा

आणि मग दैवयोगानें त्याला जाणीव होऊं लागते. त्याला जाणीवेची दशा प्राप्त होते. त्या अवस्थेंत असतांना त्याला समजूं लागतें कीं, ईश्वर सर्व भूतमात्रांत वास करीत आहे. तो माझ्यांत आहे तसाच माझ्या सभोंवार वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तींत त्याचें वास्तव्य आहे.

क्षणभर कल्पना करा कीं, एका माणसाच्या पायाच्या तळव्याला कांटा बोचला आहे. तो आंत शिरल्यामुळें त्याचा पाय ठणकतो आहे. तो काय करील ? दुसरा बारीक टोकाचा कांटा घेऊन त्याच्या सहाय्यानें पायांत शिरलेला कांटा तो काढून टाकील. काट्यानें कांटा काढावा नाहीं का ?

## ज्ञान आणि विज्ञान

म्हणजे काय ? आपण ही भाषा थोडी बदलूं या. आपणास जो अज्ञानाचा कांटा बोचत असतो तो ज्ञानाचा कांटा हातीं घेऊन त्यानें दूर करावयाचा म्हणजे ठणकणें आपोआप बंद होईल.

परंतु याच्याही पलिकडे एक पायरी आहे. ती **विज्ञानाची.** विज्ञानाची प्राप्ति झाली म्हणजे दोन्हीं काट्यांची. अर्थात् अज्ञानाचा व ज्ञानाचा काटा—जरूरी रहात नाहीं.

आणि मग काय ? त्या सुखाला पारावार नाहींसा होतो. त्या सुखाचें, त्या ब्रह्मानंदाचें वर्णन काय करावयाचें, मग तो देवरायाशीं मित्रत्वाच्या नात्यानें गुजगोष्टी करूं लागतो. रात्रंदिवस त्याच्या भगवंताशीं गोष्टी होऊं लागतात. परब्रह्म त्याच्या हातीं आलेलें असतें.

दूध असें असें असतें. शुभ्र असतें, पातळ असतें वगैरे. हें वर्णन ऐकणारा दुधासंबंधीं अज्ञानांतच असतो. जो दूध प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहातो

त्याला दुधासंबंधीं ज्ञान होतें. परंतु जो कोणी तें दूध प्रत्यक्ष प्राशन करतो त्याला ज्ञानाचीच नव्हे तर विज्ञानाची प्रचीति होते.

× × ×

एक सत्पुरुष आहे. तो ज्ञानी आहे. दुसरा एक साधू आहे. तो विज्ञानापर्यंत जाऊन पोहोंचला आहे. जो ज्ञानी साधू असतो त्याचे बसण्यासवरण्याचे, वागण्याचे मार्ग वेगळे असतात. तो मिशांना पीळ देत विचारील, 'काय हो! तुम्हांला कांहीं प्रश्नविश्न विचारायचा आहे का? असल्यास विचारा!'

**अजि म्यां ब्रह्म पाहिलें!**

परंतु ज्यानें ब्रह्म पाहिलें, ज्याच्या आटोक्यांत परब्रह्म आलें, जो त्याच्याशीं अर्जुनाच्या सख्यत्वानें बोलूं शकतो, त्याचें वागणेंसवरणें तुम्हांला एकदम वेगळेंच आढळून येईल.

कधीं कधीं तो दगडासारखा हालचाल न करतां एकाच जागीं बसून राहील. कधीं भुताखेतासारखे चाळे करील, कधीं लहान बालकाप्रमाणें वागेल तर कधीं कधीं एखाद्या वेड्यासारखे तो चाळे करूं लागेल.

त्याची जेव्हां समाधि लागते तेव्हां त्याला कशाचीही जाणीव रहात नाहीं. त्याला शुद्धि नसते. बाह्य जगाशीं त्याचा संबंध संपतो. तो दगडासारखा निश्चळ होतो.

त्याच्या दृष्टीला सर्वत्र ब्रह्म दिसूं लागतें. प्रत्येक वस्तु मात्रांत तो ब्रह्म पाहूं लागतो. त्यामुळें त्याची वागणूक विचित्र होते. तो तुमच्या आमच्यासारखा वागत नाहीं.

त्याला तुमचें पवित्र अपवित्र, शुद्ध आणि अशुद्ध याचें ज्ञान रहात नाहीं. तें ज्ञानच हरपतें. त्याला सारेंच पवित्र व ब्रह्ममय दिसूं लागतें.

त्याला घाण, कचरा हें कांहीं समजत नाहीं. तो कुठें बसेल आणि काय खाईल हें सांगतां येत नाहीं.

तो वेड्याप्रमाणें चाळे करूं लागतो. त्याचें वागणें, त्याच्या हालचाली पाहून लोक त्याला वेडा म्हणूं लागतात.

**देवाचें दर्शन घडल्यानंतर**

वेडाच कां? कधीं कधीं तो लहान बालकाप्रमाणें वर्तन करूं लागतो. नाहीं लाज-लज्जा, नाहीं कसलें बंधन, नाहीं द्वेष, नाहीं मत्सर.

अशी ही स्थिति वाट्याला केव्हां येते माहीत आहे? देवाचें दर्शन घडल्यानंतर!

एखादी लोहचुंबकानें वास्तव्य केलेली एखादी टेकडी असते. तिच्या आजूबाजूनें एखादी बोट जाऊं लागली म्हणजे ती खिळखिळी होऊन हेलकावे खाऊं लागते. तिचें खिळे कोसळून पडूं लागतात. त्याचप्रमाणें ज्यानें ब्रह्म पाहिलें त्याच्याठायीं राग, द्वेष किंवा इतर कोणतेही मनोविकार राहू शकत नाहीं.

शेतांत भात, धान्य पेरलें म्हणजे त्याचे रोप वर येऊं लागतात. परंतु उकडलेलें भात किंवा धान्य पेरून पहा. त्याचे रोप बनणार नाहींत; कारण त्यांत जीव नसतो.

ज्याला देवाचें दर्शन घडलें त्याच्याठायीं 'मी' केवळ नामधारी असतो. तो कोणाच्याही वाट्यास जात नाहीं. त्याचा कोणाला अपाय होऊं शकत नाहीं. झाडाच्या फांद्या मोडून पडलेल्या असतात. त्यांच्या खुणा तेवढ्या मागें शिल्लक राहिलेल्या असतात.

# गुरुदेवांनीं दिलेला कानमंत्र

*******************************

सबूरी सद्गुणांची खाणी । सद्विचाराची ही राणी ।
निष्ठा आणि ही सख्या बहिणी । जीवप्राण दोघींसी ॥
सबूरीवीण मनुष्यप्राणी । स्थिति तयाची दैन्यवाणी ।
पंडित असो का मोठा सद्गुणी । व्यर्थ जिणें हिजवीण ॥

संगमनेर येथें रहाणारे खाशाबा देशमुख. त्यांची आई मोठी देवभक्त होती. तिचें नांव होतें राधाबाई. ती वयातीत होती. तिचा ईशचरणीं भक्तिभाव दांडगा होता. तिनें श्रीसाईबाबांच्या लीला अनेकांकडून ऐकिल्या होत्या. एकदां संगमनेर येथील कांहीं भक्तमंडळी शिरडीस साईबाबांच्या दर्शनार्थ निघाली. त्यांच्याबरोबर राधाबाई शिरडीस आली व तिनें बाबांचें दर्शन घेतलें. त्या दर्शनानें तिला अत्यानंद झाला. मनांतली इच्छा पूर्ण झाल्यासारखें वाटलें. परंतु तिच्या मनाच्या कोपऱ्यांत आणखी एक इच्छा दडून राहिली होती. आपला मरणकाळ जवळ आला आहे हें तिनें ओळखलें होतें. मरणापूर्वी गुरुपदेश घेऊन पुण्यपावन व्हावें व जन्माचें सार्थक करावें असें कितीतरी दिवसांपासून तिला वाटूं लागलें होतें. तिचा तो भोळाभाव बाबांचें दर्शन घडतांच जागा झाला. बाबांच्या उपदेशाशिवाय गति नाहीं असें तिला अत्यंत तीव्रतेनें वाटूं लागलें. गुरुशिवाय त्राता नाहीं. गुरु हेंच सर्वस्व. त्याचा ‘ कानमंत्र ’ घ्यावा म्हणजे आपला पुढील मार्ग मोकळा होईल असें तिच्या मनानें घेतलें होतें. बाबांना पहातांच तिला दुसरें कांहीं सुचेना. ‘बाई वयानें म्हातारी । निष्ठा अत्यंत बाबावरी । मिळावा उपदेश कांहींतरी । निर्धार अंतरीं हा केला ॥

## राधाबाईचा उपवास

तिला वाटूं लागलें कीं बाबा हेच आपणास कानमंत्र देण्यास समर्थ आहेत. आपली अखेरी आलेली आहे. आतां बाबांची सेवा करून त्यांना प्रसन्न करून घ्यायचें. त्यांची कृपा झाल्याशिवाय येथून हालायचें नाहीं असा तिनें मनाशी निर्धार केला. इतर कोणाचाही मंत्र घ्यावयाचा नाहीं. बाबा हेच सर्व समर्थ आहेत. त्यांचा मंत्रच तारक होणार आहे. आपल्या मनाशीं दृढनिश्चय करून राधाबाई घरणें धरून बसली. बाबांचा गुरुमंत्र मिळेपर्यंत तिणें खाणेंपिणें वर्ज केलें.

आधींच म्हातारपण आलेलें. त्यामुळें तिचीं सारीं गात्रें विगलित झालेली होतीं. अन्नाला स्पर्श न करतां केवळ थोड्याशा पाण्यावर तिनें कसें बरें जिवंत रहावयाचें ! बाबांनीं कानमंत्र दिला पाहिजे; त्याशिवाय अन्नाला बिलकुल स्पर्श करायचा नाहीं, हा तिचा निर्धार सर्वांना जाहीर झाला.

अशा स्थितींत तीन दिवस त्या बाईनें कसेबसे ढकलले अहोरात्र बाबांचें स्मरण. तिच्यानें हालचाल करवेना. सभोंवार जमून बाया बापड्या करुणेच्या दृष्टीनें तिच्याकडे

पाहूं लागल्या. सर्वांच्या डोळ्यांत पाणी साचूं लागलें. ती म्हणे कीं, मी शिरडीला या वयांत आल्यें ती कशासाठीं ? बाबांवर माझा सारा भाव. त्यांचा कानमंत्र घेतल्याशिवाय परत जाणें म्हणजे तें मरणाहून मरण आहे. त्यापेक्षां शिरडींतच त्यांच्या पायांजवळ मरण आलेलें काय वाईट ? तिनें अन्नपान केलें वर्जन । ऐसें तप तें तीन दिन । करितां कष्टली देशमुखीण । उदासीन बहु झाली ।।

## साईबाबांस विनंती

माधवराव हे त्यावेळीं शिरडींत बाबासन्निध होते. त्यांचें म्हातारीकडे एकसारखें लक्ष होतें. म्हातारीचा निर्धार व त्यापायीं तिची झालेली ती करुणास्पद अवस्था पाहून ते चिंतेंत पडले ! काय करावें हें सुचेना व म्हातारीची समजूत कांहीं केल्या पडेना.

शेवटीं तें मशिदींत बाबा बसले होतें तेथें गेले. त्यांच्याजवळ जाऊन बसले. त्यांचें नेहमीं प्रमाणें कुशल विचारणें झालें. बाबांनीं म्हातारीचें दुःख अंतर्ज्ञानानें पूर्वींच जाणलें होतें. थोडें बोलणें झाल्यानंतर माधवरावानीं त्यांना म्हातारीची हकिगत सांगितली. तिचें मरणांतिक चालू असलेलें उपोषण, तिचा निर्धार व तिची निष्ठा या सर्व गोष्टी बाबांना निवेदन केल्या व म्हणाले, बाबा तुमचें गौडबंगाल आम्हाला कांहीं समजत नाहीं तुमच्यावर त्या बाईचा सारा हेतु आहे. तिनें अन्नपाणी सोडलें आहे. तिची अवस्था फार कठीण दिसते. म्हातारी ती परम हट्टी ! तुझिया पायीं निष्ठा कट्टी । तूं तों तीस न पाहसी दृष्टी । करितोस कष्टी कां तीस ।। आधींच तें शुष्क काष्ठ । दुराग्रही महा खाष्ट । अन्नाविणें वाटतें स्पष्ट । प्राणची नष्ट होतील ।।

ती मेली गेली तर सारें दोषांचें खापर तुमच्या आमच्या डोक्यावर फुटणार आहे ! लोक म्हणतील, म्हातारी बाबांच्या उपदेशाची इच्छा उराशी बाळगून शिरडीला पायपिटी करीत गेली. परंतु बाबाना मात्र तिची दया आली नाहीं. तिच्या मरणास ते कारण झाले, असें सारें लोक म्हणतील बाबा ! अशा प्रकारचा लोकापवाद आपण कां बरें स्वतःवर ओढवून घेतां ? तिला दोन शब्द सांगून तिच्यावर कां बरें कृपा करीत नाहीं ? तिच्यांत आतां बिलकुल त्राण उरलेलें नाहीं. तिचे प्राण कासावीस होऊं लागले आहेत ! आतां तो फार वेळ जगेल असें वाटत नाहीं. तरी तिच्यावर करा एकदांची कृपा.

बाबांचें दयाळू अंतःकरण ती दीनवाणी ऐकून एकदम द्रवलें. मग त्यांनीं काय केलें ?

' पुढें बाबांनीं प्रेमळपणें । हांक मारिली तिजकारणें । ' आई तूं कां गे घेतलें धरणें । कां तुज मरणें आठवलें ।।

## गंभीर प्रसंग

कोणीहि प्रौढ, वयस्कर बाई पुढें आली असतां बाबा तिला ' आई ' म्हणून हांक मारीत असत व पुरुषांस काका, बापू, भाई वगैरे गोड व माननीय नांवांनीं संबोधीत असत. बाबांचें अंतःकरण जसें प्रेमळ तसेंच त्यांचें बोलणेंहि मंजुळ असे. दुःखितांचें, रंजल्या गांजलेल्यांचें दुःख दूर करावें यासाठीं तर त्यांचा अवतार !

असो; अशा रीतीनें राधाबाईला आई या गोड नांवानें हांक मारून तिची अर्धी अधिक चिंता बाबांनीं दूर केली. तिला आणून बाबासन्निध बसविण्यांत आलें होतें. तो प्रसंग अत्यंत गंभीर तसाच तो क्षण अतीव महत्त्वाचा होता. त्याच क्षणीं बाबांनीं तिला आपल्या गुरुत्वाची गुरुकिल्ली उघड केली. ती किल्लीच तिच्या हातीं मोठ्या प्रेमानें दिली म्हणाना !

बाबा राधाबाईला मोठ्या प्रेमानें म्हणाले, 'आई ! खरंच सांग कीं हें तूं काय मांडलें आहेस ? विनाकारण आपल्या जिवाचे हाल कां म्हणून करून घेत आहेस ? मी बोलून चालून एक फकीर आहे. चार घरीं भाकरीचे तुकडे मागून जमा करतों आणि निर्वाह करतों. माझ्यावर रागावूं नकोस. तूं मला आईसमान आहेत. मला तूं आपला लेक समज आई ! तुझ्याशीं बोलायला मला कसला आला आहे संकोच ! तुला आतां मी एक मोठी नवलाची गोष्ट सांगणार आहे. ती ऐकून तुला आनंद झाल्याशिवाय व समाधान वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

आई ! तुला मी काय सांगूं ? माझा एक गुरु होता. तो मोठा अवलिया होता. दयेचा जणुं महासागर ! मी त्याची सेवा करून करून थकलों. चांगली एक निष्ठापूर्वक त्यांची मी सेवा केली. मनींची एकच इच्छा होती कीं, त्यांनीं कृपावंत होऊन मला ' कानमंत्र ' द्यावा; मी सेवा करून थकलों तरी तो कानमंत्र कांहीं केल्या देईना. मीही निर्धार केला कीं, कानमंत्र घ्यायचा तर यांचाच. यांची पाठ कांहीं केल्या सोडायची नाहीं. त्यासाठीं आपलीही कष्ट घ्यावे लागले तरी ते घ्यावयाचे.

## दोन पैशांची मागणी

माझा हा निर्धार पाहून त्यांनीं मग काय केलें माहीत आहे ? प्रथम त्यांनीं माझें मुंडण करविलें व नंतर माझ्याजवळ फक्त दोन पैसे मागितले. दोन पैसे म्हणजे कांहींच नाहीं. मी ते तात्काळ देऊन टाकले. नंतर पुन्हां मला सांगा ना मंत्र म्हणून त्यांच्याकडे मागणी केली. एवढे मोठे गुरु ! त्यांना इच्छा कशाची असणार ? असें असतां दोन पैसे मागतात आणि तेही आपल्या शिष्याकडे ! अशा गुरूला निःस्वार्थ म्हणायचें तरी कसें ? अशा प्रकारची शंका कोणाच्या मनांत येणार नाहीं ? परंतु तशी शंका येण्याचें कांहींच कारण नाहीं. ती पैशांची भाषा नाणें बाजारांतील नव्हती. त्यांनीं दोन पैसे मागितले त्याचा अर्थ फार वेगळा होता. त्यांना मला माझ्या कर्तव्याची जाणीव करून द्यावयाची होती. त्यारूपानें कर्तव्याचें सोनें त्यांना माझ्या पदरांत घालावयाचें होतें. कोणतें तें सोनें ? त्यांनीं ते जे दोन पैसे मागितले ते म्हणजे निष्ठा आणि सबुरी हेच होत. माणसानें आपल्या गुरूवर संपूर्ण निष्ठा ठेवली पाहिजे व धैर्यानें वागलें पाहिजे. सबुरी पाहिजे. उतावीळपणा कामाचा नाहीं. त्यामुळें कार्यहानी होते. आणि या दोन्हीं गोष्टी त्यांनीं मागण्यापूर्वीच मी त्यांना देऊन टाकल्या होत्या. परंतु हें इतरां कारणें होतें. माझ्या गुरुजींना इतरांनाही धडा द्यावयाचा होता. त्या गुणांची कांस मी धरली व त्यांच्या सान्निध्यांत वावरलों त्यामुळें तर ते माझ्यावर प्रसन्न झाले. प्रसन्न होऊन त्यांनीं मला दिलेला तोच गुरुमंत्र होता.

## सबुरी तेथें यश

सबुरी म्हणजे धैर्यानें वागणें, धीर धरून रहाणें. या गुणाला आपण नेहमीं चिकटून राहिलें पाहिजे. कोणतेंही लहान मोठे संकट येवो. ज्याच्याजवळ भरपूर धैर्य आहे तो पैलतीरास पोहोंचल्याशिवाय केव्हांही रहाणार नाहीं. तो सद्गुण म्हणजे पुरुषांचें पौरुष्य, पुरुषार्थंच होय. ज्याच्या अंगी तो सद्गुण आहे त्यालाच या जगांत पुरुषार्थ गाजवितां येईल. ज्यानें त्या गुणाची कांस धरली त्याच्या वाट्यास दुःख, ताप, आपत्ति, दैन्य, भय, भीति यांपैकीं कांहीएक येणार नाहीं. जेथें सबुरी नांदत आहे तेथें यश हें ठेवलेलेंच आहे. जेथें सबुरी आहे तेथें संकटें वाऱ्यास उभीं रहाणार नाहींत. जेथें सबुरी आहे तेथें अविचारास बिलकुल आसरा मिळणार नाहीं. थोडक्यांतच सांगावयाचें तर ' सबुरी सद्गुणांची खाणी । सद्विचाराची ही राणी । निष्ठा आणि ही सख्या बहिणी । जीव प्राण दोघींची ।। सबूरीवीण मनुष्य प्राणी । स्थिति तयाची दैन्यवाणी । पंडित असो कां मोठा सद्गुणी । व्यर्थ जिणें हिजवीण ।। '

सद्गुरुचें महात्म्य कुठवर सांगावें? गुरुजी कितीही महाप्रतापी असल तरी आपल्या शिष्याची धारणाशक्ति ते पहात असतात. त्यांची अपेक्षा शिष्य ज्ञानी व्हावा, प्रज्ञासंपन्न व्हावा हीच असते. त्याची निष्ठा परिपूर्ण आहे कीं नाहीं, त्याच्या गाठीशीं धैर्याचें, सबुरीचें भांडवल भरपूर आहे कीं नाहीं. हेंच ते पहात असतात. दगड आणि हिरकणी दिसायला सारखीं दिसतात. सहाणेवर घासलें असतां दोन्हीं उजळलेली दिसतात; परंतु दगड तो दगड आणि हिरकणी ती हिरकणी. हिऱ्याचें तेज दगडाला कधींतरी येईल काय? दोघांवरही उजळण्याचे, घांसण्याचे संस्कार केलें तरी घांसले असतां हिऱ्याला जें तेज चढतें तें दगडाला चढणें कधीं तरी शक्य आहे का? हिरा आपल्या अंगभूत तेजानें प्रकाश देईल तर दगड कितीही घासला तरी तो गुळगुळीत होईल एवढेंच.

## गुरुजींबद्दल तन्मयता

सतत बारा वर्षें मी गुरुमाऊलीच्या सान्निध्यांत होतों. त्यांच्याबरोबर माझें उठणें बसणें व फिरणें सवरणें होत असे. त्यांनींच मला लहानाचा मोठा केलें. अन्नवस्त्राच्या बाबतींत त्यांनीं केव्हांही कसूर होऊं दिली नाहीं. माझ्याबद्दल त्यांच्या ठायीं अपार प्रेम होतें. त्यांच्या प्रेमळ सहवासांत मी वाढलों. ते भक्तिप्रेमाचे केवळ पुतळाच होते. भक्तिभाव त्यांच्याठायीं अपरंपार होता. त्यांना शिष्यासंबंधीं खराखुरा जिव्हाळा वाटत असे. माझ्या गुरुजींसारखा गुरु मिळणें कठीण आहे. त्यांच्या सहवासाचा सुखसोहळा मी कुठवर वर्णन करूं? किती अपरंपार प्रेम होतें त्यांचें माझ्यावर! त्या प्रेमाची आठवण झाली म्हणजे अंतःकरण भरून येतें. ध्यानस्थ बसलेल्या अवस्थेंत त्यांचें मुख-कमल पहातां पहातां डोळ्यांनें पारणें फिटत असे. त्यांना सोडून दुसरें कांहीहि पहाणें मला आवडत नसे. किती आनंद वाटत असे त्यावेळीं! एकमेकांच्या सहवासानें आम्हां दोघांनाहि पराकाष्ठेचा आनंद वाटत असे. रात्रंदिवस माझी नजर त्यांच्यावर खिळून रहात असे. त्या सुखापुढें मला अन्य कोणत्याहि गोष्टींत सुख समाधान वाटत नसे. मी तहानभूक विसरून जात असें. गुरुमाऊली जरा दृष्टिआड झाली असतां माझा जीव

तळमळत असे; मन कावरेंबावरें होत असे. 'तयावीण नाहीं ध्यान। तयावीण न लक्ष्य आन। तोच एक अनुसंधान। नवलविंदान गुरुचें ॥' अशी माझी गुरुजींच्या बाबतींत तन्मयता झालेली होती.

माझ्या गुरुची तरी यापेक्षां अधिक कोणती अपेक्षा होती? माझ्या बाबतींत यापेक्षां दुसरी कोणतिही अपेक्षा नव्हती. त्यानीं माझी केव्हांही उपेक्षा केली नाहीं. माझ्यावर कोणत्याहि प्रकारची, लहान मोठी संकटें येवोत; माझा बचाव करण्यासाठीं ते नेहमी तत्पर असत. मी कधीं त्यांच्या पायांजवळ बसलेला असें. कधीं अलिकडे तर कधीं नदीपलिकडे, ते कुठेंही असोत; कुठेंही जावोत. सदासर्वकाळ मी त्यांच्याजवळच असावयाचा. त्यांच्या सहवास सुखास मी केव्हांही अंतरलों नाहीं. त्यानी आपल्या कृपेची पाखर माझ्यावर सदैव घालून ठेविली होती. तिच्या प्रकाशांत मी रात्रंदिवस वावरत होतो.

**कासवीची प्रेमळ दृष्टि**

कासवी आपल्या छबुकड्याशीं कशी वागते त्यांचें प्रेमानें पालन कसें करते माहीत आहे? तिची प्रेमपूर्ण दृष्टी हाच त्या पोरांचा चारा व खाणेंपिणें! प्रेमळ दृष्टिक्षेपानें ती आपल्या पोरांचा संभाळ करते. माझ्या गुरुमाऊलीचीही तीच तऱ्हा होती. त्यांच्या प्रेमळ दृष्टीखाली माझा विकास होत गेला. तेव्हां माझ्या आई तुला मी आणखी काय बरें सांगूं? 'आई, या मशिदींत बैसून। सांगतों तेंहि मानी प्रमाण। गुरूनें न फुंकिले माझे कान। तुझे मी कैसेनें फुंकरूं॥ कासवीची प्रेमदृष्टि। तेणेंच पोरांसी सुखसंतुष्टी। आई, उगीच किमर्थ कष्टी। उपदेश गोष्टी नेणें मी॥

कासवी नदीच्या एका तीरावर असते तर तिचीं पोरें असतात दुसऱ्या तीरावर! परंतु तिच्या प्रेमळ दृष्टींतच तीं आनंदांत असतात. तेवढ्यावर त्यांचें पालनपोषण आपोआप होत असतें. मंत्राच्या गोष्टी व्यर्थ आहेत. प्रेम पाहिजे, भक्तिभाव पाहिजे, निष्ठा पाहिजे! त्यांत सर्व आलें. तोच महामंत्र होय. तेव्हां माझ्या आई! तुला जें कांहीं सांगायचें तें मी सांगितलें. आतां जा पाहूं आणि अगोदर भोजन करून त्या जीवात्म्याचें समाधान कर. हा बहुमोल जीव आहे. त्याला अपाय होईल असें कांहीं करूं नको. माझ्यावर पूर्ण श्रद्धा ठेव. सारें लक्ष माझ्याकडे लागून राहूं दे. एवढें केलेंस म्हणजे परमार्थ तुझ्या हातीं येईल. शेवटीं आई! तुला मी आणखी काय सांगू? आतांपर्यंत जें कांहीं बोललों त्यांचें सार सर्वस्व सांगून टाकतों.

**तूं मजकडे अनन्य पाहीं। पाहीन तुजकडे तैसाच मीही। माझ्या गुरूनें अन्य कांहीं। शिकविलें नाहींच मजलागीं॥ नलगे साधन संपन्नता। नलगे षट्शास्त्र चातुर्यता। एक विश्वास असावा पुरता। कर्ता हर्ता गुरू ऐसा॥ म्हणून गुरूची थोर महती। गुरू हरिहर ब्रह्ममूर्ति। जो कोण जाणे तयाची गति। तो एक त्रिजगतीं धन्य गा॥**

राधाबाईचें समाधान झालें. बाबांच्या पायावर मस्तक ठेऊन ती उपवास सोडण्यासाठीं आपल्या निवासस्थानीं गेली. —**श्रीसाई सच्चरिताच्या आधारें**

# एका संन्याशाची गोष्ट

**भगवान् रामकृष्ण परमहंस यांचीं, मनाचा ठाव घेणारीं बोधवचनें म्हणजे उपनिषदेंच होत. श्री. सी. राजगोपालाचारी यानीं त्यांना सुंदर साज चढविला असून त्यांचा अनुवाद आमच्या वाचकांसाठीं क्रमशः देण्यांत येत आहे.**

**—संपादक**

कोणी एक संन्यासी एका मंदिराच्या जवळपास असलेल्या एका घरांत रहात असे. त्याच्या घरासमोर एक वेश्येचें घर होतें. त्या घराला रोजच्या रोज कितीतरी लोक भेट देत असत. इतक्या लोकांनीं पापकर्दमांत बुडावें, या जाणीवेनें त्या संन्याशाला पराकाष्ठेचें दुःख होत असे! कधीं कधीं हें दुःख त्याला असह्य होई. एके दिवशीं त्याच्यानें रहावेना. त्या वेश्येला हांक मारून त्यानें बोलाविलें आणि तिची खूप निर्भत्सना केली. "किती पापी आहेस ग तूं! किती गलिच्छ जीवन आहे तुझें! दिवस नाहीं, रात्र नाहीं, चालले आहेत तुझे ते गलिच्छ व्यवहार! एक दिवस तुला मृत्युचें बोलावणें येईल त्यावेळीं तुझी काय बरें स्थिति होईल? दया येते मला तुझी!'

### वेश्या बेचैन झाली

संन्याशाचे ते शब्द त्या वेश्येच्या अंतःकरणाला जाऊन झोंबले. ती बेचैन झाली. स्वतःच्या वाट्यास आलेल्या स्थितीबद्दल ती अत्यंत दुःखी कष्टी झाली. ती देवाधिदेवाची अंतःकरणपूर्वक प्रार्थना करूं लागली कीं "हे भगवंता! या पापी जीवनापासून माझें रक्षण कर, तुझ्याशिवाय कोण आहे माझा त्राता!"

अशा रीतीनें ती रोजच्या रोज भगवंताची करुणा भाकायची. तिला पोटापाण्याचा दुसरा कांहींच व्यवसाय नव्हता. काय करावें हें तिला सुचेना. दुसरा कांहींच मार्ग न सांपडल्यामुळें तिनें आपला रोजगार धंदा पूर्ववत् चालू ठेविला.

दिवसा काय किंवा रात्रीं काय ती ईश्वराची करुणा भाकायची. म्हणायची, 'अरेरे! काय करूं मी! मी असहाय्य आहें. पोटासाठीं मला करतां येण्यासारखा दुसरा एखादा रोजगार असता तर या कर्दमांत मी कशाला लोळलें असतें! केवळ निरुपायानें हें पापी जीवन मला कंठावें लागत आहे. देवा! तूंच माझा त्राता!'

### पालथ्या घड्यावर पाणी

संन्याशाचें लक्ष तिच्या घराकडे नेहमीं लागून राहिलेलें असे. त्यानें पाहिलें कीं, इतकें सांगून-सवरूनही ही बाई आपला धंदा कांहीं सोडीत नाहीं. माझा उपदेश म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी ! ठीक आहे; चालूं द्या. रोजच्या रोज, महिन्यांचे महिने तिच्या घरीं किती माणसें येतात, त्याचा आपण हिशोब तरी ठेऊं या. तिच्या पापांचा डोंगर किती वाढला हें तरी समजून येईल ?'

आणि त्याच दिवसापासून त्या सन्याशाचा नित्यक्रम सुरू झाला. कसला नित्यक्रम ? त्यानें किती तरी दगड जमा केले आणि आपल्या घराच्या एका बाजूला वेश्येच्या घरीं रोज जितकीं माणसें येतील तेवढे खडे एकत्र ठेवायचे. आणि हा उपक्रम रोजच्या रोज न चुकतां सुरू झाला ! तो दगडांचा ढीग रोजच्या रोज फुगत वाढत चालला ! कोणे एके दिवशीं एखाद्या लहानशा डोंगराप्रमाणें ती दगडांची रास दिसूं लागली ! त्याचें त्यालाच आपल्या या महाउद्योगाचें आश्चर्य वाटूं लागलें !

### हा पहा पापांचा डोंगर

पुन्हां एकदां त्या वेश्येला त्यानें हांक मारून आपल्या घरीं बोलाविलें आणि दारांतील त्या डोंगराकडे बोट दाखवून तो संन्यासी म्हणाला, ' हा पाहिलास का तुझ्या दैनंदिन पापांचा डोंगर ! त्यावरून तरी तुझ्याकडून घडणाऱ्या पापांची तुला सहज कल्पना करतां येईल. मी केलेला उपदेश ध्यानीं न घेतां तूं आपला तो पापी व्यवसाय पूर्ववत् चालूच ठेविला आहेस. काय म्हणायचें तुला ! धोक्याची सूचना दिली असतांहि त्याकडे लक्ष न देतां तूं केवळ्या पापाच्या राशी रचीत आहेस याची यावरून कल्पना कर. तुला यापुढील काळांत किती दुःखताप व हालअपेष्टा भोगाव्या लागणार आहेत याची अजून तरी कल्पना कर. अशा स्थितींत तुला कसा बरें मोक्ष मिळेल ? तो तुझ्या वाट्याला येणें शक्य आहे का ? आपल्या हातानें तूं सत्यानाश करून घेतलास !'

### वेश्येची प्रार्थना

त्या संन्यासाची ती कामगिरी—तो दगडांचा प्रचंड ढिगारा पाहून व आपल्या हातून घडलेल्या पापांच्या राशीची कल्पना होऊन ती वेश्या थरथर कापूं लागली ! म्हणाली, 'हे भगवंता ! आतां मी काय करूं ?' त्याच दुःखावेगांत तिनें कसेंबसें आपलें घर गांठलें. तिला असह्य वेदना होऊं लागल्या. स्वतःचें भीषण भवितव्य तिला दिसूं लागलें. ती दुःखां-भारानें बेभान झाली. ओक्साबोक्सी रडूं लागली. प्रार्थना करूं लागली ' भगवंता ! नको हें जीवन ! तें काय जाळायचें आहे ! कृपावंता ! तूं अनाथांचा नाथ आहेस ! तुझा हात माझ्यापर्यंत पोहोंचूं दे. मला वर उचलून घे. या चिखलांतून मला वर काढणारा तुझ्या-शिवाय दुसरा कोणी नाहीं. माझें जीवन मला अगदीं नकोसें झालें आहे. येथेंच त्याचा अंत होऊं दे !' असें म्हणून तिनें जमिनीवर अंग टाकलें तें कायमचेंच ! नंतर तिला शुद्ध आली नाहीं. त्याच स्थितींत तिचा अंत झाला.

भगवंताला तिची करुणा आली. आणि त्या पश्चात्तापदग्ध अबलेला तो आपल्या चरणापाशीं घेऊन गेला.

## हा काय योगायोग

काय योगायोग पहा ! त्या सन्यशाचे प्राणही त्याच्या देहांतून त्याच रात्रीं निघून गेले !

आणि केवढी आश्चर्याची गोष्ट पहा ! यमदूतांनीं संन्याशाच्या आत्म्यास खेंचीत खेंचीत नर्कवासांत नेलें आणि आपल्या परिस्थितीबद्दल जी पश्चात्तापानें जळत होती तिच्या आत्म्याला यमदूत वैकुंठास घेऊन जाऊं लागले !

वेश्येचा आत्मा वैकुंठाच्या मार्गानें जात असल्याचें पाहून संन्याशाचा आत्मा तडफडून ओरडत होता, 'हे पापी वेश्ये ! तूं कशी काय स्वर्गारोहण करूं शकतेस ? तुझा नाहींच तो हक्क ! तुझ्या पाठीशीं पापाचा केवढा मोठा डोंगर आहे ! मी नाहीं का दगडांची रास रचून तुझ्या तो नजरेला आणिला ? माझा म्हणशील तर प्रश्नच वेगळा ! मी पवित्र जीवन कंठणारा एक संन्याशी ! माझ्या हातून पाप कधींही घडलें नाहीं असें असतां मला नरकांत लोटून देवदूत तुला मात्र वैकुंठास घेऊन चालले आहेत ! हा खासा न्याय म्हणायचा ! धर्म कशाला म्हणायचें हें यमधर्माला समजूं नये याचें आश्चर्य वाटते !"

## देव प्रेम पहातो

संन्यासी गोंधळून गेला होता. विष्णूच्या दासांनीं त्याला गांठून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले," बाबारे उगाच संतापूं नकोस, देव कोणाची विद्वता पहात नाहीं. तो प्रेम पहातो. तो विद्वत्तेचा व बाह्य देखाव्याचा भोक्ता नसून खऱ्या प्रेमाचा, भक्तिभावाचा भुकेला आहे. तुझा बाह्यात्कारीं देखावा ठीक होता. तोच तेवढा पाहून घ्यावा. परंतु अंतर निर्मळ पाहिजे, भक्तिभावानें भरलेलें पाहिजे. त्याचें रे काय ? तूं सन्याशाचीं भगवीं वस्त्रें परिधान केलीस व बाह्यांग ठीक शोभविलेंस ! तुला बाह्य देखावा सजवून लोकांकडून मान मिळवावयाचा होता. तशानें माणसें फसूं शकतील; परंतु देव कसा बरें फसेल ? तो पहा तुझा देह कसा पडलेला आहे ! होय; तो शुद्ध व पवित्र होता. आणि त्यामुळेंच त्याला लोकांनीं हाराफुलांनीं सजविला व त्याला वाजत गाजत घेऊन जात आहेत. परंतु तुझा आत्मा मात्र तसा नव्हता. तो तुझ्या कृतीमुळें डागाळला गेला होता. यामुळें त्याला नरकाकडे नेण्यांत आलें. आतां त्या वेश्येच्या देहाकडे पहा. त्या देहाकडून नाना पापें घडलीं. तो गिधाडांचें व कावळ्यांचें भक्ष होऊन राहिला आहे. त्या देहाला अग्नी द्यावा असेंही कोणाला वाटलें नाहीं ! ही झाली तिच्या देहाची स्थिति; परंतु तिचा आत्मा पवित्र व निर्मळ राहूं शकला; आणि त्यामुळें आम्हीं त्याला भगवंताजवळ वैकुंठाला घेऊन जात आहोंत. तुम्हीं त्या बाईचीं पापें मोजीत बसला होतां, नाहीं का ? तुम्हीं त्या उद्योगाला वाहून घेतल्यामुळें

त्या पापांचा संसर्ग तुम्हांलाही झाला. तीं पापें तुम्हांला चिकटलीं. त्या बाईला मात्र हातून घडणाऱ्या पापांबद्दल तळमळ लागून राहिली होती; ती दुःखीकष्टी होऊन देवाचा धांवा करीत होती; त्याची अहोरात्र करुणा भाकीत होती. त्यामुळें त्या पापांचा संसर्ग तिला बाधूं शकला नाहीं. तिचा आत्मा पवित्र राहूं शकला. तुम्हीं मात्र तिच्या पापांचा अहोरात्र ध्यास बाळगून तीं मोजीत, घोकीत बसण्याकडे आपलें लक्ष सर्वस्व लाविलें. त्यामुळें तीं तुमच्या बोकांडी बसलीं.

**परक्यांच्या पापांची विवंचना नको**

जो भक्त असतो तो दुसऱ्याकडून किती पापकर्मे घडलीं, याची विवंचना करण्यांत आपला वेळ दवडीत नाहीं. देवाच्या लीला अगाध आहेत. तो आम्हांला निरनिराळ्या कार्यांकडे वळवितो व आमची कसोटी लावून पहातो. आमच्या ठिकाणीं असलेल्या सद्भावना व दुर्वासना त्यालाच समजूं शकतात. दुसऱ्यांच्या दोषांचा किंवा पापकर्मांचा विचार आम्हीं कां म्हणून करावा ? आम्हीं सरळ मार्गानें वागावें; पवित्र वातावरणांत वावरावें आणि दुसऱ्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष करावें. त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगावी.



## दैवी शक्तीचा प्रभाव

दैवी शक्ति अत्यंत प्रभावशाली आहे. ती तुमच्यासाठीं सर्व कांहीं करील; परंतु केव्हां ? तुमचें अंतःकरण पवित्र बनलें पाहिजे. त्यांत पापांचा मळ जरासुद्धां शिल्लक रहातां कामा नये. तुमचें अंतर जागृत झालें पाहिजे. तुम्हीं शरणागतीचा—जें जें करायचें तें भगवंताच्या नांवें व केवळ त्याच्यासाठींच करावयाचें—मार्ग स्वीकारला, सर्वस्व त्याच्या चरणीं अर्पण केलें, सारी श्रद्धा व भरिभार त्याच्यावर टाकला म्हणजे तोच तुमची काळजी वाहूं लागतो.

प्रथम हें सर्वपरीनें शक्य होणार नाहीं; परंतु ज्या प्रमाणांत समर्पण मंत्राचा आचार तुमच्याकडून घडेल त्या प्रमाणांत दैवी शक्तीचा प्रभाव दिसून येऊं लागेल.

तुमच्याकडून एवढें घडलें म्हणजे तुम्हीं आणखी कोणतीही तपस्या करण्याची जरूरी नाहीं.

—श्री अरविंद

# सद्गुरु वाचूनी सांपडेना सोय

— द. शं. टिपणीस

गुरु प्रत्यक्ष ईश्वर । ब्रह्मा विष्णु महेश्वर ।
गुरुचि वस्तुतः परमेश्वर । ब्रह्म परात्पर गुरुराय ॥

**आषाढ महिन्यांतील पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा होय. तिला व्यास पौर्णिमाही म्हणतात. अध्यात्मांतील वाटचाल करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस हा दिवस अत्यंत पवित्र आहे. या दिवशीं आपल्या गुरूचें पूजन, भजन, मनन व चिंतन भक्तानें करावयाचें असतें. गुरुवर पूर्ण श्रद्धा वा निष्ठा ठेवून या गोष्टी केल्या तर गुरुकृपा होऊन अध्यात्माची आपली वाटचाल यशस्वी होईल. सद्गुरूच्या सेवेंत निष्ठेला अत्यंत महत्त्व आहे.**

निष्ठा ही अनुभवामुळें उत्पन्न होते. परका माणूस आपणांस भेटल्यावर प्रथमदर्शनींच कांहीं काल त्याच्या संगतींत गेल्यावर अनुभवाप्रमाणें आपण त्यावर विश्वास टाकूं वा टाकणार नाहीं. अनुभवानें त्याचें अंतरंग, त्याचे विचार, त्याचें सामर्थ्य कळून येतें व मग आपण त्यावर विश्वास ठेवतों. त्याचप्रमाणें आपल्या सद्गुरूचें सामर्थ्य, त्याचें अंतरंग याची आपणास जाणीव झाल्यास आपल्या गुरूबद्दल नितांत श्रद्धा आपल्या ठिकाणीं निर्माण होईल. म्हणून सद्गुरु कसे असतात, त्यांच्या ठिकाणीं कोणते सामर्थ्य असतें, तें आपणासाठीं काय करूं शकतात याचें स्मरण, चिंतन आजच्या गुरूपौर्णिमेच्या मंगल प्रसंगीं करूं या व हीच मानसिक दक्षिणा गुरूचरणीं अर्पण करूं या.

## नियत व अनियत गुरू

जगांत गुरु भरपूर आहेत. ऐहिक सुखाची प्राप्ति करून देणाऱ्या ज्ञानाचें दान करणारे व आचार्य प्राचार्य वगैरे नावांनीं ओळखले जाणारे गुरु आपल्या नित्य परिचयाचे आहेत. आपल्या ऐहिक जीवनास वळण लावण्यास व तें समृद्ध करण्यास त्यांची जरूरी आहे हें निःसंशय. परंतु आपणास जो विचार करावयाचा आहे तो आपल्या आध्यात्मिक जीवनास वळण लावणारे, तें समृद्ध करणारे जे गुरु त्यांच्या संबंधीं. असे गुरु दोन प्रकारचे आहेत. नियत व अनियत. दोघांचीही अध्यात्मिक जीवनांत जरूरी आहे. आत्मज्ञानास पोषक असणारें जीवन आपल्या शिष्याच्या ठिकाणीं निर्माण करण्याचें कार्य अनियत गुरूचें आहे. आत्मज्ञानास लायक अशी भूमिका शिष्याची करून देणें हें अनियत गुरूचें कार्य होय. शिष्याच्या सर्व भावना, वासना व वृत्ति यांना योग्य अध्यात्मिक वळण

लावण्याचें कार्य ते करतात. थोडक्यांत म्हणजे गीतेंत सांगितलेली 'दैवी संपत' शिष्याच्या ठायीं निर्माण होण्यास जरूर तें साहाय्य व मार्गदर्शन करणें हें यांचें मुख्य कार्य असतें. अध्यात्मिक हिमालयाच्या उत्तुंच 'गौरीशंकरापर्यंत' नेण्याचें कार्य अनियत गुरु करीत असतात.

## सद्‌गुरु कोणास म्हणावें

अशा प्रकारें प्रत्यक्ष शिखरावर चढविण्याचें, शिष्याला आत्मज्ञान करून देण्याचें, त्याला अव्यक्तांत समरस करून टाकण्याचें सामर्थ्य ज्या गुरूच्या ठिकाणीं असतें, त्यांना सद्‌गुरु म्हणतात. ज्याला स्वतःला आत्मज्ञान झालें आहे, जो स्वतः परमात्म्याशीं चैतन्याशीं समरस झाला आहे व जो आपल्या शिष्याला तसा अनुभव आणून देऊं शकेल, त्याला आत्मज्ञान करून देऊं शकेल—आणि रस्त्यावरील पाटीप्रमाणें केवळ मार्ग न दर्शवितां जो शिष्याचा हात धरून बिकट मार्गांवरून त्याला हळुवारपणें नेऊन आत्मज्ञानाच्या शिखरावर आरूढ करूं शकेल तोच सद्‌गुरु होय.

श्री रामकृष्ण परमहंस यांच्या उदाहरणांवरून ही गोष्ट अधिक स्पष्ट होऊं शकेल. पूर्वाश्रमीं स्वामी विवेकानंद हे अत्यंत नास्तिक होते. ईश्वर प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज त्याचें अस्तित्व मान्य करण्यास ते तयार नव्हते. अनेक संत महंत श्रेष्ठ विभूतीकडे तुम्हीं मला ईश्वर दाखवूं शकाल काय? अशी त्यांनीं पृच्छा केली. पण कोणीहि ही गोष्ट करूं शकला नाहीं. शेवटीं श्रीरामकृष्ण परमहंसांची कीर्ति ऐकून ते त्यांच्याकडे गेले. विवेकानंदांना पाहिल्याबरोबर परमहंसानीं ओळखलें कीं, हें पाड लागलेलें फळ आहे.

## आपणासारिखे करिती तात्काळ—

विवेकानंदानीं रामकृष्णांस प्रश्न केला, 'आपण ईश्वर पाहिला आहे काय?' तडबतोब उत्तर, 'होय.'

'मला तुम्हीं तो दाखवू शकाल काय?

लगेच उत्तर 'त्यांत काय कठीण. मी रोजच ईश्वराबरोबर बोलत असतों.'

रामकृष्णानीं विवेकानंदांना नुसता स्पर्श केला व विवेकानंदाना ईश्वरी दर्शन घडवून दिलें. रामकृष्णांच्या सामर्थ्यांचा अनुभव त्यांना आला व तेव्हांपासून त्यांची अढळ निष्ठा आपल्या गुरुवर बसली. केवळ पाड लागलेल्या फळाला पक्ककरून त्याच्या जीवनाला सद्‌गुरु अमृताची गोडी आणून देतात असें नव्हें तर गाढ निष्ठा असल्यास कच्चीं फळेही पक्क करण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं असतें. कच्चें मडकें पक्कें करून महाराष्ट्राला नामवंत नामदेव, विसोबा खेचरानें उपलब्ध करून दिले, ही गोष्ट सर्व श्रुतच आहे. अशा प्रकारें 'आपणासारिखें करिती तात्काळ। नाहीं काळ वेळ तया लागी' असें सामर्थ्य ज्यांचें तेच सद्‌गुरु होत.

## सद्‌गुरु कसे असतात

सद्‌गुरु शाश्वत व अशाश्वत पूर्णपणें जाणत असतात. कोणत्याही भावना, वासना,

आकांक्षा त्यांच्या ठिकाणीं नसतात. ते द्वंदातींत असतात. सुखःदुख त्यांना सारखेच. कांहीं मिळो वा नामिळो, त्यांना त्याची पर्वा नसते, ऐहिक सुखें वा ऐश्वर्य या बाबतींत ते पूर्ण उदासीन असतात. त्यांचा बोल झेलण्यास अष्ठसिद्धि सदैव तत्पर असतात तरी ते त्यांच्याकडे ढुंकूनही पहात नाहींत. कोठल्याही प्रकारचें जीवन जगण्याची त्यांना जरूरी नसते. केवळ जग कल्याणासाठीं ते देहधारी झालेले असतात. लोककल्याण व पतितोद्धार या खेरीज दुसरा कोणताही उद्योग ते करीत नाहींत. कांहीं मिळण्याच्या आशेनें वा लोभानें ते कांहींहि करीत नाहींत. कीर्ति व पैसा त्यांना विषासमान असतो. आपल्या जवळ जें आहे त्याचें दान करणें एवढेंच ते जाणतात.

## दया, क्षमा, शांति—

हें दानसुद्धां प्रेममय असतें. प्रेमामुळेंच ते प्रेरीत झालेले असतात. ईश्वर प्रेममय आहे. सद्‌गुरु ईश्वराशीं समरस झाल्यामुळें तेही प्रेममय असतात. शुद्ध प्रेमाची मूर्ति पहावयाची असेल तर सद्‌गुरुकडे पहावें. आपल्या तान्हुल्याबद्दल मातेच्या ठिकाणीं वसत असलेलें वात्सल्य व शिष्याबद्दल सद्‌गुरुच्या ठिकाणीं असलेलें प्रेम दोन्ही सारखींच. शुद्ध नि निःस्वार्थी, संकटग्रस्त, पतित अशाना पाहून खडी साखर पाण्यांत विरघळावी तसें सद्‌गुरुचें गोड अंतःकरण विरघळतें. सद्‌गुरु म्हणजे क्षमाशांतीचें माहेर घर. दया क्षमाशांति तेथें देवाची वस्ति हें देवापेक्षां सद्‌गुरुला अधिक लागू आहे. देव कोपतो. रागावतो. आपलें कांहीं चुकलें कीं शिक्षा करतो. परंतु गुरू कोपत नाहींत कीं रागवत नाहींत. त्यांच्या सेवेंत आपलें कांहीं चुकलें तर प्रेमाचें अंजन घालून ते आपणास शुद्धीवर व योग्यमार्गावर आणतात, कोणाचेंही अकल्याण करण्याचा नुसता विचारही त्यांच्या मनाला स्पर्श करीत नाहीं. देव कोपला तर सद्‌गुरु आपल्याला पाठिशीं घालतील, गुरु कोपल्यास देवाचीही मात्रा चालणार नाहीं. संतांच्या, सद्‌गुरुच्या सुखासाठीं, त्यांचा शद्व खरा करण्यासाठीं देव सदैव तत्पर असतो. नाथांच्या घरीं पाणक्या म्हणून देव नाहीं कां राहिला ? 'झाला महार पंढरीनाथ' असें नाहीं कां घडलें ! देवानें दळण नाहीं कां दळलें ! नाना तऱ्हेची कामें त्यानें केलीं आहेत. सद्‌गुरुची योग्यताच तेवढी मोठी आहे. सत्‌चिदानंद प्रभूचें ते यजमान आहेत. सद्‌गुरु म्हणजे अनंत कोटी ब्रह्मांड नायक आहेत; पण गोरगरिबांची, रंजल्यागांजल्यांची माऊली आहेत. म्हणूनच सद्‌गुरुमाऊली असें आपण म्हणतों.

## बाबा काय म्हणाले ?

श्री. दाभोळकरांनीं गुरुसंबंधीं वादविवाद केल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं बाबा, काका महाजनी, दाभोळकर व इतर मंडळी मशिदींत बोलत बसली होती, काका एकाएकीं उठले व बाबांना म्हणाले, 'जातों.'

बाबानीं विचारलें, 'कोठें ?'

काका म्हणाले, 'वर.'

बाबा म्हणाले, 'जा, पण वाटाड्या बरोबर घे. नाहींतर वाट चुकशील, मार्ग विकट आहे.

या त्रोटक संवादांत सद्‌गुरुची आवश्यकता कां आहे हें बाबानीं दाभोळकरांना ध्वनितं केलें आहे.

स्वप्रयत्नाला अध्यात्मामध्यें अति महत्व आहे. 'उद्धरेदात्मनात्मानं' असें भगवानही सांगतात. स्वप्रयत्नाशिवाय विद्याप्राप्ति नाहीं, हें खरेंच. हा स्वप्रयत्न योग्य दिशेनें झाला पाहिजे हेंही खरेंच व ही योग्य दिशा दाखविण्यास कोणीतरी अनुभवी व तज्ञ पाहिजे हेंही तितकेंच खरें. ऐहिक विद्या केवळ स्वप्रयत्नानें कोण शिकला आहे! कोणी ना कोणी तरी गाईड ( मानव वा पुस्तक ) हा पाहिजेच.

आजकाल शाळा कॉलेजांतील विद्यार्थी 'गाईड' शिवाय आपल्या विद्येंत पास होऊं शकत नाहींत. मग ब्रह्म विद्येसारख्या गहन व बुद्धिपलीकडील विषयांत आम्हीं गाईड शिवाय-गुरुशिवाय पास होऊं हें म्हणणें हास्यास्पद नव्हे तर काय ?

समई तेलवात भरून तयार ठेवली म्हणून कांहीं तिची ज्योत पेटत नाहीं. ती पेटविणारा कोणीतरी लागतोच, शिवाय असें कीं, ज्योतीनेंच ज्योत पेटते. एकाद्या साधकानें स्वप्रयत्नानें अध्यात्मांत खूप कमाई केली तरी त्याच्याठिकाणी असलेली ब्रह्मज्योत तेजाळणारा कोणीतरी पाहिजेच व तो सुद्धां ज्याच्या ठिकाणी ब्रह्मज्योत तेवत आहे असाच पाहिजे म्हणजेच सद्‌गुरु पाहिजे. म्हणून साईचरित्रकार लिहितात.

अशक्य दिसाया सूर्यकरे । बुद्धि जेथून माघारी फिरे ।<br>
जेथ वेद श्रुतिचें पाऊल न शिरे । ते निजकरें गुरु दावी ॥

**सद्‌गुरु वाचूनी सांपडेना सोय—**

अध्यात्म मार्गांत जसजशी प्रगति होईल तसतशा मति कुंठीत करणाऱ्या अनेक गोष्टी साधकाच्या मार्गांत येत असतात. अशावेळीं स्वप्रयत्न निष्फळ ठरतो. साधक ब्रह्मज्ञान प्राप्तीच्या परिसरांत आला कीं, नाना शक्तींचा त्याला अनुभव येऊं लागतो. सिद्धींचें सामर्थ्य मनास भुरळ पाडतें. अस्सल व नकली यांतील भेद कळत नाहीं. चकवा म्हणून कायसा एक प्रकार आहे. असें अनेक 'चकवे' या परिसरांत असतात. चैतन्याशीं समरस होण्याऐवजीं सिद्धींच्या पाशांत सांपडून अधःपात होण्याचा अति गंभीर धोका यावेळीं असतो. मी मी म्हणणारे या परिसरांत गडगडतात. अशावेळीं सद्‌गुरु वांचून तरणोपाय नाहीं. तोच येऊन आपल्याला सांभाळून घेईल व पुढील मार्ग अचूक दाखवील तरच जीवित्त साफल्याची आशा. सद्‌गुरु वांचूनी सांपडेना सोय' हेंच अशावेळीं खरें आहे हें निःसंशय.

माणसाचें मन रिकामें राहूं शकत नाहीं. कशाचा ना कशाचा तें विचार— चिंतन करित राहणारच. 'रिकामे मन सैतानाचें घर' अशी इंग्रजींत म्हण आहे. याचा अर्थ असा कीं, रिकाम्या मनांत नाना विचार थैमान घालतात. हे विचार साधारणपणें

हलक्या दर्जाचे असतात. म्हणून आपण आपलें मन कधींहीं रिकामे ठेवूं नये. यासाठीं नेहमीं चांगले विचार मनांत आणावेत. हें साधण्यास आपल्या सद्गुरुचा आपणास उपयोग करून घेतां येईल. म्हणूनच म्हणतात—

**चित्ताचें काम चिंतन । क्षण न उमले चिंतना विण ।**
**विषय दिल्या त्या विषय चिंतन । गुरु चिंतन त्या गुरु दिधल्या ॥**

## सद्गुरूचा कल्याणकारी सदुपयोग

माणसाचें मन नुसत्या विचारापेक्षां हृदयांत अधिक रमतें. हृदयाचा ठसा मनावर चटकन उठतो व तो अधिक काळ राहतो. या कामीं चालते बोलते सद्गुरु, संत, महंत, यांचा आपण उपयोग करून घ्यावा. त्यांच्या संगतीत राहिल्यानें त्यांची मूर्ति आपल्या मनासमोर सदैव राहील व त्यांचें चिंतन करण्यास फार सोपें जाईल. असें झालें कीं, भलत्या सलत्या वासना व इच्छा यांना मनांत घर करण्यास जागा राहणार नाहीं. मनांत आणलें तर आपण सद्गुरुचा अशा प्रकारें स्वकल्याणासाठीं उपयोग करून घेऊं शकतो. व तसा तो करावा हा एक उद्देश समाजांत वावरण्याचा सद्गुरुचा असतो.

सगुणभक्ति करण्यास सद्गुरुसारखें साधन नाहीं. या संबंधीं स्वामी विवेकानंद म्हणतात, ' कोणत्या ना कोणत्या तरी स्वरुपाच्या व्यक्त परमेश्वरावांचून अव्यक्ताची ओळख मनुष्य जातीच्या बऱ्याच भागास होणें शक्य नाहीं. या करितां व्यक्त परमेश्वराची आवश्यकता आपोआपच उत्पन्न होते. अशा परिस्थितींत परमेश्वराचे भलभलते रूप कल्पून त्याची पूजा करण्यापेक्षां अगर काल्पनिक देवदेवतांची पूजा करीत बसण्यापेक्षां अवतारी पुरुषांची पूजा करणें अधिक चांगलें. ही गोष्ट मनुष्य स्वभावालाहि पटलेली असल्यामुळें अशा अवतारी पुरुषामागें झुंडीच्या झुंडी धांवतात. मनुष्य-स्वभावाचा हा विशेष असल्यामुळें आमच्या धर्मांत अवतारी पुरुषांचें पूजन करण्यास ऋषींनीं अगाऊच परवानगी देऊन ठेवली आहे. ( स्वामी विवेकानंद यांचे ग्रंथ भाग ५ पान ७७. )

## सद्गुरुच आपल्या शोधांत असतात

अध्यात्मामध्यें केवळ स्वप्रयत्नानें साध्य न होणाऱ्या ज्या कांहीं गोष्टी आहेत त्यापैकीं सद्गुरु भेट ही एक होय. आपली पुण्याई फळास आल्यावांचून सद्गुरु भेट होणें नाहीं. सद्गुरुचा शोध आपण करावयाचा नसतो, तर ते आपला शोध घेत असतात. सद्गुरु चिरंजीव आहेत. चैतन्यशक्तीच ती. तिला काय मरण आहे ! देह जातो एवढेंच. आपले बाबा आहेत. ते देहधारी नाहींत एवढेंच काय तें. ४०–४२ वर्षांपूर्वी शिर्डीस असलेलें चालतें बोलतें ब्रह्म आजही तेथें आहे. भक्तांच्या हृदयांत आहे. सर्व प्राणिमात्रांत आहे. सद्गुरु म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच, तो जाणार कोठें व येणार कोठून ? देह त्यागानंतर सद्गुरु अदृश्य

रूपानें सर्वत्र वावरत असतात. यामुळें आपणांस सद्‌गुरुचा शोध लागणें कठीण आहे. सद्‌गुरुला मात्र आपला शोध सहज लागतो.

सद्‌गुरु हे जन्मोजन्मीं आपल्या पाठीशी असतात. आपलें रक्षण करीत असतात. आपलें अध्यात्मिक जीवन समृद्ध झालें, पक्क होण्याच्या दशेला आलें कीं, सद्‌गुरु आपण होऊन भेट देतात. कित्येक वेळां ते आपणास खेचून नेतात. मग आपल्या मनांत असो वा नसो. ते त्याकडे लक्ष देत नाहींत. म्हणूनच बाबा नेहमीं म्हणत कीं, मी माझ्या भक्ताला चिडीसारखा दोर बांधून खेंचीत आणीन. मग तो कोठेंही कां असेना. प्रत्येक व्यक्तीचे सद्‌गुरु ठरलेले असतात. व्यक्तिनें ते निवडावयाचे नसतात. वेळ आली कीं, माणसाला त्याची जाणीव होते. अगर सद्‌गुरु ती करून देतात.

## वामन पंडितांचा शोध

या संबंधीं वामन पंडीताची अशी एक गोष्ट सांगतात कीं आपल्यावर गुरुकृपा व्हावी म्हणून सद्‌गुरुच्या शोधांत ते होते. प्रथम ते तुकारामाकडे गेले. परंतु तुकारामानें बोध करूनही वामन पंडीताच्या मनाचें समाधान झालें नाहीं. तेव्हां तुकारामानें त्यांना रामदासाकडे पाठविलें. तेथेंहि त्यांचें समाधान होईना. रामदासानीं त्यांना .हनुमंताकडे पाठविलें. तरीही वामन पंडीताच्या मनाला शांति लाभेना. शेवटीं हा प्रकार आहे तरी काय, हें पहाण्यासाठीं रामदासानीं समाधी लावली, समाधींत रामदासांना कळून आलें कीं, वामनाचे गुरु मलायापर्वतावर असलेले सच्चिदानंद स्वामी हे आहेत, रामदासानीं वामन पंडीताला त्यांच्याकडे धाडलें व वामन पंडीताच्या मनाला तेथें शांति लाभली.

अशा प्रकारें गुरुशिष्य संबंध अगोदरच ठरवून ठेवलेले असतात. यास्तव सद्‌गुरुच्या शोधासाठीं आपण कधींही वणवण फिरूं नये. आपलें अध्यात्मिक जीवन संयम व सदाचार यांनीं जेवढें समृद्ध करतां येईल तेवढें करीत राहावें. अनियत गुरूच्या संगतींत जेवढें मिळवितां येईल तेवढें मिळवावें. त्यांची कृपा संपादन करावी, पुढील काळजी आपल्या सद्‌गुरुलाच.

---

## चिर तारुण्याचीं लक्षणें

श्रद्धा ही तुम्हांला तारुण्य प्राप्त करून देतें; तर शंकाकुशंकाच्या जाळ्यांत अडकल्यानें तुम्हांला वृद्धत्व प्राप्त होतें. आत्मविश्वासानें तुम्हीं तारुण्यांत तरंगूं लागतां तर भीतीमुळें तुमच्यावर वृद्धत्वाची छाया पसरलेली दिसूं लागते. आशावादीपणा हा तारुण्याला पोषक आहे तर निराशा ही वृद्धत्वाची निशाणी आहे. तुमच्या मनाला जोंपर्यंत सौंदर्याची, आनंदाची, मनोधैर्याची, व भव्यत्वाची ओढ लागून राहील तोंपर्यंतच तारुण्य तुमच्याबरोबर राहील.

---

# लीला बाबांची

छाया प्रेमाची । असेही । लीला बाबांची ॥ धृ. ॥

साईबाबा होते संत
मानवतेचे थोर महंत
लीला त्यांच्या बघुनि अनंत
तृप्ति लोचनांची । असेही । लीला बाबांची ॥ १ ॥

श्रद्धा बाबांवरती अमुची
संकट समयीं भक्त गणांची
हाक ऐकुनी, मानवतेची
करणी देवाची । असेही । लीला बाबांची ॥ २ ॥

जनसेवेची मंजुळ मुरली
बाबांनीं शिरडीस घुमविली
हृदयें सारी पावन केली
उद्धरुनी साची । असेही । लीला बाबांची ॥ ३ ॥

'साईबाबा, देवच होते
पतीत पावन शिरडीचे ते
अन्य न त्यांच्यापरी कुणी ते
शोभा शिरडीची । असे ही । लीला बाबांची ॥ ४ ॥

शिरडीचें तें क्षेत्र पहावें
जन्मा यावे, आणि मरावें
देवमूर्तिचे दर्शन घ्यावें
आशा पतितांची । असेही । लीला बाबांची ॥ ५ ॥

मानवतेच्या कल्याणाची
आज्ञा पाळावी देवाची
शिकवणूक ही थोर तयाची
पुण्य प्रतापाची । असे ही । लीला बाबांची ॥ ६ ॥

दर्शनार्थ तळमळे कवीचा
जीव, घ्यावया प्रसाद त्याचा
मनी जपावा मंत्र तयांचा
किमया शिरडीची । असे ही । लीला बाबांची ॥ ७ ॥

कवि :–श्री. बा. मा. हराळे, सा. प्राश भवानीगर

# खरा ज्ञानी कोण ?

**भगवंतानीं गीतेच्या तेराव्या अध्यायांत ज्ञानी पुरुषाचीं लक्षणें परोपरीनें सांगितलीं आहेत. ज्ञानदेवानीं आपल्या अमृतवाणीनें ज्ञानेश्वरींत त्यांचें सुंदर निरूपण केलें व त्याचेंच सुलभ रूपांतर अभंगवाणींत स्वामी स्वरूपानंद ( पांवस-रत्नागिरी ) यानीं अभंग ज्ञानेश्वरीच्या रूपानें सर्वांपुढें ठेविलें आहे. त्या ग्रंथांतून पुढील उतारा घेण्यांत आला आहे. ज्ञानी म्हणजे ज्याला ब्रह्माची ओळख झाली आहे व जो ब्रह्माची ओळख पटवूं शकतो तो, अर्थात् सद्गुरु.**

वाढे लक्ष्मी जैशी। भाग्यवंता घरीं। किंवा सरोवरीं कमलिणी ॥ तैसी क्षमावृत्ति॥ जयाचिया ठायीं। दिसेंदिस होई। वृद्धिंगत॥ तयाचें लक्षण। तुज आकळेल। ऐसे स्पष्ट बोल। बोलेन मी॥ जैसा आवडता। अलंकार देहीं। तैसें सर्व कांहीं। साहे जो का॥ त्रिविधहि ताप। आदळतां शिरीं। हाले ना अंतरीं अणुमात्र॥ जेवढा संतोष। होतां इष्ट प्राप्ति। संतोष अनिष्टीं। तेवढाच॥ मान अपमान। समान मानोन। करी जो सहन। निंदा आणि स्तुति। सुख आणि दुःख। सारखींच देख। जयालागीं॥ जयालागीं नाहीं उष्ण किंवा शीत। नाहींच जो भीत। कोणातेंही॥ काय शिखरांचा। आपुल्या साचार। वाटतसे भार। मेरूलागीं॥ वराहावतारा। काय जड वाटे। दंताग्रीं पृथ्वीतें। धरावया॥ चराचर भूतें। वाहोनियां काय। दडपली जाय। वसुंधरा॥ तैशीं नाना द्वंद्वें। जरी झालीं प्राप्त। तरी नाहीं होत। कष्टी कदा॥ जळें घोघावत। नदी नद आले। सागरें घेतले। सामावोनीं॥ तैसें धनंजया। जयाचिया ठायीं। न साहणें नाहीं। कांहीं एक॥ आणि सर्व कांहीं। साहतों आपण। ऐसेंहि स्मरण नुरे जया॥ सुख दुःखादिक। जें जें होय प्राप्त। रूप तें समस्त। आपुलेंची॥ मानुनिया ऐसें। आत्मतुष्ट राहीं। साहतो हा नाहीं। अभिमान॥ ऐसी क्षमावृत्ति। जयाचिया ठायीं। दिसोनियां येई। प्रिय पार्था॥ तयाचिया योगें। ज्ञानासीहि जाण। आलें थोरपण। आगळेंची॥ अर्जुना तो जाण। ज्ञानाचें जीवन। आतां ऐकरूप। आर्जवाची॥ प्राणाचें सौजन्य। धनंजया साच। असें सारखेंच। सर्वांठायीं॥ किंवा प्राण्यांचें का। पाहोनियां तोंड। देतसे उजेड। चण्डरश्मी॥ ना तरी आकाश। देई सर्व जगा। सारखीच जागा। स्वभावतां॥ तैसें ज्याचें मन। सर्वांशीं समान। आणीक वर्तन। तेंहि तैसें। जयाची जगाशीं। जुनी सोयरीक। स्वभावें ओळख। सर्वांशींच॥ आपपर भाव। नेणेंचि जो कांहीं। स्वभावें जो स्नेही। सर्वांचाच॥ उदकासारिखें। जयाचें वर्तन। राहे मिसळूनी। सर्वांशीं जो॥ धांवे वारा तैसा। सरळ स्वभाव। शंका आणि हांव। नाहीं जया॥ ना तरी बालक। निःशंक तें जैसें। मांडीवरी बैसे। मातेचिया।

# सारे पैशांचे खेळ !

**आज मान आहे पैशांना. जवळ पैसा नाहीं तर तुम्हीं निर्माल्य-वत् बनतां. यासाठीं पैसा मिळवावा परंतु तो न्यायनीतीनें मिळवावा व त्याचा सदुपयोग करावा. द्रव्यतृष्णा फार वाईट. तुमच्या नाशास कारण होणारी. रामनामाची आवड धरावी. तीच तुमचा उद्धार करील.**

खरोखर सध्यांचें युग हें धनवंतांचें आहे. ज्याच्याजवळ पैसाअडका आहे त्याच्याजवळ मानमान्यता धांव घेत जाते. आणि ज्याच्याजवळ पैसा नाहीं त्याच्याकडे कोणी ढुंकूनहि पहायला तयार नाहीं. जवळ पैसा आहे तोंपर्यंत सारीं माणसें तुम्हांला "या, बसा' म्हणतील; तुमचें आगत स्वागत करतील; आणखी काय वाटेल तें करतील.

परंतु भगवंताजवळ धनवंताला स्थान नाहीं. आज भगवंताची तरी कोण पर्वा करीत आहे ! खा, प्या, मजा करा. स्वर्ग आणि देव पाहिला आहे कोणी ? माणसानें मिळेल तेवढें पदरांत पाडून घ्यावें. चोऱ्या, दरोडे लबाड्या, काय वाटेल तें करावें ! आयुष्यांत चैन करावी ! ही आहे आजच्या बहुजन समाजाची वृत्ति !

तुमच्यांत विद्वत्ता काडीचीही नसूं द्या. तुम्हांला दोन शब्द बोलायला किंवा नीट लिहायला नाहीं येईनात का ! त्यामुळें तुमच्यांत कमतरता येऊं शकत नाहीं. तुमच्या गांठीला चार पैसे आहेत ना ? मग त्यांत सगळें ज्ञानभांडार व विद्वत्ता आली ! दुसऱ्यांच्या मानेवर सुरी ठेवणारे, नाना प्रकारचे अत्याचार करणारे व सर्व बाजूंनीं माणुसकीला मुकलेले तुम्हीं असलां तरीही तुम्हीं धर्मावतार होऊं शकतां ! कशाच्या बळावर ? पैशांच्या !

---

तैसें निजांतर । कराया उघडें । लोकीं मागेंपुढें । पाहे ना जो ॥ फुलतां कमळ । फांके परिमळ । सर्वत्र सरळ । तैसा जो का ॥ पुढें सुनिर्मळ । फांकती किरण । मागें दिसे रत्न । जैसें चोख ॥ दिसे पाठीं ॥ बैसे ना रचित । नाना मनोरथ । अखंड जो तृप्त ! स्वानुभवें ॥ कर्म हें करीन । किंवा हें सोडीन । नाहीं अभिमान । मनी ऐसा ॥ बोलणें जयाचें नाहीं संशयित । नाहींच कपट । दृष्टींतही ॥ कधीं कोणाशीं जो । करीना वर्तन । अंतरीं धरोन । हीन बुद्धि ॥ सर्वदा जयाचीं । इंद्रियें सकळ । प्रांजळ निर्मळ । निष्प्रपंच ॥ अमृताची धार । तैसें उजु मन । आणि पंचप्राण । बंधहीन ॥ ऐशा लक्षणांचे । असे जो माहेर । काय सांगूं फार । धनंजया ॥ पुरुष तो जाण । आर्जवाची मूर्ति । ज्ञानें केली वस्ती । ठायींच त्या ॥

---

आपल्याजवळ पैसा असला, एखाद्या बँकेंत तुमच्यानावें भली मोठी रक्कम पडलेली असली म्हणजे झालें. मग तुमच्यासारखे धर्मावतार व त्यागवीर दुसरे कोणीही असूं शकणार नाहीं !

परंतु आपल्या जवळचा पैसा संपुष्टांत आला, आपल्या वाट्याला गरीबी आली म्हणजे आपल्या अंगाला चिकटलेले सारे गुण नाहींसे होतात. आपल्या जवळपास कोणी फिरकत नाहीं; जिवलग मित्र सुद्धां दूर पळतात.

× × ×

गोपाळरावांची मोठी पेढी होती. रोज हजारो रुपयांची उलाढाल होत असे. दुपारच्या प्रहरीं गोपाळशेट घरीं स्वस्थ विश्रांति घेत पहुडले होते. बाजारांत स्वतःच्या मालकीचें मोठें घर होतें. आणि त्यांतच व्यापारी पेढी होती. अनेकांशीं व्यापारी संबंध, देवघेवीचा, सोन्या-नाण्याचा चालू व्यवहार

घराला कोणी तरी आग लाविली. घर पेटलें; त्याबरोबर घरांतील सारी चिजवस्त जळून खाक झाली. आग विझविण्याचे शिकस्तीचे प्रयत्न झाले. परंतु दुपारच्या त्या आगीपुढें कोणाचा इलाज चालला नाहीं. कमींत कमी एक लाखाचें नुकसान झालें. होतें नव्हतें तें सारें अग्नीच्या भक्षस्थानीं पडलें ! शेटजीनीं अग्नीचें तें सर्व संहारक स्वरुप स्वतःच्या डोळ्यानीं पाहिलें. डोळे गरगर फिरले व त्याबरोबर डोकेंहि !

त्यांच्या मेंदूवर भयंकर परिणाम झाला ! चक्कर येऊन भूमीवर पडले ते कित्येक तासपर्यंत. इंजक्शनें देऊन जाग आणावी लागली !

त्यानंतर जवळपासचे कांहीं बरे मागते सांत्वन करण्यासाठीं आले. परंतु त्यांच्याशीं चार शब्द बोलण्या इतकीहि शेटजींना शुद्ध नव्हती.

पैसा गेल्यामुळें मनावरचा ताबा सुटलेला होता. धैर्य राहिलें नव्हतें. सर्वत्र निराशेचा काळोख पसरलेला दिसत होता. शरिरांत सामर्थ्य मुळींच राहिलें नव्हतें. गलितधैर्य अशा स्थितींत गोपाळराव दिवस ढकलीत होते. एकदां संकट कोसळलें म्हणजे लागोपाठ संकटपरंपराच सुरू होते. तशीं संकटामागून संकटें येत गेलीं.

पुन्हां थोडीशी स्थीरस्थावर झाली. विमा उतरला होता. त्याची रक्कम आली. बँकेनेंही कांहीं आधार दिला. त्यामुळें वाट्याला आलेला गलितपणा, नैराश्य व वेडेपणा हळुहळु कमी होत गेला.

आजकाल आमचें सामाजिक जीवन व त्याचा डोलारा पैशांच्या राशीवर उभारलेला आहे. पैसा हाच त्याचा पाया. पैसा नाहीं तर कांहीं नाहीं !

तुमच्याजवळ पैसा आहे तरच प्रतिष्ठा व मानमान्यता तुमच्याजवळ येईल. मग तुमच्याकडून कितीही गुन्हे घडोत; त्यांचें स्वरूप कितीहि भयंकर असो; ते सारे तुम्हांला माफ ! कितीही अवगुण तुमच्याठायीं असूं द्या. त्यांना गुणांचें स्वरूप प्राप्त होईल. तुम्ही

मूर्ख असलां, तरी मोठ्या पंडितांत तुमची गणना होऊं लागेल! शेजारीपाजारी असोत. अधिकारी असोत. कोणीही असोत' सारे तुमच्या पायाशीं लोटांगणें घालीत येतील!

परंतु आपण गुणवान असलां, चारित्र्य संपन्न असलां, कुलीन असलां! स्वरूप सुंदर असलां, महा पंडित असलां आणि जर का पैशांची माया आपल्यापाशीं नसली तर आपली किंमत कवडी मोलानें केली जाईल! तेव्हां सांगायचें काय? आजच्या या जगांत जो मान आहे तो पैशाला! जोंवरी पैसा! तोंवरी बैसा!

आणि त्यामुळें असा हा महाप्रभावी पैसा मिळविण्यासाठीं लोक काय काय अनाचार करीत असतात! त्यासाठीं माणूस चोरी करण्यास प्रवृत्त होतो. लबाडी करतो, विश्वासघात करतो, दुसऱ्याच्या मानेवर सुरी ठेवण्यासही माणूस तयार होतो; भ्रष्टाचार, खून काय वाटेल तें करतो.

हेंच पहाना ना! दूधवाला दुधांत पाणी कशासाठीं घालतो, तूपवाला शुद्ध तुपांत चरबी किंवा दुसरी कसली तरी भेसळ करून भेसळीचें तूप कशासाठीं विकतो? किराणा माल विकणारा मापांत लबाडी करतो तो कशासाठीं? त्याचप्रमाणे सोनें, चांदी, हिरे माणके, मोती या जडजवाहिरांत खोटेपणा, लबाडी केली जाते ती हो कशासाठीं?

आज पहाना! कपडालत्त्यांत, खाण्यापिण्याच्या प्रत्येक वस्तूंत लबाडीशिवाय बोलणें नाहीं. सर्वत्र अनीतीचा लबाडीचा व दुसऱ्यांना फसविण्याचा व्यवहार दिवसाढवळ्या खुशाल चालू आहे!

× × ×

कांहीं म्हणा; समाधान म्हणून नाहीं. लबाडी, अनीति करून पैसे मिळवावयाचे व तेहि जास्तींत जास्त मिळविण्यासाठीं अहर्निश धडपड करावयाची! काय ही अपार तृष्णा! हिचा अंत कुठें व्हायचा? पैशापायीं आम्हीं न्यायनीति गुंडाळून ठेविली आहे. भगवंताची कधीं आठवणहि होत नाहीं आम्हांला! कशी होईल? सारेजण लोभाच्या जाळ्यांत अडकून पडले आहेत!

× × ×

वाटेल त्या मार्गानें अधिकाधिक कमाई करण्याच्या या तृष्णेला आम्हीं लगाम घातली पाहिजे. तिला खेचून आटोक्यांत आणिली पाहिजे. हे खोटे मायाजाळ आहे. मनुष्याजवळ पैसा पाहिजे; परंतु पैशांची हांव नको; तृष्णा नको. पैशांशिवाय पाऊल टाकतां येत नाहीं हें खरें आहे; त्यासाठीं जरुरी पुरता पैसा न्याय्य मार्गानें मिळविला पाहिजे. न्यायनीतीच्या मार्गानें आम्हीं पैसा मिळवावा व त्याचा योग्य रीतीनें व्यय करावा. सत्कृत्यासाठीं त्याचा उपयोग करावा.

× × ×

आज आम्हीं पडलेले आहोंत. आमचे उत्थान झालें पाहिजे. तें कसें व्हायचें? आम्हीं देव धर्माला पारखे झालेलें आहोंत. देवाची आम्हांला आठवणहि होत नाहीं;

आणि म्हणून तर आम्हांला द्रव्यतृष्णा छळीत आहे; आमच्याकडून नाना प्रकारचीं पापें करून घेत आहे.

या विषारी वातावरणांतून मुक्त होण्याचा एकच मार्ग आहे. आपण विचारी बनलें पाहिजे. 'संसार दीर्घरोगस्य सुविचारो महौषधम्.' त्याच्यासारखें औषध नाहीं. आणि जो सुविचारी बनला त्याला 'भगवन्नाम्' हाच सर्व दुःखांवर रामबाण उपाय आहे हें समजून येईल.

सर्व दुःखांवर एक रामबाण तोडगा बाबांनीं सांगून ठेविलाच आहे. कोणता तो तोडगा ?

**जेथें रामनामाचें गर्जन। फिरे तेथें विष्णूचें सुदर्शन। करी कोटी विघ्नांचें निर्दाळण। दीन संरक्षण नाम हें॥**

—:*:—

## नाम महात्म्य

प्रत्येक क्षणीं व प्रत्येक स्वासाबरोबर देवाचें नाव घ्या. त्या नावाशी तद्रूप होऊन जा. उठतां बसतां, काम करीत असतां नामस्मरण सतत चालू असूं द्या. तें नांव उघडपणें घ्या, गुप्तपणें घ्या; परंतु घ्याच. तें नाव घेत रहाण्यांत तुम्हांला अभिमान वाटावा. तेंच आपलें सर्वस्व आहे असें वाटावें. देवप्राप्तीसाठीं दुसरा कोणत्याही मार्गानें जाण्याची मग जरूरी नाहीं.

—संत निरलकेरी

MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop*. S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस्. व्ही. प्रधान

# संत समागम गोड

**गुरुकृपा होण्याचाच अवकाश असतो. ज्यांच्या वाट्याला ती दैवयोगानें येते, त्यांच्या जीवनांत क्रांति घडून आल्याशिवाय रहात नाहीं. या लेखांत प्राचीन नामदेव काळांतील व चालू काळांतील अशीं गुरुकृपेचीं दोन झगझगीत उदाहरणें वाचकांपुढें ठेवण्यांत आलीं आहेत. सद्गुरु पूर्वीच्याकाळीं होते आणि आज नाहींत असें थोडेंच आहे ? गुरुकृपा होण्यास आपली योग्यताही तशीच असावी लागते. मग त्या कृपेचें छत्र आपल्याकडे चालत येतें. कसें तें पहा.**

## गुरुप्रसाद किंवा संतकृपा

आमचा हा परमप्रिय आर्यावर्त देश सृष्टीच्या आरंभापासून परमार्थप्रवण आहे. आपल्या भारतांत जितके संत होऊन गेले तितके इतर कोणत्याच देशांत झाले नाहींत. पदनतांच्या उद्धारासाठीं संतांना या भूतलावर अवतीर्ण व्हावें लागलें. आम्ही भारतीय भाक्तिप्रिय आणि धर्मशील असल्यामुळें संत किंवा गुरुसेवा आमच्या हाडींमासीं खिळलेली आहे. गुरुप्रसाद मिळणें किंवा संतकृपा होणें हा आयुष्यांतील अलभ्य लाभ होय. हा लाभ ज्यांना प्राप्त झालेला आहे, त्यांच्या आयुष्याचें सार्थक झालें आहे.

गुरुकृपेचें येवढें सामर्थ्य असतें कीं, त्यामुळें दुष्टाचा सुष्ट बनतो. संत प्रसादानें माणसाच्या हातून मोठी कामगिरी पार पडते; इतकेंच काय, पण आशिक्षित माणूस संपूर्ण ज्ञानी होतो. प्रतिसंतच तो होऊन जातो. कारण, 'ते करिती आपणांसारखे तात्काळ' याचा अनुभव अनेकांना आलेला आहे. संतांच्या जीवन चरित्रांतही ह्या गोष्टी आपणांस वाचावयास मिळतात.

ज्ञानेश्वरादि भावंडें पैठणास चमत्कार करून आळंदीस परत आलीं तेव्हां आळंदीकरांनीं त्यांचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. तरी तेथें विसोबा चाटी म्हणून एक साधुद्वेष्टा कर्मठ ब्राह्मण होता. हा ब्राह्मण विद्वान् आणि सदाचारी होता, पण अनुभवाचें कांहींच अंग त्याला माहीत नसल्यामुळें त्याच्यांत दुरभिमान फार भरला होता. त्याच्या डोक्यांतलें 'हीं संन्याशाचीं मुलें' हें वेड कांहीं निघालें नव्हतें. त्यानें घरीं-दारीं, वेळीं-अवेळीं त्यांचा छळ करावा व या मुलांचा पारमार्थिक अधिकार न कळल्यामुळें त्यांचा छळ करण्याची एकही संधि त्यानें दवडली नाहीं.

## मांडे खाण्याची इच्छा

एकदां काय झालें, दिवाळीचा सण होता तेव्हां उत्तम मांडे करून आम्हांला आज खाऊं घाल असें निवृत्तिनाथ सहज मुक्ताबाईस म्हणाले. मुक्ताबाईनें सर्व सामग्री

जमविली आणि मांडे रांधणें आणण्यासाठीं कुंभारवाड्याकडे निघाली. वाटेंतच विसोबा समोरून येतांना तिनें पाहिला. तेव्हां ससाण्याला पाहून कोकिळा कांपते त्याप्रमाणें ती घाबरून थरथर कापूं लागली! त्यानें, 'कुठें चाललीस गे पोरी!' म्हणून जरा दरडावून विचारलें. तेव्हां तिनें खरा हेतु सांगितला. विसोबानें लगेच कुंभारांस जाऊन बजाविलें कीं, 'खबरदार! कोणी या पोरीला खापर बिपर द्याल तर! माझें तुमच्याकडून येणें आहे, त्याबद्दल नाहींतर तुम्हाला तगादा लावीन!' झालें, मुक्ताबाई हिंड हिंड हिंडली. तिला कांहीं कोणी खापर दिलें नाहीं. निवृत्तिनाथांनीं मांडे मागावेत व आपणाला रांधण मिळूं नये म्हणून खिन्न होऊन तीं रडत रडतच घरीं आली. ज्ञानेश्वरांनीं तिचा रडका स्वर ऐकून लगेच ते धांवत तिच्याजवळ गेले. त्यांनीं तिला पोटाशीं धरून व कुरवाळून 'अशी कष्टी कां झालीस?' म्हणून विचारलें. तिनें सर्व हकीगत सांगितली, तेव्हां त्या परमसमर्थ ज्ञानेश्वर महाराजांनी योगधारणेनें जठराग्नि प्रज्वलीत केला व आपली पाठ तप्तसुवर्णासारखी तापवून बहिणीस पाठीवर मांडे भाजण्यास सांगितलें—

मग योगधारणा करूनी । ज्ञानदेवें पेटविला जठराग्नी ।
ज्वाला निघती मुखांतुनी । आरक्तनयन दिसती पैं ।।
जांबूनद तप्तसुवर्ण । तैसी पाठ आरक्तवर्ण ।
विसोबा बाहेर उभा राहून । कौतुक दृष्टी पाहत ।।
मग मुक्ताईस म्हणे ज्ञानेश्वर । मांडे करावे पाठीवर ।
तिनें साहित्य आणुनि सत्वर । लाटिले अरुवार तेधवां ।।

## विसोबांच्या डोळ्यांत अंजन

ह्याप्रमाणें ज्ञानेश्वरांच्या पाठीवर मुक्ताबाईंनीं मांडे भाजलेले पाहून चोरट्या दृष्टीनें हा प्रकार पहाणाऱ्या त्या विसोबाच्या डोळ्यांत चांगलें अंजन पडलें व रत्न हिऱ्याच्या खाणीला आपण कांचमणी समजलों, याबद्दल त्याला फार अनुताप झाला. 'म्या मूर्खानें विकल्पाची गोफण घेऊन चिंतामणी झोंकून दिले' म्हणून त्यास पश्चात्ताप झाला. तो धांवत धांवत झोंपडींत शिरला आणि ज्ञानदेवांचे पाय हातीं धरून त्यानें ते अनुतापाश्रूनीं न्हाणिले. हे महापुरुष आहेत असें ओळखून त्यानें त्यांच्या पानांतलें उच्छिष्ट प्रसाद म्हणून उचलून घेतलें व लगबगीनें आपल्या मुखांत घातलें. पुढें:—

मुखांत घालितां सत्वर । काय बोलती ज्ञानेश्वर ।
'तूं कां होसी गा खेचर । सर परता वेगेसी ।।'
ऐसी ऐकूनियां वाणी । तोचि उपदेश धरिला मनीं ।
पर पश्यंती मध्यमेहूनी । वैखरी परता सरतसे ।।

ज्ञानेश्वर महाराज 'सर परता खेचरा ऐसें' असें म्हणाले. तेव्हां 'देव प्रमाणें वाणीच्या पलीकडचा हो' असा त्याचा अर्थ मनीं आणून ते विसोबाचार्य आ

विसोबा खेचर खरोखर 'परेहून परते घर । तेथें राहूं निरंतर' असें म्हणण्यास अधिकारी झाले. गुरुपदिष्ट मार्गाचें अनुकरण करितां करितां त्यांचा अधिकार एवढा वाढला कीं कांहीं वर्षांनीं नामदेवरायांच्या गुरुत्वाचा मान ज्ञानेश्वरांनीं त्यांसच दिला. ज्ञानोबांचे निंदक विसोबा खेचर पुढें 'महाविष्णूचा अवतार । श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर' असले अभंग बोलू लागले.

## लोकमान्य टिळक आणि 'गीतारहस्य'

वऱ्हाडच्या खापर्डे, कोल्हटकर, दामले आदिकरून नेते मंडळींनीं १९०९(श.१८३०) सालच्या वैशाखांत श्रीशिवजयंती उत्सवाप्रित्यर्थ अकोल्यास एक सभा भरविण्याचें ठरवून लोकमान्य टिळकांना त्या सभेच्या अध्यक्षस्थानीं नियोजित केलें. श्रीसमर्थ रामदासस्वामींचा शिवाजीमहाराजांना स्वराज्य कामीं पाठिंबा होता, त्याचप्रमाणें त्या वेळचे विदर्भाचे संत शिरोमणी श्रीगजाननमहाराज यांचा आशिर्वाद असावा म्हणून त्यांनाहि सभेस हजर राहण्याची विनंति करण्यांत आली. मंडळी शेगांवीं महाराजांना सभेचें आमंत्रण द्यावयास गेली. महाराजांनीं आमंत्रणाचा प्रेमानें स्वीकार करून सभेस येण्याचें कबूल केलें व **'करावयासी राष्ट्रोद्धार । योग्य बाळ गंगाधर । याच्या परी न होणार । राष्ट्रप्रेमी पुरुष पुढें ॥'** असें लोकमान्याविषयीं त्यांनीं आदराचे आणि कौतुकास्पद उद्गार काढले.

अक्षयतृतीयेचा दिवस सभेसाठीं मुक्रर करण्यांत आला होता. हा दिवस वऱ्हाडांत सण म्हणून पाळला जातो. विशेष म्हणजे सभेंत दोन मोठीं आकर्षणें होतीं. एक महाराष्ट्राच्या कोहीनूर हिऱ्याचें दर्शन आणि दुसरें श्रीगजानन महाराजांची उपस्थिति. यामुळें सभेस तोबा गर्दी उसळली होती!

सभेस सुरुवात होऊन प्राथमिक भाषणें झाल्यावर लोकमान्य टिळक बोलावयास उभे राहिले. ते म्हणाले, 'शिवाजी महाराजांना श्रीरामदासस्वामींनीं हातीं धरलें होतें. म्हणून सर्व भरतखंडामध्यें त्यांची कीर्ति दुमदुमत आहे. तद्वतच आजच्या सभेस श्रीसमर्थ-गजानन महाराज आपणांस आशीर्वाद देण्यासाठीं हजर आहेत, हें आपलें मोठें भाग्य होय. आपल्या भारत भूमीवरचा स्वातंत्र्य सूर्य मावळून दास्यत्वाचा अंधार सर्वत्र पसरलेला आहे. पारतंत्र्यांत पिचत पडलेला समाज प्रेतवत् समजावा. करितां स्वातंत्र्य प्राप्तीस योग्य आणि राष्ट्रप्रेम वाढवणाऱ्या अशाच शिक्षकांची सांप्रत आवश्यकता आहे. हें शिक्षण सरकार देईल का!

टिळकांनीं असें आवेशयुक्त भाषण करतांच, महाराजांनीं त्रिवार 'नाहीं, नाहीं, नाहीं' असें म्हटलें व अशानेंच दंडांत काढण्या पडतात, असेंही त्यांनीं पुढें सांगितलें.

## भाकीत खरें ठरलें

असो. सभा निर्विघ्नपणें पार पडली. टिळकांची वाहवा झाली आणि महाराजांचें भाकीतही त्याच वर्षी खरें ठरलें.

नंतर लौकरच सरकारनें १२४ व्या कलमाखालीं लोकमान्यांना अटक करून त्यांच्या-वर खटला भरला. टिळकांची भक्त मंडळी त्यांच्या सुटकेसाठीं झटूं लागली. दादासाहेब खापर्ड्यांनीं टिळकांच्या सुटकेसाठीं श्रीगजानन महाराजास विनंति करण्यासाठीं कोल्हटकरांना पाठविलें. कोल्हटकर मठांत आले. तेव्हां महाराज निजून होते. तीन दिवस उठलेच नाहींत. कोल्हटकरांची टिळक निष्ठा पणास लागली. तेही तीन्हीं दिवस तसेंच महाराजांजवळ बसून राहिले. चौथ्या दिवशीं समर्थ उठले आणि म्हणाले, 'किती प्रयत्न केलेत तरी यश येणार नाहीं. शिवाजीला रामदासांचा वशिला होता, तरी औरंगजेबांच्या कैदेंत त्यांना पडावें लागलें! सज्जनांना त्रास झाल्याशिवाय राज्यक्रांति होत नाहीं. बाळ फार दूर जाणार आहे, त्याला इलाज नाहीं. मीं ही भाकरी देतों. ती त्याला खाऊं घाला. मुळींच विसरूं नका. या भाकरीच्या जोरावर तो फार मोठी अद्वितीय कामगिरी पार पाडील.'

## भाकरी आवडीनें खाल्ली

कोल्हटकरांनीं मुंबईस येऊन सर्व वृत्तांत सांगितला. टिळक बोलले, 'स्वामींचें म्हणणें खरें आहे. सरकार न्याय्य बाजू कशी घेईल? माझ्या हातून एक मोठी कामगिरी होणार आहे असें महाराज म्हणतात तें मात्र गूढ आहे. असो; आपण सामान्य माणसें. सत्पुरुष भूत, भविष्य आणि वर्तमान जाणतात. पाहूं या पुढें काय घडतें तें. आणि त्यांनीं तोंडांत दांत नव्हते तरी ती प्रसादाची भाकरी कुसकरून आवडीनें खाल्ली.

असो. पुढें टिळकांना शिक्षा होऊन त्यांची ब्रह्मदेशांतील मंडालेच्या तुरुंगांत रवानगी झाली. आणि तेथेंच त्यांनीं गीतेचा कर्मपर अर्थ लावून आपला अद्वितीय 'गीता-रहस्य' ग्रंथ लिहिला आणि गीतेचे सहावे भाष्यकार म्हणून त्यांची कीर्ति झाली. संतांनीं त्यांच्यावर कृपा केली आणि लोकमान्य येवढी मोठी भव्य कामगिरी करूं शकले.

लो. टिळक गेले, स्वराज्य आलें. त्याच्या प्राप्तींत त्यांचा फार मोठा वांटा आहे. त्यामुळें व गीतारहस्य या ग्रंथराजाच्या रूपानें ते अजरामर होऊन राहिले आहेत. पहा संत कृपेचा प्रभाव!

## कानांत कांहीं बोलला! म्हणून कां तो गुरु झाला'

अकोल्या नजीकच्या मुंडगांवचा तरुण पुंडलीक भोकरे शेगांवच्या श्रीगजानन महाराजांचा एकनिष्ठ भक्त होता. त्याच्या शेजारीं भागाबाई नांवाची एक दांभिक बाई राहत असे. एके दिवशीं ती पुंडलिकास म्हणाली, 'अरे! तुझा ताप बरा केला म्हणून त्या शेगांवच्या वेड्यापिश्या आणि भ्रष्ट गजाननला गुरु मानतोस? त्यानें तुझ्या कानांत कांहीं मंत्र सांगितला आहे का? तेव्हां या काकतालीय न्यायाला बळी न पडतां अंजनगांवच्या कंकाजीच्या शिष्याला आपण गुरु करूं या! विधीवाचून गुरु होत नाहीं. गुरु महाज्ञानी, चातुर्यशास्त्र चिंतामणी आणि परम गुणी असून भक्तिपथ दाखविणारा असावा. यांतलें एकही लक्षण तुझ्या गजाननाच्या ठिकाणीं नाहीं. उद्या अंजनगांवाला कीर्तन आहे, तेव्हां 'तूं माझ्याबरोबर चल' पुंडलीक मनाचा भोळा

आणि भाविक असल्यामुळें त्याचें मन घोंटाळलें आणि त्यानें अंजनगांवाला जाण्यासाठीं होकार दिला.

रात्रीं पुंडलिक स्वस्थ निजला. पहांटेच्या सुमारास त्याला एक स्वप्न पडलें. स्वप्नांत थेट श्रीसमर्थ गजाननमहाराजांसारिखा एक दिगंबर पुरुष त्याच्या समोर येऊन म्हणूं लागला :—

'पुरुष म्हणे रे पुंडलिका। अंजनगांवासी जातोस कां ?।
गुरु करायातें निका। त्या भागीच्या सल्ल्यानें ॥
'जातोस तरी जावें त्वरित। त्याचें नांव काशिनाथ।
तेथें जातां फिटेल भ्रांत। तुझी वेड्या निश्चयें ॥
'कानांत कांहीं बोलला। म्हणून कां तो गुरु झाला।
लोक कान गोष्टीला। कितीतरी करतात ॥
'मग ते एकमेकांचे। काय गुरु होती साचे।
नादीं दंभाचाराचे। त्वां पुंडलिका पडूं नये ॥
'इकडे करीं कान। मंत्र देतों तुजकारण।
'गण गण' ऐसें बोलून। महाराज स्तब्ध झाले ॥
'आणखी काय आहे आस। ती मी पुरवीन खास।
ऐसें ऐकतां पुंडलिकास आनंद जहाला ॥
'पाहूं लागला निरखून। स्वप्नीं त्या पुरुषा लागून।
तों पाहिले गजानन। शेगांवचे स्वामी पहा ॥
'पुंडलिक म्हणे गुरुराया। पादुका द्या या मला सदया।
नित्य पूजा करावया। याहून आणखी आस नसे ॥
'बरें उद्यां दोन प्रहर। दिवस येतां साचार।
पादुकांची पूजा कर। ह्या मी दिधल्या घेईं तुला ॥

त्या पादुका घ्यावयास जातो तोंच पुंडलिकाला जाग आली. डोळे उघडून सभोंवार पाहूं लागला. त्याला कोणीच दिसेना. पादुकांचाहि पत्ता नाहीं. पादुका नव्या घ्याव्या कीं महाराज पाठवतील. कांहींच त्याला समजेना. अखेर महाराज पाठवतील त्यांची पूजा करावी असें त्यानें ठरविलें.

## महाराजांनीं पादुका पाठविल्या

इतक्यांत सकाळ झाली. भागी ठाकरीण त्याला मोक्ष गुरु करण्यासाठीं बोलावण्यास आली. आपण गजानन महाराजांना गुरु केलें आहे आणि आतां त्यांना सोडणार नाहीं, असें सांगून त्यानें तिला वाटेला लावलें.

याच्या आधीं दोन दिवस मुंडगांवचाच श्यामसिंग नांवाचा महाराजांचा दुसरा एक भक्त शेंगांवास दर्शनास गेला होता. महाराजांनीं त्याच्याबरोबर पुंडलिकासाठीं

पादुका पाठविल्या. पुंडलीकास वेळींच त्या पादुका मिळाल्या. त्यानें मनोभावानें त्यांचें पूजन केलें आणि तो आनंद पावता झाला.

ह्या प्रसादी पादुका अद्यापि मुंडगांवीं आहेत. पुंडलिकही हयात आहेत. गुरुप्रसादा-नंतर त्यांची उत्तरोत्तर परमार्थांत प्रगति होऊन त्यांचा अधिकार इतका वाढला आहे कीं ते आज एक संत म्हणून ओळखले जातात. वऱ्हाडांत आणि मुंबईंत त्यांचें अनेक भक्त असून त्यांना 'पुंडलिकबाबा' म्हणतात. आणि श्रीसमर्थ गजाननांच्या ठिकाणीं त्यांना मानतात. पादुकासाठीं त्यांनीं दहाहजार रुपये खर्च करून एक मोठें मंदिर बांधलें आहे. परवांच अधिक मासांत श्रीसद्गुरु साईनाथांचे परमभक्त ह. भ. प. श्रीदासगणू महाराज यांनीं लोणावळा येथें एक सप्ताह समारंभ केला. त्यावेळीं त्यांनीं पुंडलिक बाबांनाही बोलावलें होतें. ते पुंडलिकबाबास म्हणतात, 'पुंडलीका, तूं आतां मोठा साधु बनलास हं! गजान महाराजांनीं तुला गादीवर बसवलें. वा!'

आहे कीं नाहीं गुरुप्रसादाचा प्रताप! गुरुकृपेमुळें साधा अशिक्षित माणूसही थोर पदीं चढतो.

---

## वर्गणीदारांस विनंती

अजूनहि ज्यांनीं श्रीसाईलीलेची वार्षिक वर्गणी रु. ५ पाठविली नसेल त्यांनीं ती कृपा करून स्मरणपूर्वक लौकर पाठवावी अशी विनंती आहे.

व्यवस्थापक — श्रीसाईलीला
साई निकेतन, व्हिन्सेंट रोड
प्लॉट नं. ८०४ बी, दादर
मुंबई नं. १४.


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स**

# सद्‌गुरुचें मार्गदर्शन

—श्री अवधूतस्वामी लिमये, बी. ए.

**सद्‌गुरु महिमा अगाध आहे. त्यांची कृपा म्हणजे ईश्वरी कृपाच होय. त्यांच्या मार्गदर्शनाची जोड ज्यांना लाभली ते धन्य होत. देवादिकांस सद्‌गुरूची कांस धरावी लागली मग इतरांचा काय पाड ?**

आपल्या सभोंवार पसरलेलें जग हा एक प्रचंड आरसाच आहे. त्या आरशापुढें उभे राहून त्यांत आपलें प्रतिबिंब पहावयाचें असतें. नाटकांत काम करणारा नट आरशांत पाहून आपलें सोंग कसें सजलें तें पहात असतो. जग ही देखील एक रंगभूमि आहे. ही रंगभूमि कशीही असो, त्यांत वावरत असतां समर्थ रामदासस्वामींच्या बहुमोल उपदेशास अनुसरून आपण 'जगीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें, जगीं वंद्य तें सर्वभावें करावें,' या उक्तीनुसार वागावयाचें असतें. 'बहुत सुकृताची जोडी म्हणुनी विठ्ठलीं आवडी, म्हणुनी तवस्थानीं आवडी' आपला उद्धार होण्यासाठीं या ज्ञानभांडारांतील रत्नें शोधलीं पाहिजेत. सर्व ग्रंथाचें सार-नवनीत सद्‌गुरु प्राप्त करून देतात. नुसते ग्रंथ वाचून काम भागणार नाहीं. त्यामुळें आपला उद्धार कसा होईल हें समजत नाहीं. समजणार नाहीं, ग्रंथवाचनानें चित्तांतील अहंकार नष्ट होत नाहीं. खरोखर आम्ही सज्जन कीं दुर्जन ? आम्ही करतों ती कृति बरोबर कीं चूक असें नाना प्रकारचे संशय मनाला ग्रासून टाकतात. 'भ्रामयन् सर्व भूतानि' अज्ञानामुळें मग मन सैरावैरां भटकूं लागतें.

## गुरु मार्गदर्शनाची जरूरी

सत्त्वगुणांत पडून सुद्धां मनुष्य भ्रमण करतो. वाईट चांगलीं कर्मै आपण करतों. प्रत्येक व्यक्ति आपल्या कार्याला जबाबदार आहे. आपल्या हातून निंद्य कर्म घडूं नये, वंद्य कर्म घडावें यासाठींच बहुत सुकृताची जोडी पाहिजे. पूर्वजन्मीं जमलें नसेल. या जन्मीं तरी साधून घेऊं या. त्यासाठीं जागरुकतेनें वागूंया. 'विद्वान् जड पंडित कर्मांचा निर्णय देऊं शकत नाहींत. परमेश्वरा, जे तुला अनन्यभावानें शरण जातात त्यांना तूं सद्‌गति देतोस मग माझ्यावर कां कृपा करीत नाहींस ! माझ्या मनाला शांति कां मिळत नाहीं ! मला लोभ कां ! विषयवासनांमध्यें मीं कां लिडबिडलेला ! या जंजाळांतून मुक्त होण्यासाठीं गुरु मार्ग लागतो. राम, कृष्ण, विष्णु हीं सर्व आदिनारायणाचीं रूपें आहेत. 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्' हें परमेश्वराचें ब्रीद आहे. आणि आणि या ब्रीदाचा अनुभव या कलियुगांत कित्येकदां आलेला आहे. त्यासाठीं सद्‌गुरूची जरूरी आहे. मग 'झालें रामराज्य काय उणें आम्हांस' असें वातावरण होईल. संतांना वाटलें त्याप्रमाणें त्यांनीं वातावरण निर्माण केलें. विठ्ठल रखुमाई, रामकृष्ण हरि, रघुपति

राघव राजाराम' या प्रमाणें अनेक नांवांनीं, अनेक मार्गांनीं परमेश्वराला आळविण्याचे मार्ग संतांनीं मानव प्राण्याला दाखवून दिले. स्वतः आचरले आणि एकनिष्ठपणानें परम दयाळू भगवंताचें नामस्मरण केलें तर परमेश्वरप्राप्ति होतेच होते असें स्वतःच्या उदाहरणानें पटवून दिलें. अनन्यभावानें परमेश्वराला शरण जा, मग परमेश्वर तुमचाच. हें शरण कसें जायचें तें सद्गुरूंना विचारा. 'मग देव माझा मी देवाचा' याची प्रचीति येईल.

## परमेश्वर भक्ति हाच मार्ग

लोकांचें दुःख पाहून संतांना दया येते. तें दुःख नाहींसें करण्यासाठीं परमेश्वरभक्ति हा एकच एक मार्ग असल्याचें पटवून द्यायला ते तयार असतात. साधुसंत सांगतात, प्रत्येक मनुष्य राम आहे. ज्या कैकयीनें दुष्टावा केला तिच्याबद्दलहि प्रेम. प्रभु रामचंद्रानें प्रत्येक बाबतींत आदर्श घालून दिला. अशी एकही गोष्ट नाहीं, कीं ती आदर्श नाहीं असें होऊं शकेल. 'ईश्वर सर्व भूतानां' हें आम्ही पाठ करतों. प्रभुराम आत्माराम आहे हें आम्हांला सहज पटत नाहीं. आणि म्हणूनच अधर्म बळावतो. भक्तियुक्त वातावरण जेथें निर्माण होतें, तेथें अधर्माला भीति पडते. आणि म्हणूनच परम दयाळू भगवानानें दाखवून दिलें कीं, सद्गुरूंचे मार्गदर्शनामुळें कोणत्याही वयांत कोणालाही परमेश्वराची प्राप्ति करून घेतां येते.

अगदीं बालध्रुव किंवा प्रल्हाद पहा. कोवळ्या वयांत भगवंताच्या प्राप्तीची तळमळ लागली त्यांना. तुकाराम महाराज अठरा विश्वे दारिद्र्यांतही भक्ति मार्गापासून च्युत झाले नाहींत.

## भगवंताचें गुरुशिवाय चाललें नाहीं

परमेश्वरा मी जसा आहे तसा तुझा आहे. परमेश्वर कसा आहे ? निराकार निर्गुण पण मानवरूपानें तो निरनिराळीं चरित्रें दाखवतो. तुमच्याच प्रमाणें मी वागतों. पण मला वासनांची बाधा मात्र होत नाहीं. तुमच्याच प्रमाणें वागून, राहून मी पटवून देतों कीं, सद्गुरुमहिमा अगाध आहे. मलाही गुरु करावा लागला. रामस्वरूपांत वसिष्ठ, विश्वामित्र, कृष्णस्वरूपांत सांदीपनि आणि अशा आदर्श गुरुशिष्यांच्या किती तरी जोड्या दाखवून देतां येतील.

परोपकाराय सतां विभूतयः । मलाही प्रारब्ध आहे. राजकुलांत जन्म घेऊन राजासारखा आदर्श मी दाखवतों. किती मोह आहेत. भगवद्भक्तांना संकटें नव्हतीं का ? तुमचीं इंद्रियें शाबूत आहेत. डोळ्यांनीं दिसतें आहे ना ? मग जगाकडे पापी दृष्टीनें कां पाहतां ? प्रेमानें पाहा. वैषयिक भावनेनें पाहूं नका. कानांनीं चांगलें ऐका. पायांनीं चांगली वाट धरा. ही इंद्रियें केवळ विषयोपभोगासाठींच आहेत काय ?

स्तुति करावी परमेश्वराची । करूं नये व्यर्थ कधीं नराची ॥

स्तुतीला पात्र फक्त परमेश्वरच. आपल्या कर्तव्यकर्माला अवश्य जागायचें. उपजीविकेचें साधन चालू ठेवायचें, हें नाटक परमेश्वराचें आहे. तो पार्ट उत्तम झाला पाहिजे.

उत्तम नट एखाद्या भूमिकेंत तादात्म्य पावल्यामुळेंच टाळ्या मिळवतो—अशा टाळ्या आपण मिळवल्या पाहिजेत. त्यासाठीं अगोदर आपली टाळी वाजली पाहिजे. आपण आपल्या कर्तव्याशीं एकनिष्ठ राहिलें पाहिजे. वांट्याला आलेलें काम चोख बजावलें पाहिजे. गाडीमध्यें कोण बसला आहे याची आपणाला दाद असते का? स्टेशन आलें कीं जो तो उतरून चालला. हातरुमालानें 'सीट' पुसून आपण गाडींत बसतों. आणि तोंच रुमाल तोंड पुसायला वापरतों. माणसाला समजत नाहीं कीं एक गोष्ट आपण स्वच्छ करायला जातों तों दुसरी गलिच्छ होत असते. वासना तसें फळ, वासनेमुळें पुढचा जन्म मिळतो. स्त्रियांसारखा नट्टा पट्टा करून सतत वागणाऱ्या माणसाला पुढला जन्म स्त्रीचाच यायचा. पुढच्या जन्माचा विचार कसला करतां? आज आलेल्या जन्माचा पुरेपूर विचार करा आणि तो जन्म सार्थकीं कसा लागेल याची अहोरात्र काळजी बाळगा. जन्माचें सार्थक कसें करावें हें शिकविणारा सद्गुरुच होय.

भगवंताची नियति अगाध आहे. त्याच्या कायद्यापुढें कोणाचें चालणार नाहीं. अडचणीचे वेळीं उपयोगी पडणारा माझा पांडुरंग अपघाताचे वेळींही असतो. अपघात, अडचणी, पूर्व सुकृतामुळें येतात. पांडुरंगाचे कृपेमुळें त्यांची तीव्रता कमी होते. त्यांचें निरसन होतें. कोणत्याहि मोहाला बळी न पडतां आपलें कार्य करायचें आणि हाच निश्चय सतत मनीं बाळगायचा. कोण म्हणतो तुकाराम महाराज निष्क्रीय होते? दुर्बळ होते? ते वीर होते, ते सदेह वैकुंठाला गेले. तुका झाला पांडुरंग.

## काळ्या पांढऱ्याची गोष्ट

माणसाला उच्चपदीं चढवायचें हेंच ध्येय ना? जो मनुष्यप्रेमी आहे त्यानेंच हें करावें. राष्ट्रांनीं करावें. साधुसंतांच्या संगतींत राहण्यासाठीं कोणीहि झटावें आणि अंतीं उच्चपदीं चढावें. साधुसंत, सद्गुरु हेच या जगांतील प्रति परमेश्वर होत. त्यांची आपण कास धरावयाची, त्यांच्या सहवासांत रहावयाचें. त्यांना सर्वस्व अर्पण करावयाचें, त्यांची कृपा संपादन करावयाची. परमेश्वर हेंच या जगांतील एक सत्य आहे. १०० रुपयांची जरूर एकाला होती. त्यानें मित्राला विचारलें, आठ दिवसांनीं ये असें मित्रानें सांगितलें. हा गरजू गेला ९ व्या दिवशीं. झालें. मित्रानें सांगितलें आठ दिवसांनीं बोलावलें असतां ९ व्या दिवशीं कां आलास? पैसे कालच खर्च केले. ही पळवाट पैसे देण्याची इच्छा नसलेल्या मित्रानें काढली. आपल्यासाठीं काय तें करा. आपली दृष्टी बदला. आपली दृष्टि बदलली तर सर्व जग बदलेल. जग वाईट, मी चांगला ही भावना असते म्हणून सर्व बिघडतें!' काय केलें असतां मी सुखी होईन? परमेश्वर शाश्वत आहे. त्याच्या प्राप्तीसाठीं झटलों तर मी निश्चित सुखी होईन. परमेश्वरप्राप्ती झाली कीं, दुसरें काय हवें? सौंदर्यापेक्षां गुणाला अधिक महत्व आहे. सौंदर्य असून गुण असले तर उत्तमच. या संदर्भात काळ्या पांढऱ्याची गोष्ट ऐकण्यासारखी आहे—

एक तरुण राजा होता. त्याला राजवाड्याबाहेरचं विश्व माहीतच नव्हतें. त्याला राज्यांत हिंडायची आली लहर. हिंडतां हिंडतां तो कोळशाच्या वखारीपाशीं आला.

राजानें कोळसा कधींच पाहिला नव्हता. म्हणून तो कोळशाच्या पोत्यांजवळ जाऊं लागला. नोकरानें जवळ गेल्यास अंगाला काळें लागेल असें सांगितलें. कोळसा काळा आहे तर तो धुवून सफेद करा असा राजानें हुकूम केला. त्या हुकुमाप्रमाणें वखारीतील कोळशाचीं पोतीं नदीवर नेलीं गेलीं. कोळसे पाण्यांत भिजवायचे, साबण लावायचा असा सपाटा सुरू झाला. कोळसा पांढरा होईना. प्रधान हुशार होता. प्रधानानें राजाला सांगितलें, 'केस पांढरे होतील पण कोळसा पांढरा होणार नाहीं. कोळसा कितीही धुतला तरी काळाच रहायचा. जो आंतून काळा तो बाहेरून कितीही धुतला तरी काळाच. कोळसा पांढरा होईल. पण त्याला उपाय निराळा आहे. प्रधानानें थोडेसे कोळसे घेतले आणि पेटवले. कोळसे पेटल्यानंतर जळून नरम सफेद राख झाली. राख होत असतां अन्न शिजवण्याचे कार्य कोळसा करतो. त्याप्रमाणें माणसानें परोपकारासाठीं देह झिजवावा.

भक्तिविना वश नोहे, वीण्यानें वा मृदंग नादानें' देव भावाचा भुकेला. देवाला प्रेममय भक्ति पाहिजे. अयोग्य ज्ञानामुळें अहंकार वाढतो. घरोघर कोळशाचें पांढरें होत असतें तसें सर्व जगभर झालें पाहिजे. काळें अंतःकरण पांढरें व्हावयाचें असेल तर अंतर्मुख झालें पाहिजे. तें कसें व्हावें हें ज्ञान सद्‌गुरुपासून मिळतें. असा हा आत्म-कल्याणाचा मार्ग साधुसंतांनीं घालून दिला तोच आपण अनुसरला पाहिजे.

पुष्कळ प्रकारचें अन्न आहे. पण त्यांत भात नाहीं तर समाधान नाहीं. हें समाधान एका भातामुळें लाभतें. म्हणून एका देवतेची उपासना करावी. एका सत्पुरुषाला आदर्श मानावा. त्याचें मार्गदर्शन स्वीकारून त्याप्रमाणें वागावें. तुकाराम महाराज भंडारा डोंगरावर रामकृष्ण हरी भजन करीत राहिले. कंटाळा आला तर विठ्ठल, विठ्ठल म्हणत.

आपलें घरच एक मोठी प्रयोगशाळा आहे. काम-क्रोध जिंकायचे तर घरीं जिंका. तुकाराम महाराज एवढ्या कजाग बायकोलादेखील जिजाई, पांडुरंग आहे असें म्हणत. परमेश्वर कसोटी पाहातो. कसोटीशिवाय सचोटीची परीक्षा होणार नाहीं. हा भक्तिमार्ग सर्वांसाठीं आहे. रामही अवतार, रावणही अवतार. रावणानेंही अपार भक्ति केली. पण ती वाममार्गी होती. त्याला चांगला मार्गदर्शकच भेटला नाहीं.

यासाठीं ज्यांना दिव्यत्वाचा लाभ करून घ्यावयाचा आहे, त्यानें सद्‌गुरुचा सहकार हा मिळविलाच पाहिजे. तसेंच आजवर साधुसंतांनीं जें मार्गदर्शन केलें आहे, तो मार्ग चोखाळला पाहिजे.



उत्तम नट एखाद्या भूमिकेंत तादात्म्य पावल्यामुळेंच टाळ्या मिळवतो—अशा टाळ्या आपण मिळवल्या पाहिजेत. त्यासाठीं अगोदर आपली टाळी वाजली पाहिजे. आपण आपल्या कर्तव्याशीं एकनिष्ठ राहिलें पाहिजे. वांट्याला आलेलें काम चोख बजावलें पाहिजे. गाडीमध्यें कोण बसला आहे याची आपणाला दाद असते का? स्टेशन आलें कीं जो तो उतरून चालला. हातरुमालानें 'सीट' पुसून आपण गाडींत बसतों. आणि तोंच रुमाल तोंड पुसायला वापरतों. माणसाला समजत नाहीं कीं एक गोष्ट आपण स्वच्छ करायला जातों तों दुसरी गलिच्छ होत असते. वासना तसें फळ, वासनेमुळें पुढचा जन्म मिळतो. स्त्रियांसारखा नट्टा पट्टा करून सतत वागणाऱ्या माणसाला पुढला जन्म स्त्रीचाच यायचा. पुढच्या जन्माचा विचार कसला करतां? आज आलेल्या जन्माचा पुरेपूर विचार करा आणि तो जन्म सार्थकीं कसा लागेल याची अहोरात्र काळजी बाळगा. जन्माचें सार्थक कसें करावें हें शिकविणारा सद्गुरुच होय.

भगवंताची नियति अगाध आहे. त्याच्या कायद्यापुढें कोणाचें चालणार नाहीं. अडचणीचे वेळीं उपयोगी पडणारा माझा पांडुरंग अपघाताचे वेळींही असतो. अपघात, अडचणी, पूर्व सुकृतामुळें येतात. पांडुरंगाचे कृपेमुळें त्यांची तीव्रता कमी होते. त्यांचें निरसन होतें. कोणत्याहि मोहाला बळी न पडतां आपलें कार्य करायचें आणि हाच निश्चय सतत मनीं बाळगायचा. कोण म्हणतो तुकाराम महाराज निष्क्रीय होते? दुर्बळ होते? ते वीर होते. ते सदेह वैकुंठाला गेले. तुका झाला पांडुरंग.

### काळ्या पांढऱ्याची गोष्ट

माणसाला उच्चपदीं चढवायचें हेंच ध्येय ना? जो मनुष्यप्रेमी आहे त्यानेंच हें करावें. राष्ट्रांनीं करावें. साधुसंतांच्या संगतींत राहण्यासाठीं कोणीहि झटावें आणि अंतीं उच्चपदीं चढावें. साधुसंत, सद्गुरु हेच या जगांतील प्रति परमेश्वर होत. त्यांची आपण कास धरावयाची, त्यांच्या सहवासांत रहावयाचें. त्यांना सर्वस्व अर्पण करावयाचें, त्यांची कृपा संपादन करावयाची. परमेश्वर हेंच या जगांतील एक सत्य आहे. १०० रुपयांची जरूर एकाला होती. त्यानें मित्राला विचारलें, आठ दिवसांनीं ये असें मित्रानें सांगितलें. हा गरजू गेला ९ व्या दिवशीं. झालें. मित्रानें सांगितलें आठ दिवसांनीं बोलावलें असतां ९ व्या दिवशीं कां आलास? पैसे कालच खर्च केले. ही पळवाट पैसे देण्याची इच्छा नसलेल्या मित्रानें काढली. आपल्यासाठीं काय तें करा. आपली दृष्टी बदला. आपली दृष्टि बदलली तर सर्व जग बदलेल. जग वाईट, मी चांगला ही भावना असते म्हणून सर्व बिघडतें!' काय केलें असतां मी सुखी होईन? परमेश्वर शाश्वत आहे. त्याच्या प्राप्तीसाठीं झटलों तर मी निश्चित सुखी होईन. परमेश्वरप्राप्ती झाली कीं, दुसरें काय हवें? सौंदर्यापेक्षां गुणाला अधिक महत्व आहे. सौंदर्य असून गुण असले तर उत्तमच. या संदर्भांत काळ्या पांढऱ्याची गोष्ट ऐकण्यासारखी आहे—

एक तरुण राजा होता. त्याला राजवाड्याबाहेरचें विश्व माहीतच नव्हतें. त्याला राज्यांत हिंडायची आली लहर. हिंडतां हिंडतां तो कोळशाच्या वखारीपाशीं आला.

राजानें कोळसा कधींच पाहिला नव्हता. म्हणून तो कोळशाच्या पोत्यांजवळ जाऊं लागला. नोकरानें जवळ गेल्यास अंगाला काळें लागेल असें सांगितलें. कोळसा काळा आहे तर तो धुवून सफेद करा असा राजानें हुकूम केला. त्या हुकुमाप्रमाणें वखारीतील कोळशाचीं पोतीं नदीवर नेलीं गेलीं. कोळसे पाण्यांत भिजवायचे, साबण लावायचा असा सपाटा सुरू झाला. कोळसा पांढरा होईना. प्रधान हुशार होता. प्रधानानें राजाला सांगितलें, 'केंस पांढरे होतील पण कोळसा पांढरा होणार नाहीं. कोळसा कितीही धुतला तरी काळाच रहायचा. जो आंतून काळा तो बाहेरून कितीही धुतला तरी काळाच. कोळसा पांढरा होईल. पण त्याला उपाय निराळा आहे. प्रधानानें थोडेसे कोळसे घेतले आणि पेटवले. कोळसे पेटल्यानंतर जळून नरम सफेद राख झाली. राख होत असतां अन्न शिजवण्याचे कार्य कोळसा करतो. त्याप्रमाणें माणसानें परोपकारासाठीं देह झिजवावा.

भक्तिविना वश नोहे, वीण्यानें वा मृदंग नादानें' देव भावाचा भुकेला. देवाला प्रेममय भक्ति पाहिजे. अयोग्य ज्ञानामुळें अहंकार वाढतो. घरोघर कोळशाचें पांढरें होत असतें तसें सर्व जगभर झालें पाहिजे. काळें अंतःकरण पांढरें व्हावयाचें असेल तर अंतर्मुख झालें पाहिजे. तें कसें व्हावें हें ज्ञान सद्‌गुरुपासून मिळतें. असा हा आत्म-कल्याणाचा मार्ग साधुसंतांनीं घालून दिला तोच आपण अनुसरला पाहिजे.

पुष्कळ प्रकारचें अन्न आहे. पण त्यांत भात नाहीं तर समाधान नाहीं. हें समाधान एका भातामुळें लाभतें. म्हणून एका देवतेची उपासना करावी. एका सत्पुरुषाला आदर्श मानावा. त्याचें मार्गदर्शन स्वीकारून त्याप्रमाणें वागावें. तुकाराम महाराज भंडारा डोंगरावर रामकृष्ण हरी भजन करीत राहिले. कंटाळा आला तर विठ्ठल, विठ्ठल म्हणत.

आपलें घरच एक मोठी प्रयोगशाळा आहे. काम-क्रोध जिंकायचे तर घरीं जिंका. तुकाराम महाराज एवढ्या कजाग बायकोलादेखील जिजाई, पांडुरंग आहे असें म्हणत. परमेश्वर कसोटी पाहातो. कसोटीशिवाय सचोटीची परीक्षा होणार नाहीं. हा भक्तिमार्ग सर्वांसाठीं आहे. रामही अवतार, रावणही अवतार. रावणानेंही अपार भक्ति केली. पण ती वाममार्गी होती. त्याला चांगला मार्गदर्शकच भेटला नाहीं.

यासाठीं ज्यांना दिव्यत्वाचा लाभ करून घ्यावयाचा आहे, त्यानें सद्‌गुरुचा सहकार हा मिळविलाच पाहिजे. तसेंच आजवर साधुसंतांनीं जें मार्गदर्शन केलें आहे, तो मार्ग चोखाळला पाहिजे.



# आदि ग्रंथांतील नामदेवांची वाणी

—अनुवादक : **ग. वि. कविटकर** एम्. ए.

**शिखांच्या पवित्र आदि ग्रंथांतर्गत नामदेवांच्या हिंदी पद्यांचा श्री. कविटकर, एम्. ए. यांनीं केलेला अनुवाद वाचकांसाठीं क्रमशः प्रसिद्ध करण्यांत येत आहे. नामदेव सांगतात, तुमचे सारे खटाटोप व्यर्थ आहेत. सद्‌गुरूची कृपा संपादन करून घे म्हणजे तुझा कैवल्यमार्ग सरळ व सुखाचा होईल; हा संसार सागर तूं तरून जाशील. संत नामदेवाचें गुरुशिवाय भागलें नाहीं. विसोबा खेचरानें डोळ्यांत अंजन घातलें तेव्हांच त्याला दिव्य दृष्टीचा लाभ झाला, सद्‌गुरु महात्म्यच तसें आहे.**

: २२ :

श्रीगुरूनीं माझ्या जन्माचें सार्थक केलें. त्यायोगें दुःखाचा विसर होऊन अंतर्यामीं सुखाची प्राप्ती झाली. श्रीगुरूंनीं माझ्या डोळ्यांना ज्ञानरूपी अंजन लावून मला दिव्यदृष्टि दिली. रामनामाशिवाय मानवी जीवन व्यर्थ होय. नामस्मरणानें प्रभूची ओळख झाली आणि सर्व प्राणि मात्रांचा आधार असलेल्या त्या प्रभूशीं माझें जीवन एकरूप झालें.

: २३ :

जनहो, तुम्ही अनेक अश्वमेध यज्ञ केलेत, सुवर्णतुला करून सोनें दान केलेत व त्रिवेणी प्रयोगाच्या ठिकाणीं स्नानें केलींत तरी तीं सर्व एका हरिनामाची बरोबर करूं शकणार नाहींत. हे आळशी मना ! तूं प्रभुरामचंद्राचें एकभावें भजन कर. गयेला जाऊन पिंडदान करणें, काशीस जाऊन चार वेद मुखोद्गत करणें, सकल धर्मकर्मे पूर्णपणें करणें, षट्कर्मांचें अनुष्ठान करणें, शिवपार्वती संवाद श्रवण करणें या सर्व कर्मांची उठाठेव हवी कशाला ! हे मना ! तूं हा सर्व बाह्य खटाटोप सोडून दे. **सद्‌गुरुकृपेनें इंद्रियावर विजय प्राप्त करून घे** आणि गोविंदाचे नामस्मरण कर म्हणजे हा संसार सागर तरुन जाशील.

: २४ :

नादाच्या योगें मृग देहभान विसरतो. इतकें, कीं प्राण गेला तरी हरकत नाहीं; परंतु त्याचें लक्ष दुसरीकडे जातच नाहीं. त्याप्रमाणें माझें चित्त प्रभु रामारायाशीं एकरूप झालें आहे. तेथून तें बाहेर कोठेंहि जात नाहीं. पाणबुड्या पक्षी उंचावरून माशावर नजर ठेवितो. सुवर्णकार दागिने घडवीत असतां त्याची दृष्टि दागिन्यावर खिळलेली असते. विषयी पुरुषाचें मन परस्त्री न्याहाळीत असतें आणि जुगार खेळणारा कवड्या चालवून दुसऱ्याचें चित्त हरण करतो, त्याप्रमाणें नामदेवांचें चित्त श्रीहरिचरणीं वेधलें आहे. जेथें पाहतो येथें प्रभुरामरायाच दिसत आहेत.

: २५ :

हे बापा विठ्ठला ! तूं मला उद्धरून ने ! मला तार !! मी अजाण आहे. मला संसार सागर पोहून जाण्याचें ज्ञान नाहीं. तूं मला आपला हात दे. क्षणार्धांत नराचा नारायण कसा होतो, याचें ज्ञान मला श्रीगुरुकडून झालें आहे. मानव देहांत जन्म घेऊन स्वर्ग कसा जिंकावा तें औषध मला प्राप्त झालें आहे. देवा ! जेथें ध्रुव आणि नारद वास करीत आहेत तेथें मला थोडा काल नेऊन ठेव. तुझ्या नामाचा आश्रय केल्यामुळें अनेक लोक उद्धरून गेले असें नामदेवांचें स्वतःचें मत आहे.

: २६ :

हे देवा ! तुझ्या भेटीसाठीं मी व्याकूळ झालों आहे. वासराशिवाय गाईला एकटें एकटें वाटतें, पाण्यावाचून मासा तळमळत राहतो. तसेंच रामनामाशिवाय नामदेव लाचार आहे. बांधलेल्या डोळ्यांतून मोकळें सुटतांच गाईच्या अंचळांतील दूध वासरानें पिऊन टाकावें तद्वत् नामदेवांनीं ईश्वर प्राप्ति करून घेतली. **श्रीगुरुदेव भेटतांच अप्राप्त वस्तूची प्राप्ति होते.** विषयी पुरुष परस्त्री शोधीत राहतो त्याप्रमाणें ईश्वराच्या ठिकाणीं नामदेवांचें प्रेम जडलें आहे. प्रखर सूर्यतापानें दाह व्हावा, तसाच हरिनामाशिवाय बिचारा नामदेव भाजून निघत आहे.

: २७ :

ईश्वराचें नामस्मरण केल्यानें सर्व भ्रम नाहींसे होतात. नामस्मरण हा अत्यंत उत्तम धर्म आहे. त्यायोगें जातिहीनत्व आणि कुलहीनत्व नाहींसें होतें. ईश्वर हा आंधळ्याची काठी आहे. अशा ईश्वराला माझा नमस्कार असो. आम्ही त्याला वंदन करतों. ईश्वराच्या नामस्मरणानें मृत्यूच्या यातना नाहींशा होतात. देवानें हिरण्य कश्यपूस ठार केलें. अजामिळाला वैकुंठास नेलें. पोपटास नामोच्चार शिकविणारी गणिका उद्धरून गेली. तो प्रभु माझ्या डोळ्यांतील बाहुली आहे. बालकाचा घात करण्यास तयार झालेली कपटी पूतनासुद्धां उद्धरून गेली. नामस्मरणानें द्रौपदीचा उद्धार झाला. गौतमऋषीची पत्नी अहल्या शिळेंतून मुक्त झाली. देवानें केशी आणि कंस या राक्षसांना ठार केलें व कालिया नागाला जीवदान दिलें. नामदेव म्हणतात, माझा श्रीहरी हा असा आहे. त्याच्या नामाचा जप केला असतां भीति व दुःख नाहींशीं होतात.

: २८ :

काल भैरवादि देवतांची भक्ति करितात त्यांचा पुढील जन्म भूतपिशाच्चादि योनींत होतो. शीतलादेवीची पूजा करितात ते पुढील जन्मीं गाढवावर बसणाऱ्या व धूळ उडविणाऱ्या अशा नष्ट मानव योनींत जन्माला येतात. अन्य सर्व देवदेवता सोडून त्यांच्या बदल्यांत मी एकाच प्रभूची भक्ति करतों. शिव शिव असा जप करीत शिवभक्ति करतील ते शंकराप्रमाणेंच बैलावर बसून डमरु वाजवित राहणार. जो कोणी महाचंडीची उपासना करील त्याला स्त्रीचा जन्म घ्यावा लागणार. हे महामाये ! तूं आदिभवानी म्हणवितेस तर मग मला मुक्त करण्याचे वेळीं तूं कुठें लपून बसली होतीस ! **श्रीगुरुकृपेनें मी ईश्वराशीं एकरूप झालों आहे.** नामदेव म्हणतात, गीतेंत हेंच सांगितलें आहे.

# संतांच्या सहवासांतील सुखाचे क्षण

**संतांचा सहवास म्हणजे भगवंताचा सहवास-त्यांच्याच सहवासांत राहून आपण ब्रम्हानंदाची गोडी चाखूं शकतों. संतांच्या आचरणांत भिन्नपणा आढळून येतो खरा; परंतु ते सर्व कैवल्याचे अधिकारी–मानकरी होऊन राहिलेले असतात. आपणासही कैवल्याचा मार्ग तेच दाखवूं शकतात. श्रद्धा–संपूर्ण श्रद्धा मात्र पाहिजे.**

' संत सर्व असतीच थोर । ना उणा अधिक एक ॥

त्या दिवशीं श्रीसच्चिदानंद सद्‌गुरु महाराज आमच्या घरीं रहावयास होते. ' संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ॥ या उक्तिप्रमाणें आमच्या घरचें वातावरण त्यामुळें संपूर्ण आनंदमय होतें. सर्वांचीं मनें प्रफुल्लित आणि उत्साहीत होतीं. अनेक मंडळी त्यांच्या दर्शनास येऊन गेली. आपल्या अडचणी आणि दुःखें त्यांच्या पुढें मांडलीं. त्यांनीं त्यावर सांगितलेल्या उपायांनीं समाधान पावून मंडळी निघून गेलीं.

## संतांत भेदभाव नाहीं

मंडळीबरोबर अध्यात्मपर गोष्टीही होत असत. परमार्थपर चर्चा चालू असतांना उपस्थितापैकीं एका व्यक्तीनें म्हटलें, मी अनेक संतांची चरित्रें वाचलीं, परंतु प्रा. बेलसऱ्यांनीं लिहिलेलें श्री गोंदवलेकर महाराजांचें चरित्र मला फारच आवडलें. त्यांच्या सारखा संत झालाच नसावा. महाराज म्हणाले, तुम्ही पुण्याच्या बिडकर महाराजांचें चरित्र

---



आज नामदेवांना श्रीविठ्ठलरायाचें दर्शन झालें. पण ही गोष्ट या मूर्खाला कोण समजून सांगणार? हे पंडिता! तुझी गाय एका लोध्याचें (खडवळाचें) शेत खात होती. त्या लोध्यानें हातांत काठी घेऊन तिच्या पायावर मार दिला. लंगडत लंगडत जातांना तिला मी पाहिलें. हे पंडिता! तुझा महादेव पांढऱ्या बैलावर बसून येत असतांना मी पाहिला. त्यानें वाण्याच्या (श्रियालाच्या) घरीं मुलाला (चिलिआला उखळांत घालून) ठार करून पाकसिद्धि केली. हे पंडिता! तुझा श्रीरामचंद्रहि प्रत्यक्ष येतांना मी पाहिला. त्यानें स्वतःची घरची बायको गमावली आणि रावणाशीं भांडण केलें. हिंदु आंधळे व तुर्क लोक तिरळे आहेत. दोहोंपैकीं जो ईश्वरास जाणतो तो शहाणा. हिंदु देवळांत देवाची पूजा करतात. आणि मुसलमान मशिदींत नमाज पढतात. पण मी नामदेव मात्र ज्याला देऊळ नाहीं आणि मशीदहि नाहीं, जो सर्वत्र आहे त्या ईश्वराची पूजा करतों.

---

वाचलें आहे ना ? त्यांचें चरित्र किती लीलापूर्ण आणि चमत्कृतींनीं भरलेलें आहे. त्यांचें चरित्र साधुपुरुष कसा असूं शकतो, याचा एक आदर्श आहे हें सांगितलें तर त्यांत अतिशयोक्ति आहे असें मला वाटत नाहीं. त्यांनीं संपूर्ण संसारसुख भोगलें, चैनींत आणि ऐषआरामांत आयुष्य घालविलें. पण अखेर ते एक थोर सत्पुरुष झाले खरें ना हें ?

उत्तर 'खरेंच कीं !'

महाराजः—हें जर खरें असेल तर हा संत उत्तम, तो कमी प्रतीचा आणि हा तिसरा त्याहूनही कमी, असें म्हणणेंच मुळीं उचित नसतें. पहा, ईश्वर निरनिराळ्या अवतारांत आणि स्वरूपांत असला तरी तो एकच आहे. तसेंच सर्व संतही आहेत. ते ईश्वराचे प्रेषित असतात. आम्हीं शिकलेलीं माणसें मात्र अशा रीतीनें काथ्याकूट करून द्वैत वाढवतों. उलटपक्षी इस्लाम धर्मीय माणसें पहा. 'अल्ला' एकच आहे हा त्यांचा दृढविश्वास. ते कोठेंही असोत. गाडींत बसलेले असोत, किंवा घरांत असोत; नाहींतर उकिर्ड्यावर बसलेले असोत, प्रार्थनेची वेळ झाली म्हणजे मक्केच्या दिशेनें तोंड करून ते गुढगे टेकीत असतात. हीच त्यांच्या अद्वैताची खूण.

### आईचा सर्वांशीं समभाव

आतां दुसरें उदाहरण घेऊं. एका फुलदाणींत ताजीं टवटवीत मोगऱ्याचीं, गुलाबाचीं, सोनचाफ्याचीं, जाई-जुईचीं अशीं अनेक जातींचीं उत्तमोत्तम सुवासिक फुलें ठेवलेलीं आहेत. तुम्हांला सांगितलें कीं, या फुलदाणींतून सर्वोत्तम असें फूल निवडून घेऊन या. तुम्ही हें करूं शकाल कां ? नाहीं. कारण सर्वच फुलें उत्तम आहेत. तसेंच या संतांच्या बाबतींत आहे. त्यांच्यांत हा चांगला, हा गौण अशी निवड करतां यावयाची नाहीं.

आतां पहा, आपल्या घरचेंच उदाहरण घेऊं. आई आहे. तिला पांच मुलें-मुलीं आहेत. त्यांत सुनाही आहेत. मनुष्यस्वभावानुसार प्रत्येकाची रुचि भिन्नता असणारच. आतां आई स्वयंपाक करते, तेव्हां ती हें आपल्या पतीराजाकरतां, हें आपल्या आवडत्या मुलांकरितां, हें सुनांकरितां. असें कधीं करते का ? नाहीं. तीं आपलें मन आणि प्रेम ओतून अन्न सर्वांकरितां सारखेंच शिजवीत असते. आणि प्रत्येकजण आवडीनें ग्रहण करीत असतो. ती जशी सर्वांना सारखेंच लेखते, तसेंच संत सर्व सारखेंच असतात.'

'राजा असतो. तो राज्य सुव्यवस्थेसाठीं आपल्या राज्याचे निरनिराळे भाग पाडतो आणि प्रत्येक भागावर आपला प्रतिनिधी किंवा अधिकारी नेमतो. त्याचप्रमाणें हें विश्व ईश्वराचें साम्राज्य आहे. त्याच्या प्रत्येक भागावर पदनताच्या उद्धारासाठीं तो आपले संतरूपी अधिकारी वा प्रतिनिधी पाठवित असतो. त्या त्या ठिकाणचे कार्य झालें म्हणजे संतही आपलें अवतार कार्य संपवितात. तात्पर्य संत हे प्रति ईश्वरच आहेत; तेव्हां त्यांच्यांत उचनीच हा प्रकारच संभवत नाहीं.'

या खुलाशानें त्या व्यक्तीचें समाधान झालें.

## श्रीसाईबाबासाठीं नारळ

या विवेचनावरून संतवाङ्मय वाचण्यांतला एक प्रसंग आठवतो, तो येथें दिल्यास अस्थानीं होईल असें वाटत नाहीं. संत एकमेकांना भेटतात त्यावेळीं त्यांची सांकेतिक बोलणीं होत असतात. त्यांचा भावार्थ समजण्यास आपली पारमार्थिक पातळी तेवढीच उंचावलेली असली पाहिजे. संत एकमेकांस बंधू मानतात. प्रत्यक्ष श्रीदत्तावतारी वासुदेवानंद सरस्वती महाराजांनीं आपल्या परिभ्रमणांत एका गृहस्थाकडे श्रीसाईबाबांसाठीं एक नारळ दिला व म्हटलें, 'हा माझ्या बंधूकडे न विसरतां नेऊन दे' तो गृहस्थ शिरडीस दर्शनार्थ आल्यावर साईनाथांनींहि मोठ्या प्रेमानें आणि आस्थेनें माझ्या बंधूनें दिलेला नारळ कोठें आहे? अशी त्या गृहस्थाकडे चौकशी केली. ही कथा सर्वश्रुत आहे. ही बंधुत्वाची खूण त्यांच्या भक्तांना कशी पटविली जाते हें पुढें पाहूं.

सर्व संत अंतर्ज्ञानी असतात. असेच एकदां श्रीवासुदेवानंद सरस्वती आपणांस भेटण्यास येणार आहेत हें शेगांवच्या श्रीगजानन महाराजांनीं अंतर्ज्ञानानें जाणलें. त्यांनीं आपला परमशिष्य बाळा ह्यास म्हटलें, 'अरे बाळा, उद्यां माझा भाऊ मला भेटावयास येणार आहे; त्याचें स्वागत करून आदर सत्कार करूंया. तो कर्मठ आहे. तेव्हां अंगण झाडून स्वच्छ ठेव. घाण दिसली तर तो रागावेल. जमदग्नीचा दुसरा अवतार आहे तो.'

## संशयाचें निरसन

गुर्वाज्ञेप्रमाणें बाळानें सर्व व्यवस्था चोख ठेविली. दुसऱ्या दिवशीं श्रीवासुदेवानंद-सरस्वती आले. दोघांची भेट झाली. एकमेकांकडे पाहून दोघांनीं स्मित हास्य केलें. उभयतांच्या चित्तास अनिवार हर्ष झालेला दिसून येत होता. दृष्टादृष्ट होतांच वासुदेवानंदसरस्वतींनीं परत जाण्याची आज्ञा मागितली. गजाननांनीं मान तुकविली. स्वामी निघून गेले. बाळा जवळून हें सर्व पहात होता. त्याला मोठें कौतुक वाटलें; पण त्याच्या मनांत एक शंका डोकावली. तो महाराजांस म्हणाला, 'गुरुराया, आपली ही भेट पाहून माझ्या मनांत संशय उपजला आहे, त्याची निवृत्ति करा. श्रीवासुदेवानंद सरस्वतींचा मार्ग आपल्या मार्गाहून भिन्न असतांना ते आपले बंधू कसे?' हें ऐकून महाराजांस अतिशय आनंद झाला. ते बाळास म्हणाले कीं, 'तूं चांगलाच प्रश्न विचारला आहेस.' नंतर त्यांनीं त्याला जो उपदेश केला तो नेहमींच उद्बोधक ठरणार आहे.

'पहा, ईश्वराकडे किंवा ज्ञानाच्या गांवीं जाण्याचे तीन मार्ग आहेत. यांचीं स्वरूपें भिन्न असल्यामुळें वरूनवरून त्यांच्याकडे पाहणारांचीं मनें गोंटाळतात.

सोवळें, ओवळें, संध्यास्नान, व्रतें, उपासणे, अनुष्ठान हीं कर्माचीं अंगें आहेत. जो यांचें निरलसपणें आचरण करतो तोच खरा कर्मठ म्हणवेल ओळखावा. आचरणांत विशेष तत्परता बाळगावी. त्यांत कोणतेंही न्यून असतां कामा नये. नाहींतर कर्म मार्ग

हातीं लागत नाहीं. दुसरी खबरदारी म्हणजे या मार्गाच्या साधकांनीं परांस दुरुत्तरें करून कधीं ताडूं नये.

**श्रीहरी केव्हां भेटतो ?**

भक्ति पंथानें जाणाराचें मन अतिशुद्ध असावें लागतें. मनांत मलीनता असली तर भक्ति रहस्य मुळींच त्याच्या हातीं येत नाहीं. दया, प्रेम, लीनता अंगीं बाणली पाहिजे; तसेंच श्रवणीं, पूजनीं आस्था हवी व मुखानें ईश्वराचें सारखें नामस्मरण केलें पाहिजे. ह्या अंगांसह जो भक्ति करतो, त्यालाच श्रीहरि भेटतो. या मार्गाचा विधि दिसावयास सोपा असला तरी तो आचरण्यास कर्ममार्गाहून अवघड आहे. जसें डोळयांना गगनाचें जवळपण भासतें तितकाच हा पंथ कठीण आहे.

आतां तिसरा योगमार्ग; ह्याचा पसारा वरील दोन्ही पंथाहून जास्त आहे. हा पसारा ज्याचा त्याच्या जवळ असून योग साधण्यासाठीं बाहेरचें कांहीं लागत नाहीं. योग करणाराला आसनें, रेचक, कुंभक, इडापिंगलेचे भेद, धौती वगैरेंचा अभ्यास करून कुंडली आणि सुषुम्ना यांचें ज्ञान करून घ्यावें लागतें. यामुळेंच त्याला योग साधतो.

या तिन्हीं मार्गांचें अंतिम फळ म्हणजे ज्ञान प्राप्ति होय. तथापि हें ज्ञान प्रेमाशिवाय असूं नये. जें कृत्य प्रेमाविण आहे तें व्यर्थ होय. या तिन्हीं मार्गांत प्रेमाचें रक्षण करावयास हवें. काळा, गोरा, खुजा, थोर, सुरूप कुरूप हे सर्व शरीराचे प्रकार आहेत. त्यांची बाधा आत्म्यास होत नाहीं. अवघ्यांचा आत्मा एकच आहे. तेथें केव्हांही फरक पडत नाहीं. हे शरीर भेद व्यावहारिक असल्यामुळें त्यांचें कौतुक करण्यांत अर्थ नाहीं. तद्वत् या तिन्हीं पंथांची स्थिति बाह्यस्वरूपें भिन्न असलीं तरी मूळ कारण एकच आहे. मुक्कामास पोंहचल्यावर मार्गाचा विचारच उरत नाहीं आणि जो मार्गी चालतो त्यास महत्वही वाटत नाहीं. उलट पक्षीं, पंथ चालण्यास आरंभ करून मुक्कामास गेला नाहीं, अशांचाच पंथाभिमानानें तंटा सुरूं होतो. या तिन्हीं मार्गांचे पांथस्थ मुक्कामास पोंचल्यावर संत होतात, मग त्यांच्या संबंधांत थोडेंसुद्धां द्वैत उरत नाहीं.

**मार्ग भिन्न–ध्येय एक**

वसिष्ट, वामदेव, जमदग्नी, अत्री, पाराशर, शांडिल्यमुनी हे कर्ममार्गद्वारें मुक्कामास गेले. व्यास, नारद, मारुती, शबरी, अक्रूर, सुदामा, पार्थ, विदूर यांनीं भक्तिपंथ आक्रमिला. श्रीशंकराचार्य, मच्छिंद्र, गोरख, जालंदर हे योग मार्गाचा जिना चढले. जो वसिष्टांना लाभ झाला, तोच विदुराच्या पदरीं पडला आणि मच्छिंद्रानींही तोच भोगिला. फळामध्यें कांहींच फरक नाही.

हीच प्रथा पुढें चालली. श्रीपादश्रीवल्लभ आणि श्रीनृहसिंहसरस्वती यांनीं कर्ममार्गाची बूज रक्षिली. नामा, सांवता, ज्ञानेश्वर, सेना, कान्होपात्रा, चोखा महार, दामाजी पंत ठाणेदार भक्तिमार्गानें गेलें. तसेंच श्रीगोव्याचे शेख महंमद, जालन्याच आनंदस्वामी, व सुरजी अंजनगांवचे देवनाथ योगाचे चहाते होते.

त्याचप्रमाणें सांप्रत वासुदेव कर्ममार्गी रत असून मी भक्तिपंथ धरला आहे. हे सर्व जाणत आहेत. पळुसचे धोंडीबुवा, सोनगीरचे नानाबावा, जालन्याचे यशवंतराव हे भक्तीचे पुरस्कर्ते होत; भुसावळच्या खाह्यम्मा तर विदेहीच आहेत आणि शिर्डीचे साईबाबा तसेंच गुलाबराव महाराज हे ज्ञानी आहेत. वरखेडचा अडकुजीही ज्ञानीच. मुन्हाचे झिंगाजी आणि नागपूरचे ताजुद्दीन भक्तीमार्गाचे पुरस्कर्ते आहेत.

## तरीच भेटे जगन्नाथ

या सर्व संतांचें आचरण भिन्न प्रकारचें असलें तरी ते कैवल्याचे अधिकारी आहेत. मार्ग कोणताही असो, त्याचें महत्त्व नाहीं. जो मुक्कामास जातो त्याचेंच कौतुक झालें पाहिजे.

**आम्हीं हीं भावंडें सारीं । येते झालों भूमीवरी ।**
**कैवल्याच्या मार्गावरी । भाविक आणून सोडावया ॥**
**जें ज्याला आवडेल । तिकडे तो जाईल ।**
**आणि मोक्षरूपी भोगील फल । त्या त्या पंथा आचरोनी ॥**
**ज्याची निष्ठा बसेल । वा, जो माझा असेल ।**
**त्याचेंच कार्य होईल । इतरांची ना जरूर मला ॥**
**ज्यासी अनुताप झाला । ब्रह्मज्ञान सांगणें त्याला ।**
**उगीच तर्कटी वाचटाला । स्फोट त्याचा करूं नये ॥**
**कोणी कांहीं म्हणोत । आपण असावें निवांत ।**
**तरीच भेटे जगन्नाथ । जगद्गुरु जगदात्मा ॥**

## परस्परांबद्दल बंधुभाव

संतांचा एकमेकांविषयीं भ्रातृभाव असतो. एकमेकांविषयीं बोलतांना ते आपला बंधु म्हणूनच उल्लेख करतात. संतांचे जे परम भक्त किंवा शिष्य असतात त्यांना याचा प्रत्यय वारंवार मिळालेला आहे. परन्हीं बहुतेक सर्व संत अबोलके, लौकिक दृष्ट्या भ्रमिष्ट व बालोन्मत् पिशाचवत् असे वागत असले तरी आपल्या बंधूचा शिष्य आपल्याकडे आल्यास त्याच्याशीं त्यांची प्रेमाची वागणूक असते. पुण्याच्या श्रीरामानंद बिडकर महाराजांचे श्रीयुत काशिनाथपंत गर्दे हे शिष्य होते. महाराजांचें यांना आश्वासन होतें कीं तुम्हीं सद्गुरु अनुग्रहीत असल्यामुळें सर्व साधू तुम्हांस ओळखतील आणि आमच्या बंधुत्वाची साक्ष पटवून देतील. किंबहुना तुम्हांस जे अशी ओळख देतील तेच स्वानुभवी संत होत अशी खूण बाळगावी. श्री. काशिनाथपंत हे अगोदर मुन्सफ होते; नंतर नागपूर येथें सबजज्ज झाले. बिडकर महाराजांचें त्यांच्यावर फार प्रेम. त्यांना नेहमीं फिरतीवर जावें लागत असे. फिरतीच्या काळांत त्यांना अनेक संतांच्या भेटीचा योग आणि लाभ मिळाला. संत भेटींत त्यांना जे अनुभव मिळाले ते समजून घेण्यासारखे आहेत.

## बाबांनीं स्वागत कसें केलें ?

शिरडीस श्रीसाईबाबांचें दर्शनासाठीं काशीनाथपंत गेले असतांना जणूं काय श्रीरामानंद बिडकर महाराजांचे परमशिष्य म्हणून कीं काय बाबांनीं 'या रामदास' असें म्हणून त्यांचें प्रेमानें स्वागत केलें व त्यांनीं भेटीदाखल नेलेल्या कलमी आंब्यांचा प्रेमपूर्वक स्वीकार केला.

शेगांवला श्रीगजानन महाराजांकडे ते गेले असतां समर्थांनीं त्यांना कोपरखळी मारून तारवाला वाट पहात आहे, असें सांगितलें. खामगांवीं मुक्कामावर जाऊन पहातात तों खरोखर पोस्टाचा शिपाई तार घेऊन उभा होता. तारेंत त्यांची मोर्शी येथें मुनसफीची नेमणूक झाल्याचा हुकूम होता. पुन्हां एकदां ते शेवगांवास दर्शनार्थ गेले असतां महाराजांनीं त्यांचा कोट व शर्ट घेऊन ते कपडे आपल्या अंगास नखशिखांत चोळून आपल्या रजःकणांनीं पवित्र करून त्यांच्या हवालीं केले.

एलिचपुरमधील परतवाड्याच्या श्री. शंकर भटजींच्या भेटीस जाऊन त्यांची चौकशी ते करीत असतांना प्रत्यक्ष महाराजच त्यांच्या पुढें उभे राहून त्यांचें स्वागत करून म्हणतात, 'या आलांत, बरें झालें. वाटच पहात होतों. तार आली म्हणून येणें भाग पडलें.' पुढें घरीं त्यांनीं काशीनाथांना आपल्या मांडीवर बसवून त्यांचें चुंबन घेतलें व 'महत् भाग्य महत् भाग्य! तुम्ही थोरामोठ्यांचीं मुलें आहांत, असें म्हणून त्यांचा गौरव केला.

तसेंच श्री. काशीनाथपंत जालन्याचे देव शिरस्तेदार, ग्वाल्हेरीचे साहिबा आणि भुसावळच्या खालम्मा यांच्या दर्शनार्थ गेले असतांना त्यांनीं त्यांचे असेंच प्रेमपूर्वक स्वागत करून आदरपूर्वक गौरव केलेला आहे.

## संतांचें बोलणें सूचक

संतांचें बोलणें समजावयास कठीण असतें. ते नेहमीं सूचक बोलत असतात. तें उमजत नाहीं, पुढें विचार करून त्यांतलें वर्म कळतें. यासाठीं सद्गुरु अनुग्रह आणि अध्यात्माची बरीच वरची पातळी गांठणें आवश्यक असतें. केव्हां केव्हां या अज्ञानामुळें संतकृपेचा तोंडीं आलेला घांस दुरावतो. म्हणून मी म्हणतों कीं, सर्व संत थोरच आहेत. त्यांच्यांत कमी अधिक असें कांहींच नाहीं. म्हणून आपण त्यांची अनन्यभावानें सेवा करून सर्वस्वीं त्यांना शरण गेलें पाहिजे. आतां सर्व संतांना माझे शतशः प्रणाम असून त्यांच्या चरणापाशीं माझी नम्र प्रार्थना आहे—

'आतां न बहु बोलतां तव पदांबुजा वंदितों।  
पडो विसर ना कदा मदिय हेंच मी मागतों।  
तुम्हीं वरद आपुला कर धरा या गणूच्या शिरा।  
करी पदनता वरी बहु दया न रोषा धरा॥'

———

श्रीसाईबाबांची लीला—

# एक ताजा अनुभव

श्री साईबाबांचे एक भक्त श्री. नित्यानंद पाल (बानलेस वाडी, मिरज) हे आपणास आलेल्या अनुभवासंबंधानें लिहितात कीं, गेल्या मे महिन्यांत माझे एक शेजारी शिरडीस जाण्यासाठीं निघाले तेव्हां पुण्यास माझें कांहीं काम असल्यामुळें मीही त्यांच्या बरोबर निघालों. पुण्याहून मला वानोरीस जावयाचें होतें. परंतु आमची गाडी इंजिनांत कांहीं बिघाड झाल्यामुळें दोन तास उशिरां पोहोंचली. त्यावेळीं स्टेशनवर टांगा किंवा दुसरें कांहींच वाहन नव्हतें.

## बाबाकडे मन ओढ घेऊं लागलें

त्या दरम्यान साईबाबासंबंधीं विचार माझ्या मनांत घोळूं लागले होते. या संधीचा फायदा घेऊन आपल्या शेजाऱ्याबरोबर तूंही बाबांच्या दर्शनासाठीं शिरडीस जात नाहींस ? असाही विचार मनांत येऊन गेला. इतक्यांत माझे शेजारी मला आपल्या एका खिस्ती मित्राकडे घेऊन गेले. तेथें त्यांच्या साईबाबांच्या लीलेसंबंधीं गोष्टी सुरू झाल्या. व त्या मीही ऐकल्या. माझ्या मनावर परिणाम झाला. व मी माझ्या शेजाऱ्यास म्हणालों, 'तुम्हीं शिरडीस जात आहांत. मलाही यावेसें वाटतें ? येऊं का ?'

हा प्रश्न ऐकून माझा शेजारी आश्चर्यचकित झाला. कारण मी कधीं देवळांत जात नाहीं किंवा कोणत्याही देवाला भजत नाहीं, हें त्याला माहीत होतें. तो हंसत म्हणाला, 'येईनास बापडा ! आमचें काय बिघडलें त्यांत ? तेवढी सोबत होईल आम्हांला !

## आजारानें उचल खाल्ली

नंतर आम्हीं पुण्याहून धोंड, कोपरगांव मार्गें शिरडीस गेलों. तेथें तीन दिवस रहाण्याचा आमचा विचार होता. परंतु तेथें गेल्यानंतर माझा दमा चाळवला. गेलीं सात वर्षे मी दम्यानें आजारी आहे. हवेंत फेरबदल झाला होता. दम्याबरोबर मला सर्दी व खोकलाही झाला. नंतर मला श्वासही सोडणें कठीण होऊं लागलें. याशिवाय गेलीं पंधरा वर्षे टी. बी. नेंही मला पछाडलें आहे. अशा परिस्थितींत माझ्या सोबत्यास माझ्याबद्दल चिंता वाटूं लागली !

२-३ दिवसांनीं मला थोडा आराम वाटूं लागल्याचें पाहून माझ्या शेजाऱ्यानें जाण्याची तयारी करून व मला सांगून तिकिटेंही काढून आणिलीं. परंतु ऐन निघण्याच्या वेळीं माझे पाय कांहीं हालेनात. माझ्या मनांतून शिरडींत श्रीसाईबाबांच्या सान्निध्यांत कांहीं दिवस रहावयाचें होतें. बरोबरची मंडळी निघून गेलीं. आणि १०४ नंबरच्या खोलींत मी एकटाच राहूं लागलों.

**बाबांची प्रार्थना**

माझे सोबती गेल्यानंतर माझ्या दम्याचा जोर वाढला. खोकलाही वाढला व थुंकींतून रक्त पडूं लागलें! मी तेथील पहारेकरी शिपायास हांक मारून माझी स्थिति त्याला निवेदन केली. त्यानें तेथील साईबाबा डिस्पेन्सरीचे डॉक्टर सुभास दामोदर गुजराथी यांस भेटून सर्व प्रकार सांगितला. तो दवाखाना शिरडी संस्थानतर्फे चालविण्यांत येत असतो. त्या डॉक्टरांनी मला दोन इंजेक्शनें देऊन नियमित घेण्यासाठीं कांहीं गोळ्याही दिल्या. त्यामुळें रक्त पडणें बंद झालें.

दुसऱ्या दिवशीं मला थोडें बरें वाटूं लागतांच मी श्रीसाई मंदिरांत जाऊन बाबा-पुढें बसून त्यांची मनोभावें प्रार्थना केली. मी अगदीं दगदगून गेलों होतों. वर्षच्या वर्षं आजारामुळें मी असून नसून सारखा होतों. ना जिण्यांत ना मरण्यांत! काय करावयाचें आहे असलें निर्जीव जीवन! प्रार्थना करीत असतां माझा कंठ भरून आला होता. माझें सारें दुःख यावेळीं मी बाबांच्या पुढें ठेविलें. माझ्या डोळ्यांवाटे अश्रूप्रवाह चालू होता. शेवटीं मी म्हणालों, बाबा! हें जीवन आतां मला नकोसें झालें आहे, येथेंच तुमच्या चरणापाशीं माझें जीवन संपवूं द्या. किंवा मला जिवंत ठेवावयाचेंच असलें तर मला या दुर्धर रोगांतून तरी मुक्त करा! आतां माझ्यानें सहन करवत नाहीं!

**एका वृद्ध गृहस्थाची भेट**

अशा रीतीनें तेथें किती वेळ गेला त्याचेंही मला भान राहिलें नाहीं. शेवटीं मन हलकें करून मी माझ्या निवासस्थानीं येऊन पडलों. दुसऱ्या दिवशीं मी कण्हत कुंथत असतां कोणी एक वृद्ध गृहस्थ माझ्याजवळ येऊन माझी प्रेमानें चौकशी करूं लागला. त्याला मी सर्व हकीगत सांगितली. तेव्हां तो म्हणाला, 'कांहीं घाबरूं नकोस; तुला चांगला आराम वाटेल; परंतु मी सांगेन तें खाल्लें पिलें पाहिजे. तें घाणेरडें असलें तरी तूं त्याचा कंटाळा करतां कामा नये.'

मी म्हणालों, 'काय वाटेल तें खायला किंवा प्यायला सांगा. माझी हरकत नाहीं मात्र मी निरोगी होईन असें खात्रीपूर्वक आश्वासन तुम्हीं मला द्यावें.'

तो वृद्ध म्हणाला, 'खात्री देतों. त्याबाबतींत अगदीं निश्चिंत रहा.'

'पण मला टी. बीही आहे!'

'त्याही रोगांतून तुमची मुक्तता होईल!' त्या वृद्धानें आश्वासन दिलें. 'मग ठीक आहे. सांगा आतां मला, मी काय खावें व काय प्यावें तें. तयारी आहे माझी!'

**रोगमुक्तीबद्दल आश्वासन**

यावर तो वृद्ध म्हणाला, 'बरें आहे. मी औषध देत आहे. तें घेतल्यानंतर तुम्हीं बेचैन व्हाल. वांत्यावर वांत्या होतील. व एकसारखे ढाळही होतील. घाबरूं नका. त्यामुळें तुमच्या शरिरांतील दोन्हीं रोगांचीं पाळें मुळें नाहीशीं होतील.'

त्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून त्यांनीं दिलेले औषध मी श्रद्धेनें घेऊं लागलों. त्या औषधासाठीं खर्च बिर्च कांहीं आला नाहीं. सतत वीस दिवस तें औषध मी घेतलें.

त्या वृद्धानें सांगितल्याप्रमाणें मला खूप वांत्या झाल्या. एकसारखें शौचासही झालें. कफही बराच पडून गेला. हें सर्व सात दिवसपर्यंत झालें. तीन आठवड्यांनंतर मला खरोखर आराम वाटूं लागला. आतां दीड दोन महिने होत आले. माझ्यांत आतां चांगलाच पालट घडून आला असून मी आरोग्यसंपन्न झालों आहे. मी श्वासोच्छवास उत्तमप्रकारें घेऊं शकतों. थंड पाण्यानें आंघोळ करतों. पूर्वी आठवड्यांतून एकदांच गरम पाण्यानें स्नान् करीत असें. मला भूक चांगली लागते व खाल्लेले अन्न पचन होतें. वजन वाढत चाललें आहे. आणखी काय पाहिजे?

## ते वृद्ध गृहस्थ कोण होते?

माझ्याकडे आलेले ते वृद्ध गृहस्थ कोण बरें होते? तें बाबांच्या कृपेचें फळ होतें. याबद्दल माझ्या मनांत तिळमात्रही संशय नाहीं. बाबांच्या चरणीं माझी प्रार्थना रुजू झाली व त्यानीं माझ्यावर कृपेची पाखर घातली.

मी ता. १९ मेपर्यंत शिरडीक्षेत्रांत होतों. निघतेवेळीं माझ्याजवळ पैसे नव्हते. संस्थान कचेरींतून १५ रु. उसने घेऊन व बाबांचा प्रेमळ निरोप घेऊन मी निघालों. घरीं पोहोंचल्यानंतर एक आठवड्यानें संस्थान कचेरीकडे मनिऑर्डरीनें घेतलेले पैसे पाठविले.

पूज्य श्रीसाईबाबांच्या कृपेसंबंधीं मला आलेला अनुभव थोडक्यांत लिहून पाठविला आहे.

× × ×

## बाबांनीं संकटमुक्त केलें—

सौ. कांचनमाला क. देसाई 'प्रेस्टन' पांचगणी, सातारा, या आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात—

मी एक साईभक्त आहें. भक्तासाठीं श्रीसाईबाबा कसें धांवून येतात, याचा प्रत्यय मला नुकताच आला आहे. तो माझा अनुभव साई लीलेच्या वाचकांसाठीं व साईभक्तांसाठीं मी लिहीत आहे. मी कोल्हापूरहून पांचगणीला येण्यासाठीं गुरुवार दि. २९ जून १९६१ ला दुपारच्या १॥ च्या कोल्हापूर-महाबळेश्वर गाडीनें निघालें होतें. गाडींत बसण्यापूर्वीच कंडक्टरनें सांगितलें कीं गाडी महाबळेश्वरला जाणार नाहीं. फक्त वाईपर्यंतच जाईल. हें ऐकल्यावर माझा धीर खचला. सकाळीं मी निघण्यापूर्वी रविवारांतल्या साईमंदीरांत व श्रीदत्त मंदीरांत जाऊन आलें होतें. प्रवासांत माझा श्रीबाबांच्यावर पूर्ण विश्वास होता. मी ज्यावेळीं साताऱ्याला आलें त्यावेळीं सातारा–महाबळेश्वर गाडी निघून गेली होती. मग माझ्याच गाडीनें वाईपर्यंत येण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता म्हणून त्याच गाडीनें वाईला आलें. वाईत मी ७–३० वाजतां पोचलें. मला वर जाण्यासाठीं गाडी नव्हती. मला वाईला समजलें कीं पांचगणीच्या घाटांत मोठमोठे दगड कोसळून पडले आहेत व रस्ता बंद आहे. फक्त जिथें दगड पडले आहेत तिथून वहातूक चालू आहे. डायरेक्ट गाडी जाऊं शकत नाहीं.

हें ऐकतांच माझा धीर खचला. काय करावें हेंच समजेना ! तशांत मी एकटी ! वाईमध्यें कोणाचीहि ओळख नाहीं. रहावयाचें म्हटलें तर रहाणार कोणाकडे ! पण भक्ताचे पाठीराखे श्रीसाईबाबा !

माझी ही केविलवाणी स्थिति पाहून तिथलाच एक म्हातारा गृहस्थ विचारपूस करीत पुढें आला. माझी हकीगत ऐकून त्यानें मला धीर दिला. नंतर जवळच उभा असलेल्या तरुण माणसाबरोबर विचार विनीमय करून तो माझ्या जवळ आला व म्हणाला, रस्ता ठीक नसल्यामुळें टॅक्सी थेट पर्यंत जाणार नाहीं. मी टॅक्सी ठरवतो व त्या टॅक्सीनें कोसळलेल्या घाटापर्यंत जा व नुक्तीच गेलेली एस. टी. जर मिळाली तर पकडा. जर ती चुकली तर परत या. ' माझ्याकडे रहाण्यास संकोच करूं नका. मला सून, मुलगा, नातवंडे आहेत. अशा रितीनें त्या तरुण माणसाला ( तो त्याचा मुलगा असावा ) माझ्याबरोबर देऊन टॅक्सींत बसविलें. आम्ही कोसळलेल्या घाटापर्यंत आलों, माझ्या सुदैवानें एक टॅक्सी घाटांत दिसली. मधलें अंतर जवळ जवळ पाऊण मैल होतें. पाऊण मैल चालावें लागणार होतें. माझ्या बरोबरच्या त्या माणसानें माझें सामान घेतलें व पाऊण मैल वाहून आणलें. मला पांचगणीच्या टॅक्सीवाल्यानें ओळखलें. तरी पण त्या माणसानें इकडच्या टॅक्सीवाल्याला नीट बजावून सांगितलें कीं, ह्या बाईना नीट पोंचव. मी त्या माणसाचे उपकार झाले म्हणून कांहीं पैसे देऊं लागले तर तो ते घेईना. उलट म्हणाला, ' मी तुम्हांला मदत करून माझें कर्तव्य केलें. मला बायको मुलें आहेत. मी संसारी मनुष्य आहे व परमेश्वराच्या कृपेनें माझें चांगलें आहे.'

किती थोर हृदय त्यांचें ! मी रात्रीं ८–३० वाजतां सुखरूप घरीं आलें. मी हा माझा प्रवास कधींच विसरणार नाहीं. मला श्री बाबांनीं त्या म्हाताऱ्याच्या व तरुणाच्या रुपानीं सहाय्य केलें यावर माझा विश्वास आहे. नाहीं तर ह्या कलीयुगांत अशीं माणसें सांपडणें अशक्य नाहीं काय ?

---


लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद



लें० : एक साईभक्त

अध्याय १० वा

श्रीगणेशास, सरस्वतीस, गुरूस, सीतारामचंद्रास, कुलदैवतास आणि सद्गुरु साईनाथांस नमस्कार.

जो नेहमीं लोकहितांत मग्न असून ब्रह्मस्वरूपांत स्थित असतो त्याचें प्रेमपूर्वक अंतःकरणानें स्मरण करावें. त्याच्या स्मरणानें जन्ममरणाचें कोडें सुटतें. एकहि पैचा खर्च न होतां करण्यासारखें हेंच साधन आहे. अल्प सायास करून अनायासें उत्तम फळ मिळतें. करितां सर्व इंद्रियें समर्थ आहेत तोंपर्यंत हें साधून घेण्याची धडपड करावी. गुरु हाच एक शाश्वत देव असून त्याच्यावर दृढ विश्वास ठेवल्यास तो 'रेखेवर रेख मारी' सद्गुरु सेवा उत्तम रीतीनें केल्यास संसार दुःखें नाहींशीं होण्यास न्यायमीमांसादींची घटपट खटपट करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. सद्गुरु नावाडी होतांच भाविक भक्त अधिभूत, अध्यात्मिक आणि आधिदैविक दुःखांनीं भरलेला हा भवसागर तरून जातात. महासागर पार होण्यासाठीं नावाड्यावर विश्वास ठेवावा लागतो. त्याचप्रमाणें हा भवसागर तरून आपल्या गुरुवर विश्वासून राहावें. भक्तांची भावभक्ति पाहून सद्गुरु त्यांना चुटकीसरखें ज्ञान संपन्न करतात. इतकेंच काय पण सहजलीलेनें तो 'आनंद लक्षण' मोक्षप्राप्ति त्यांना करून देतो. त्याच्या दर्शनानें हृदयग्रंथी तुटून सर्व विषयनिवृत्ति होते व संचित-क्रियामाणाचा नाश होतो. करितां श्रोतेहो आपण सद्गुरुचरित गायन करूं या.

अष्टमाध्यायांत 'नरजन्माचें' प्रयोजन कथिलें. नवव्यांत आपण भिक्षावृत्तीचें गहन गुजवर्णन ऐकलेंत. बायजाबाईची भाजीभाकर, खुशालचंदांचा समाचार आणि म्हाळसापती तात्यांचा शयनप्रकार यांची कथा ऐकून आपणास आनंद वाटला.

आतां श्रोते हो, बाबा कसे राहत, कोठें निजत, कसे वावरत आणि फिरत त्यांची लौकिक आयुर्मर्यादा केवढी, हिंदु-मुसलमानाचे ते कसे मायमाउली होते, वाघ, बकऱ्यांचाही त्यांच्या ठायीं विश्वास असून तीं निःसंशय प्रेमानें कशीं विहरत असत, याविषयीं ऐकण्यासाठीं एकचित्त व्हा. पोटापाण्याची कहाणी झाली, आतां पुढील चरित्र पाहूं या.

एक चार हात लांबीची आणि वितभर रुंदीची फळी दोन्हीं टोंकास चिंध्यांनीं झोपाळ्यासारखी त्यांनीं आढ्यास बांधली होती. उशापायथ्याला जळत्या पणत्या ठेवून

बाबा ह्या फळीवर झोंपत असत. या एवढ्याश्या लहान फळीवर ते केव्हां चढत आणि उतरत हें कोणाला केव्हांच दिसलें नाहीं. मान वाकवून ते चांगले या फळीवर बसत आणि निजत. चिंध्यांनीं बांधलेली ही फळी त्यांचें वजन कसें सांभाळीत असे हेंच एक आश्चर्य ! बाबांना महासिद्धी वश होत्या ना ? फळी फक्त नांवाला. अतिसूक्ष्म मातीचा कण डोळ्यांत गेला असता तो जसा लपून राहतो पण सारखा खूपत असतो, तसेंच कीडा मुंगी, माशी या रूपानें संचार करणें बाबांच्या हातचा मळ होता. सर्व सिद्धी घरीं पाणी भरत असतांना माशीसारखें लहान रूप क्षणांत घेऊन आकाशांत अधांतरीं बसण्यास त्यांना किती अवकाश ! मग फळीची ती काय मात ? अष्टसिद्धी त्यांच्या सेवेला नेहमींच हजर असत. फळी मात्र निमित्ताला. कीड मुंगी पशुपक्षी इत्यादि प्राण्यापासून माणसांत राजापासून रंकापर्यंत सर्वांकडे ते समसमान दृष्टीनें पहात. शिरडीमध्यें वास्तव्य करीत असले तरी ह्या साडेतीन हाताच्या पुण्यराशी मिराशीचा सर्वांच्या हृदयांत वास असे. बाबांची राहणी पहा. अंतरीं उदास, निःसंग असले तरी बाह्यतः त्यांना लोकसंग्रहांची आस असावी असें त्यांच्याकडे पहाणाराला वाटे. त्यांचें अंतरंग शोधून पाहिलें तर ते परम निराश सर्व पाशनिवृत्त, निष्काम, शांत व स्वानंदांत नेहमींच दंग असत. परंतु वरून त्यांच्याकडे पाहणाराला वाटे कीं ते भक्तांनी वेढलेले असून भक्तार्थ सकाम आणि संतत व पिशाश्च वृत्तीचे असावेत; इतकेंच काय पण मायेंत गुरफटलेले ते भासत. कधीं त्यांनीं कोणाकडे प्रेमाने पाहून त्याला आनंदानें कवटाळावें तर केव्हां त्यांच्यावर शिव्याशापांचा भडीमार करून धोंडे घेऊन त्याच्या अंगावर धांवावें. बाबांची मूर्ति कशी दिसे ? तर शांत; यांत वैराग्य आणि क्षमाशील; सर्वांचें हित चिंतींत असलेले; नेहमींच आत्मास्थितींत आणि स्वानंदांत निमग्न असलेले. भक्तांना ते प्रसन्नचित्त आढळून येत. एकाच आसनीं नेहमीं स्थित असून कोठें जाणें येणें नाहीं. हातांतील सटका हाच जणूं काय त्यांचा दंड. पोटा-पाण्याच्या व्यवस्थेंतहि ते केव्हां पडत नसत. कीर्तिची आणि पैशाची चाड नाहीं. पांच घरीं भिक्षा मागून देह रक्षण करावें अशा तऱ्हेची या योगीराजाची कालक्रमणा असे. वेष प्रत्यक्ष संन्याशाचा. सटका हाच त्यांचा दंड. मुखीं 'अल्ला-मालिक'चा जप आणि भक्तांवर अखंड प्रीति अशी ही साईची सगुण मूर्ति. पूर्वपुण्यार्जित संपत्ती मानवरूपांत अवचित आपणांस ती लाभली आहे. त्यांना मनुष्य म्हणून जे मानतात ते मंदमति आणि मंदभाग्य असून त्यांच्या देहाचीं गति विचित्र असल्यामुळें त्यांना ते कसे प्राप्त होणार ! साई आत्मज्ञानाची मूर्तिमंत खाण असून करुणापूर्ण असल्यामुळें त्यांची कास धरून हा दुस्तर भवसागर आपण तरून जाऊं या. हें अनंत आणि अखिल चराचर ब्रह्मांड म्हणजेच मूर्तिमंत बाबाच आहेत.

कलीयुगाची कालखंडणा चार लक्ष बत्तीस वर्षांची असून त्याची स्थूलमानानें पांच हजार वर्षे पुरीं होतांच बाबांचा अवतार झाला. श्रोतेहो, कदाचित् तुम्हीं शंका घ्याल कीं. बाबांची जन्मातिथि अवगत नसतांना हें कोणत्या आधारानें निश्चित केले

आहे. तेव्हां ऐका. कांहीं एक कृतसंकल्पानें त्यांनीं शिरडीक्षेत्र निवासी संन्यस्त वृत्तीनें साठ वर्षे कंठिलीं सोळा वर्षांचें असतांना बाबा प्रथम शिरडींत आले. तीन वर्षे राहून तेथून जे निसटले ते दूर निजामशाहींत सांपडले. मग एका वऱ्हाडाबरोबर परत शिरडीस ते कायमचे राहण्यास आले. वयाच्या विसाव्या वर्षापासून पुढें सतत साठ वर्षे त्याचें शिरडींत वास्तव्य होतें हें आपणा सर्वांस श्रुत आहेच. शके अठराशें चाळीस आश्विन शुद्ध दशमीस विजया-दशमीचे मुहूर्तावर बाबांनीं आपलें अवतार कार्य संपविलें. तेव्हां त्यांची आयुमर्यादा ऐशीं वर्षांची धरल्यास त्यांचा जन्मकाल शके सतराशें साठ मानण्यास कोणतीच हरकत नसावी. काळाच्या माथ्यावर पाय देणाऱ्या महात्म्यांचें आयुष्यमान कधीं निश्चित करतां येईल कां? फारच अवघड कार्य आहे हें! सूर्यास उदय आणि अस्त हीं दोन्ही सारखींच असून नभीं तो स्वस्थ अचल असा असतो तद्वतच सर्व थोर महात्मे जन्म आणि मरणविरहित आपल्या स्थानीं स्थित असतात.

शके सोळाशें तीन सालीं श्रीसमर्थ रामदास स्वामींनीं समाधि घेतली. या घटनेला दोनशें वर्षे होतांत न होतात तोंच ही साईमूर्ती अवतरली. हिंदु राजे पादाक्रांत होऊन सर्वंत्र भारतांत यवनांचा सुळसुळाट झाला होता. भक्तिमार्गाचा ऱ्हास होऊन लोक धर्मच्युत बनूं पाहत होते. अशावेळी रामदास निर्माण झाले व त्यांनीं श्रीशिवरायांना हातीं धरून मुसलमानांपासून राज्याचें रक्षण आणि गोब्राह्मणांचें संरक्षण केलें. दोनशें वर्षांनंतर पूर्वींची घडी पुन्हां विघडली. हिंदु मुसलमानांमध्यें दुही पडली पण ती बाबांनीं तोडली. राम आणि रहीम हे एकच असतां त्यांच्या भक्तांमध्यें असा फरक का असावा व लोकांनीं अशा तुटकपणानें कां वागावें. तुम्हीं काय मूढमति आहांत कां? हिंदु-अर्वि-धांची एकीं होऊंद्या. दृढ सुविचाराच्या तारूवर आरूढ व्हाल तरच पैलतीर गांठाल? वादावादी आणि कुणाची बरोबरी करणें हे बरें नाहीं. स्वतःचें हित कशांत आहे याच्या सारासार विचार केल्यास तरच श्रीहरी तुमचें रक्षण करील. योगयाग, तप, ज्ञान हीं हरिप्राप्तीचीं साधनें आहेत. जो हरिविहीन आहे त्याचें आयुष्य व्यर्थ होय. कोणी कितीही अपकार केल्यास त्याचा प्रतिकार न करतां त्याच्यावर करवेल तेवढा उपकार करावा हेंच बाबांच्या उपदेशाचें सार असे. स्वार्थास तसाच परमार्थास तसेंच उच्चनीच शुद्रासही हा धोपटमार्गी उपदेश हितावह आहे. स्वप्नीं भोगलेलें राज्यवैभव जागेपणीं जसें अंतर्धान पावतें तसाच हा संसार क्षणभंगुर आहे. ही त्यांची नेहमीं भावना असे. देहादि सुखदुःखांचा फोलपणा हेंच त्यांचें प्रपंच तत्त्व असून निजानु-संधानें हें स्वप्नभ्रमत्व मोडून त्यांनीं मुक्ति साधली होती. शिष्याची बद्धता पाहून त्यांचें मन कळवळून येत असे आणि तो देहातीत केव्हां होईल याचीच त्यांना अहर्निश चिंता असे. अहंब्रह्माकार आणि अखंड आनंदवृत्ति तसेंच चित्तस्थिति असल्यास वैराग्य प्राप्त होऊन मोक्षाचा लाभ होतो. हातीं टाळविणा घेऊन दारोदार भटकणें व आल्यागेल्या समोर केविलवाणें हात पसरणें बाबांना कधींच ठाऊक नव्हतें.

असे अनेक गुरु असतात कीं ते वित्त देऊन बळेंच कानमंत्र देऊन धरून धरून शिष्य करतात. शिष्यांना धर्माचें शिक्षण देऊन आपण मात्र याच्या उलट आचरण करायचें. मग हा भवसागर ते कसा बरें तरून जातील आणि ते जन्ममरणाचा फेरा चुकवूं शकतील ? आपल्या धार्मिकत्वाची ख्याती व्हावी असें बाबांना क्षणभरसुद्धां केव्हां वाटलें नाहीं. त्यांच्या अंगीं जरासुद्धां देहाभिमान नव्हता व सदैव शिष्यांच्या ठायीं त्यांची अखंड प्रीति असे. आतां 'नियत' आणि 'अनियत' असें दोन प्रकारचे गुरु असतात. त्यांचे प्रत्येकाचें काय कार्य असतें तें पाहूंया. शिष्याच्या अंतःकरणातला मळ नाहींसा करून त्याची दैवी संपत्ति परिपक्व करणें व त्याला मोक्षाच्या मार्गाला लावणें एवढेंच अनियत गुरुचें कार्य असतें. नियत गुरुशीं गांठ पडली असतां शिष्याच्या मनांतलें द्वैत निवडून ऐक्य निर्माण होते व 'तत्त्वमसि' महावाक्याचा त्याला साक्षात्कार होतो. चराचरीं सर्वत्र गुरूच भरले असून भक्त काजाकरतां ते साकार होऊन अवतरतात आणि कार्यभाग उरकल्यानंतर आपला अवतार विसर्जन करतात. श्रीसाई ह्याच दुसऱ्या कोटींतील गुरु होते. त्यांचें चरित्र मी कसें वर्णन करूं ! आतां ते बुद्धि देतील तसेंच हे लेखन होईल.



## ग्वाल्हेरच्या महाराजांचें निधन

आम्हांस लिहिण्यास अत्यंत दुःख होत आहे कीं, हिज हायनेस सर जिवाजीराव शिंदे नरेश ग्वाल्हेर यांना मुंबईस त्यांचें निवासस्थानांत दिनांक १६ जुलै १९६१ रोजीं देवाज्ञा झाली. महाराजांचे वय कांहीं फार नव्हते. अवघें पंचेचाळीस होतें. या आपत्तीमुळें महाराणीसाहेब व त्यांचे कुटुंबीजन यांचेवर मोठाच दुःखाचा प्रसंग कोसळला आहे आम्ही त्यांचे दुःखांत समभागी आहोंत. महाराज दिलदार तसेच दानशूर होते. त्यांची श्रीसाईबाबांवर निस्सीम भक्ती होती. ते शिर्डी संस्थानचे आश्रयदाते असून दरसाल शिरडीस वर्षांतून निदान एक वेळ तरी जातीनें येऊन थाटानें बाबांची पूजा, अर्चा, अभिषेक, सत्यनारायण, अन्नदान वगैरे यथासांग करीत व गरिबांचा परामर्ष घेत. त्याचप्रमाणें श्रीमन्मातुश्री महाराणीसाहेब याही जातीनें येऊन बाबांची सेवा करीत. महाराज नुकतेच शिर्डीस येऊन गेले होते व आपणांस बाबांची जास्त सेवा घडावी म्हणून संस्थानमार्फत लहानसें निवासस्थान बांधण्याची योजना आंखली होती व त्यासाठीं बरीच रक्कम संस्थानला देण्याचें अभिवचनहि महाराजांनीं दिलें होतें. श्रीसाईनाथ त्यांचें आत्म्यास चिरंतन शांति देवोत.

# सद्‌गुरु स्मरणाचें सामर्थ्य

—श्री निसर्गदत्त महाराज

**श्री समर्थ भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्या सांप्रदायांतील विद्यमान संत श्री सद्‌गुरु निसर्गदत्त महाराज हे आपल्या भक्तांच्या कल्याणासाठीं व मार्गदर्शनासाठीं अध्यात्मावर वेळोवेळीं जीं प्रवचनें देतात, त्यांपैकीं कांहीं प्रवचनांचा 'ईश्वर ज्ञान स्वरूप आणि सत् स्वरूपज्ञान' या नावानें नुकताच एक संग्रह प्रसिद्ध झाला असून त्यांतीं सद्‌गुरूचें महात्म्य कथन करणारें व गुरुपौर्णिमेदिवशीं (११-४-५७) दिलेलें प्रवचन आमच्या वाचकांसाठीं येथ साभार उधृत करण्यांत येत आहे.**

**आतां सद्‌गुरु वर्णवेना। जेथें माया स्पर्शों शकेना।**
**तें स्वरुप मज अज्ञाना। काय कळे॥**

दा. द. १ स. ४

आजचा दिवस सद्‌गुरु पूजेचा आहे. ग्रंथांतरी आजच्या दिवसाला व्यासपूजा म्हणतात. व्यासांना वेदव्यास म्हणतात. व्यास या शद्बाचा अर्थ परिघ असा आहे. त्याची जेवढी लांबी तेवढी रुंदी. जेवढी सखोल तेवढी उंची असा हा सखोल गोलरुपानें असलेला व गोल रूपानें दिसणारा त्या गोलामध्यें जो अनुहत शद्ब करतो तो वेदव्यास आहे. वेद्य, वेदना व वेदन हा प्रत्यय आत्मसंवेदना आहे. आत्मसंवेदना नसते तेव्हां वेद्य पण म्हणतां येत नाहीं व अवेद्य पण म्हणतां येत नाहीं असें त्या स्वयंवेद्याचा स्वयंवेद्य आत्मरूपानें दिसावें, असा ज्याचा हा स्वानुभव, ज्याचा स्वरूपप्रकाश त्याला स्वसंवेद्य म्हणतात.

## सद्‌गुरूचें स्मरण

विश्व फार पसरलें आहे. सभोंवार अग्नीचा घेर, असें पांच प्रकारानें ओळखले जाणारे पंचभूत, हें पंचभूत एवढें विशाल असूनसुद्धां जो अणुप्रमाण आहे तो सद्‌गुरु आहे. त्याच्या स्वसंवेद्यामध्यें विशाल खगोल दिसतो. तो खगोल व त्या खगोलांत वस्ती त्याचीच असते. तो उगाच असतो. प्रत्येक प्राणिमात्राची वाणी, व त्यामुळें वापरला जाणारा शब्द आणि त्यामुळें होणारा व्यवहार, याचें जर कोणाला माप काढतां येत नाहीं तर त्याचें माप कसें काढणार? स्वतःचा वाणी, समुदाय, त्यांतील अर्थसमुदाय जसा कोणाचा कोणालाही कळत नाहीं. असें असून हा व्यवहार समुदाय, प्रपंच समुदाय अदृश्यपणें आहे. पण तो बोध असल्याशिवाय कांहींही कळत नाहीं. तसाच हा व्यास अणुप्रमाण आहे. आकाशाचा कण जर आण म्हटलें तर कसें शक्य

होईल ? वायुचा कण उचलणें किती शक्य आहे तें पहा. हें आकाश त्याच्याजवळ कणासारखें आहे. असा जिथें तिथें स्वरुपाचा चमत्कार आहे. हा चमत्कार जोंपर्यंत ओळखीचा झाला नाहीं, तोपर्यंत महाघातक आहे. आणि तो ओळखीचा झाला तर हें जग सच्चिदानंदरूप आहे; असें दिसतें. या सद्‌गुरूच्या स्मरणानें आपल्या मानलेल्या स्वरुपाचें विस्मरण, दहन होतें; व आत्मस्मरण प्रगट होतें. एवढें सामर्थ्य सद्‌गुरु स्मरणांत आहे. एकूण प्राणिमात्रांचा आतपणा प्रत्येकाच्या स्मरणामुळें जखडला आहे. आणि तो स्मरणांमुळें जखडला आहे. तसेंच हें स्मरण योग्य दृष्टीनें स्वरुपज्ञानानें स्मरण देत नाहीं, तर महाघातक आहे; मग ते कोठलेंहि स्मरण असो, अथवा भाऊबहिणीचें स्मरण असो.

सद्‌गुरु स्मरण केल्यानें आत्मस्वरूप प्रगट होतें. आत्मस्वरूप प्रगट झाल्यानें चोखळलेलें स्वरुपज्ञान प्राप्त होतें. व तें झाल्यानें सर्व आनंदानें भरलेलें दिसतें. हें जग म्हणजे काय ? हें जेव्हां कळलें तेव्हां हें जग आनंदाप्रीत्यर्थ आहे; दुःखाकरितां नाहीं. उदा. :—आनंदाप्रीत्यर्थ दारू सामान उडवितात, कुशल कारागिरानें दारू सामान असें बनविलें आहे, कीं जग आहे त्यापेक्षां तें कमी पण तें जळत असतां त्याला सुखच होतें, दुःख होत नाहीं. हें बघण्वचें भाग्य गरिबाला नाहीं, श्रेष्ठीला आहे, श्रीमंताला आहे. भाग्यवंताला सद्‌गुरुस्मरण घडतें, अभाग्याला घडत नाहीं.

### आठवणें व विसरणें

“ सोहं आत्मा स्वानंदघन,” आत्मस्वरूप प्रत्यकाचें स्वतःच्या चिरायु आनंदानें भरलेलें आहे. असें असतांना स्वरूपाचें विस्मरण होऊन, स्मरण आहे स्वरूपाचें विस्मरण सद्‌गुरु भक्तीनें वेगळें होतें. जें स्मरण आज आहे, तें बाजूला होऊन आत्मस्वरूपाचें स्मरण होतें.

आठवोनि विसरीजे, विसरोनि आठविजे परब्रह्म तें. विसरलें. तें आठवलें, आठवलें तें विसरलें हें आत्मस्वरूपाचें अज्ञान आहे. सत्य कसें आहे ? तें विसरलें जात नाहीं. स्वरूप कसें आहे ? तें स्वानंदघन आहे. त्याचा विसर वस्तुतः नाहीं. कारण ज्याचा विसर पडला ती माया आहे सद्‌गुरुस्वरूपाचा केव्हांही विसर व आठव होत नाहीं. ज्याचा आठव होतो त्याचा विसर होणार.

प्रत्येकाला आज जें स्मरण आहे, त्या स्मरणानें प्रत्येकजण जखडलेला आहे. परंतु हें स्मरण जाणिवेंत ठगरूपी आहे. विस्मरण न घडे म्हणून स्मरणही न घडे. असें जें सद्‌गुरुस्वरूप त्या सद्‌गुरुस्वरूपाचें ध्यान करणें. त्यानें सांगितलेला बोध, त्या योगें स्वरूपाचें स्मरण होतें. त्या स्वरूपस्मरण विस्मरण रहित असलेल्या सद्‌गुरूच्या पूजेचा आजचा दिवस आहे; त्यांचें वर्णन करतां येत नाहीं; स्तुती करतां येत नाहीं, परंतु त्यांचें मला ज्ञान नाहीं. वेदश्रुति सांगतात कीं आम्हीं तें जाणूं शकत नाहीं. मग मी एक बापुडकें माझी मति चालणार ? असा अंतर्यामीं विचार करतो त्याची स्तुति,

स्मरण करावें, परंतु होत नाहीं. जो नाममंत्र आहे, तें ओंकारेश्वराचें स्वरूप आहे. एके-श्वराचें स्वरूप आहे. म्हणजे जेवढें हें स्वरूप तो मंत्र, त्याचा अर्थ त्याचा ध्वनी आणि त्याचा नाद, मंत्र, अंतर्यामींचें प्रेम म्हणजे भक्ति हें सर्व त्याचें एकच अंग आहे असा तो मंत्र त्याच्या अर्थाप्रमाणें आपण म्हणून जो अष्टौप्रहर न निसंबे त्याला, हें त्याचें अदैखादर्शन आहे. प्रत्येकाच्या ठिकाणीं आत्मप्रेम असूनही आत्मप्रेमाची संगत होत नाहीं. ती होण्याकरितां हा आत्मधर्म पाळावा. तो मंत्रपाठ न विसंबता चालू असावा. तो मंत्रध्वनी व जग ज्याची पूजा करते आहे, तो मंत्र व तो ओंकारेश्वर एकच आहे. "तो मंत्र हाच ओंकार," मंत्राचा उपयोग करणारा तोच ईश्वर, ईश्वर असण्याकरितां आत्मप्रेम, तोच ईश्वर असें स्मरण लाखांत एखाद्याजवळ असेल अथवा नसेल, मग मग ज्याचा जसा भाव, तसा त्याचा देव. कोणी कलेंत पारंगत होईल, कोणी विद्येंत पारंगत होईल असें कांहींना कांहीं तरी लाभणार आहे. फुकट जाणार नाहीं.

तो आत्मध्वनी, जो त्याला प्रसन्नतेनें आठवितो, त्याला प्रसन्नता काय देईल हें सांगतां येत नाहीं. सगळेच पुन्या दर्शनाचें मालक होत नाहींत परंतु त्याची जेवढी निष्ठा तेवढें त्याला प्राप्त होईल. आपण कोण असावें व आपणांस काय योग्यता असावी त्याची सदन घेणें तुमच्या हातीं आहे. तुमची हिम्मत असेल त्याप्रमाणें ठरवा, त्याप्रमाणें तुमचा तुम्हाला अनुभव येईल.

आता त्या मंत्राना अर्थ तो स्वतः तसा आहे. तो जें मागेल तें मागणाराच्या नाभीं-तून निर्माण होईल. वनस्पती चैतन्य जी आहेत ती उगवतात, उगवून त्यांचें झाड झालें परंतु हें दर्शन त्या झाडाचें बीजातून जो अंकूर आला त्यांतून झालें असें जर आहे तर मग मनुष्य आकृतींतील हे आत्मप्रेम प्रतिशेनें ईश्वरस्वरूप आहे अशी ज्याला त्याची कसोटी घ्यावयाची असेल त्यानें घ्यावा. तो आग्रह घेण्याकरितां सद्गुरु स्मरण पाहिजे. कारण तो आग्रह घेतांना त्यांचे जे चमत्कार होतात ते पचनीं पडावयाला सद्गुरु स्मरण आहे.

तुमच्या स्मरणानें, तुमच्या आत्मविश्वासानें तुम्हाला टैंगणें केलें आहे. व त्यानें प्रत्येकाची अशी खात्री झाली आहे कीं आपण मरणार, साधा अर्थ सत्यस्वरूपाचें विस्मरण, तेंच विस्मरण मरणार.

आपण असल्याच्या जाणीवेवर जेवढ्या किंमतीचें प्रेम आहे, तेवढ्या निष्ठेनें त्याच्याशीं सप्रेम नाहीं, तर दगाबाज आहे असें कां ? तर ज्याला हें स्मरण आहे. त्यांनीं देहासारखा आपणाला मानल्यामुळें आत्मस्मरणाचें विस्मरण झालें आहे गुरु बोधानें, आत्मस्मरणाचें जें विस्मरण होते तें जाऊन मी देहातीत उघड ज्ञानस्वरूप आहे. असा सर्वेश्वराच्या अंतर्यामांतील ज्ञान तंतू जाण—तूं, जाण हा गुण सर्वेश्वराच्या अंतर्यामांतील ज्ञान तंतू आहे असा बोध होतो. ज्याची जात केवळ ज्ञानच आहे, गुणें ज्ञान स्वरूप स्वरूपें ज्ञान हें ईश्वराचें मूर्तस्वरूप आहे. जसा आकाशाचा कण दुसऱ्यांच्या हातावर देतां येत नाहीं, परंतु न देतांच तो पसरला आहे. तसाच हा गुण प्रत्येकाला आपणाच भोगतो आहे. त्या गुणाला जो सप्रेम भजतो तो ईश्वरावरील प्रेमानें भजतो.

दृष्टीनें शरिराच्या अंतर्यामीं शरिरांत काय जाणवतें ? प्रत्येकाला आपण असल्याचें जाणवतें. त्या असल्याच्या अंतर्यामीं विश्वविभूति आहे. भगवंतांनीं विश्वरूप दाखविलें तें कसें ? भगवान श्रीकृष्ण त्याच्या अंतर्यामीं. जें या शरिरांत असलेलें तें दिसत नाहीं, त्याच्या अंतर्यामीं जो आपण म्हणून ठसा आहे, तें साधुसंतांच्या अंतर्यामीं ईश्वराचें मूर्त स्वरूप आहे. त्याला ब्रह्मस्वरूप म्हणतात व तें याच्या अंतर्यामीं विश्वविभूती आहे. या शरिरांत असलेलें आत्मज्ञान, त्या आत्मज्ञानाच्या पोटांत आपल्यावरील आपलें प्रेम अशी मोठी जादू आहे. हेंच तें गुरुभवित करण्याचें प्रामाणिक साधन आहे. ज्याचें स्वतःचें स्वतःवर प्रेम नाहीं असा कोणीही प्राणी नाहीं. ज्ञानाचें ज्ञानावर प्रेम आहे. जाणिवेचें जाणिवेवर प्रेम आहे. तें शरीररहित केलें तर ईश्वराचें स्वरूप आहे. अशा सद्भक्तीनें जो आत्मभाव जागवितो तो सद्गुरु भक्त आहे. हें जाणल्यामुळें तो म्हणतो मला याचें वर्णन करतां येत नाहीं.

ज्यानें सद्गुरु स्मरण केलें तें प्रत्ययाला आलें, आगंतुक आलेलें आत्मस्मरण, हें आत्मस्मरण विस्मरण करण्याच्या लायकीचें ठरलें त्याचा मोबदला सद्गुरु स्मरण. नंतर जें दिसतें भासतें, तें मानायला लाज वाटते. माया झाली लज्जायमान असा ज्याचा अनुभव झाला तो त्याचें यथार्थ वर्णन करतो व वर्णन करतांना सांगतो, कीं मी तुझी स्तुती करणार ती स्तुती अयोग्य आहे. परिचयांतील कोणीहि व कोणताही परिचय नाहीं व तो परिचय सत्य मानावयास लाज वाटतें, असा अंतर्यामी निश्चयाचा ठसा बसला, कीं तो हें विश्व सच्चिदानंद स्वरूप पाहतों.

आपल्या हृदयस्थाशिवाय दुसरा कोणी ईश्वर नाहीं असा ज्याचा निश्चय त्यालाच हें तसें दिसतें. ज्यानें टाकून दिलेलें, ज्याला आत्मलाभ झाला त्याला हें सगळें पतितपावन होतें. ज्याचा असा निश्चय झाला; ज्याचा आत्मविश्वास आत्मविश्वासानें आत्मविश्वाला मिठी मारतो आहे त्याच्या दर्शनाला इंद्रादिक येतात. पण हें भाग्यवंताचें लक्षण आहे. त्यांना ही मायेची दिवाळी वाटते.

तुम्हीं धन्य आहांत, आपल्या आत्मप्रकाशानें तुम्हीं आहांत देहाच्या नाशानें आत्मा नाश पावत नाहीं. देहाच्या उदयानें आत्मा उदय पावत नाहीं. अशी सद्गुरु भक्ति करा. त्या सद्गुरु भक्तीनें सर्व भाग्यें येतात.

---

# श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

## कार्यालयाकडे चेकनें आलेल्या रु. ५० च्या वरील रकमांची यादी

| अ. नं. | नांव | पत्ता | चेकनें दिलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १. | श्री. एच्. पी. घाटगे | नागला, कोल्हापूर ३ | ११००.०० |
| २. | ,, जसुभाई एच्. पटेल | सोरोटी, युगांडा | ६००.०० |
| ३. | ,, के. के. कल्यानी | मद्रास २० | ५७८.२९ |

| अ. नं. | | नांव | पत्ता | | चेकनें दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ४. | ,, | आर. व्ही. दिवेचा | मुंबई १ | | २५२.०० |
| ५. | ,, | रावजी रामदास संपत | मुंबई | | २५०.०० |
| ६. | ,, | गुणवंत एम्. मेहता | कांपाला, युगांडा | | १७५.०० |
| ७. | ,, | एम्. व्ही. लक्ष्मण | न्यूयॉर्क, वॉशिंग्टन | | १२०.३७ |
| ८. | ,, | श्रीकिशन सूर्यप्रकाश शर्मा | यादगिरी | | २५०.०० |
| ९. | ,, | एम्. के. कारवारकर | न्यू दिल्ली | | १०१.०० |
| १०. | ,, | शशी ऋषभदास अग्रवाल | न्यू दिल्ली | | १०१.०० |
| ११. | ,, | एन्. एन्. पाटील | वांद्रा, मुंबई | | १०१.०० |
| १२. | कु. | चम्पा आफळे | दिल्ली | | १०१.०० |
| १३. | ,, | व्हि. सी. कापडीया | मुंबई—१ | | १०१.०० |
| १४. | ,, | बी. आर. गांधूरकर | नागपूर | | १०१.०० |
| १५. | ,, | के. आर. एल. आद्रा | औरंगाबाद | | १००.०० |
| १६. | ,, | मिसेस पेन्नीन्हाह एस, बोंजमनी, दादर | | | १००.०० |
| १७. | ,, | एम्. बी. पटेल | मुंबई—५ | | १००.०० |
| १८. | ,, | जे. व्हि. ठक्कर | नैरोबी, केनया | | ७५.०० |
| १९. | ,, | पी. शहा. | मुंबई—६ | | ७०.०० |
| २०. | ,, | मेजर एन्. अे. दवे. | कलकत्ता | | ५१.७५ |
| २१. | ,, | एस. व्हि. विनोद | कर्जत, कुलाबा | | ५१.०० |
| २२. | ,, | श्रीपादराव कालिपोड | | | ६०.०० |
| २३. | ,, | जस्टीस मुधोळकर | न्यूदिल्ली | | ५१.०० |
| २४. | ,, | अ. कृ. कुमठेकर | कानपूर | | ५१.०० |
| २५. | ,, | एस. डी. सोमण | मुंबई | | ५०.०० |
| २६. | ,, | जी. एन्. आर. शास्त्री | दोरांदा | | ५०.०० |
| २७. | ,, | एम्. अे. लक्ष्मण | वॉशिंग्टन | | ५०.०० |
| २८. | ,, | एम्. एन्. खत्री | न्यूदिल्ली | | ५०.०० |
| २९. | ,, | एम्. एस. राजगोपाळ | बंगलोर—१९ | | ५०.०० |
| ३०. | ,, | डी. के. मेहता | नैरोबी | पौंड ७ शि. | १० |
| ३१. | ,, | एन्. एम्. मेहता Arua यूगांडा | | ,, | ५.०० |
| ३२. | ,, | आय. बी. देसाई. | लूसाका. नॉ. रो. | ,, | ५.०० |
| ३३. | ,, | के. एन्. शहा | लूसाका, नॉ. रो. | पौंड | ५.०० |
| ३४. | ,, | डॉ. आर. एस्. पाटील | न्यू पोर्ट | ,, | ५.०० |
| ३५. | ,, | रामन बी. पटेल | सॅलिसबरी | शि. | ८०.०० |
| ३६. | ,, | रामान बी. पटेल | ,, | शि. | ८०.०० |

———

२५०




## जून १९६१

**या** महिन्यांत अधिक महिन्याचे पंधरा दिवस आल्यामुळें श्रीसाईदर्शनास भक्तांची बरीच गर्दी होत असे. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें:—

**कीर्तन :** श्री. ह. भ. प. शंकर व्यंकटेश रूपलग श्रीक्षेत्र पंढरपूर. श्री. ह. भ. प. कृष्णराव रंगराव जोशी. शेगांव ( वऱ्हाड ) जि. बुलढाणा. सं. गवई श्री. मराठे यांची एकादशीस दोन कीर्तनें झालीं.

**गायन :** कु. मधुरा व्ही. शांताराम मुंबई, श्री. सौ. इदूंमती चौवळ मुंबई, श्री. ताराबाई जेजुरी. श्री. शिवप्पा भीमराव घोत्रे सोलापूर.

**फिडलवादन :** श्री. शरद गंधे, इंदौर. ( माळवा )

**मोठ्यांच्या भेटी :** न्या. मू. मुधोळकर, उच्च न्यायालय दिल्ली, यांनीं श्रीसाईस अभिषेक, महापूजा, सत्यनारायण पूजा वगैरे धर्मकृत्यें केलीं. न्या. मू. खटावकर अहमदनगर, यांनीं श्रीसाईस अभिषेक महापूजा वगैरे केली.

**हवापाणी :** पाऊस थोडासा झाला असून अद्याप आकाश ढगाळ आहे. पाऊस पडण्याचा रंग दिसत आहे.



# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | किंमत रु. न.पै. |
|---|---|
| (१) श्रीसाईसच्चरित (मराठी) | ७·०० |
| (२) श्रीसाईसच्चरित (हिंदी) | ४·५० |
| (३) श्रीसाईसच्चरित (इंग्रजी) | ४·०० |
| (४) श्रीसाईसच्चरित (गुजराथी) | ३·७५ |
| (५) श्रीसाईसच्चरित (कानडी) | ३·०० |
| (६) श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | ०·१२ |
| (७) दासगणूकृत (४ अध्याय) | ०·५० |
| (८) सगुणोपासना | ०·२५ |
| (९) प्रधानकृत साईबाबा शिर्डी (इंग्रजी) | १·०० |
| (१०) श्रीसाईलीलामृत | २·०० |
| (११) श्रीसाईसुमनांजलि | ०·०६ |
| (१२) कीर्तनपंचक | १·५० |
| (१३) शीलधी | ०·७५ |
| (१४) साईबाबा अवतार व कार्य | २·०० |
| (१५) श्रीसाईगीतांजली | ०·१२ |
| (१६) रुद्राध्याय (११ वा) | ०·१२ |

(पोस्टेज निराळें)

वरील पुस्तकांकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

१ सरकारकून, श्री.साईबाबा **संस्थान**, पोष्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, फ्लॅट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.